CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ १९२६

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ८ मे २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १७९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ऑक्रमण

## मध्यरात्री पाकिस्तानवर बरसले राफेल





◆ **नवी दिल्ली, ७ मे**

जीवनातील आनंदाचे क्षण घालविण्यासाठी काश्मीर खोऱ्यातील बैसरन या पर्यटनस्थळावर आलेल्या निष्पाप नागरिकांवर हल्ला करून २६ जणांची हत्त्या करणे पाकिस्तानला चांगलेच महागात पडले आहे. १५ दिवसांनंतर भारतीय दलातील राफेल आणि सुखोई या विमानांनी थेट पाकिस्तानात घुसून लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबूल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनेचे अड्डे जमीनदोस्त करून शेकडो दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. बुधवारी पहाटे १ वाजताच्या सुमारास ऑपरेशन सिंदूरला सुरूवात झाली आणि अवघ्या २५ मिनिटांमध्ये मोहीम फत्ते करीत राफेल आणि सुखोई सुखरूप परतले. भारताच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानात हाहाकार माजला असून तेथील लष्कर आणि धमक्यांची भाषा वापरणाऱ्या राजकारण्यांची आता पाचावर धारण बसली आहे.

- पाकिस्तानातील ४ तर व्याप्त काश्मिरातील ५ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त
- शेकडो अतिरेकी गाडले, प्रशिक्षण इमारती जमीनदोस्त
- आधुनिक शस्त्रे आणि तंत्रज्ञानाचा वापर, पाकिस्तान हादरला
- स्कॅल्प क्रूझ क्षेपणास्त्रे, हॅमर बॉम्ब, लोटेरिंग दारुगोळा आणि राफेल लढाऊ विमानाचा वापर
- २५ मिनिटांत २५ वर्षांचा हिशेब चुकता



व्याप्त काश्मीरची राजधानी मुझफ्फराबाद येथे मंगळवारी रात्री भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इमारत कोसळल्यानंतर पाकिस्तानच्या जवानांची अशी पळापळ झाली.



### नादान पडोसी आँखे खोलो

*एक नहीं दो नहीं करो बीसों समझौते,*
*पर स्वतन्त्र भारत का मस्तक नहीं झुकेगा।*

*इसे मिटाने की साजिश करने वालों से कह दो,*
*चिनगारी का खेल बुरा होता है ।*
*औरों के घर आग लगाने का जो सपना,*
*वो अपने ही घर में सदा खरा होता है।*

*अपने ही हाथों तुम अपनी कब्र ना खोदो,*
*अपने पैरों आप कुल्हाडी नहीं चलाओ।*
*ओ नादान पडोसी अपनी आँखे खोलो,*
*आजादी अनमोल ना इसका मोल लगाओ।*

*धमकी, जिहाद के नारों से, हथियारों से*
*कश्मीर कभी हथिया लोगे यह मत समझो।*
*हमलो से, अत्याचारों से, संहारों से*
*भारत का शीश झुका लोगे यह मत समझो।*

(भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या एका गाजलेल्या कवितेतील निवडक ओळी. निमित्त भारताने पाकिस्तानला शिकविलेला धडा.)

### पंतप्रधान मोदी होते वॉर रूममध्ये

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेत भारताने प्रतिहल्ला करून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये असलेल्या दहशतवादी तळ अचूक टिपून सुनियोजित पद्धतीने भारताने एअर स्ट्राईक केला. यामध्ये पाकिस्तानातील नऊ ठिकाणी हल्ले करून दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यात आले.


ऑपरेशन सिंदूर
२०० उड्डाणे रद्द; १८ विमानतळे तात्पुरती बंद

विशेष पान ३



### भारतीय सैन्याचे शौर्य अभूतपूर्व

भारतीय सैन्याने दहशतवादाला प्रत्युत्तर देण्यासाठी दाखवलेले शौर्य अभूतपूर्व आहे. याबद्दल मी सैन्याचे अभिनंदन करतो. देशासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. मंगळवारी रात्री उशिरा भारतीय सैन्याने एक धाडसी आणि अचूक कारवाई केली, ज्याला ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले. या मोहिमेअंतर्गत, पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील नऊ प्रमुख दहशतवादी अड्ड्यांवर हवाई हल्ले करण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हे पाऊल उचलण्यात आले.
**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### जैश-ए-मोहम्मदचा मुख्य अड्डाच खल्लास

कंदहार विमान अपहरण कांडात सोडण्यात आलेला कुख्यात दहशतवादी मौलाना मसूद अजहर याने जैश-ए-मोहम्मद ही दहशतवादी संघटना स्थापन केली. पाकिस्तानी लष्कराचे त्याला सहकार्य होते. बहावलपूर सर्वात सुरक्षित ठिकाण असल्याने तो इतकी वर्षे बिनधास्त वावरत होता. मात्र, राफेलमधून सुटलेल्या स्काल्प क्षेपणास्त्राने मसूदच्या मरकज सुभान अल्लाहचा वेध घेतला आणि शेकडो भारतीय नागरिकांचे प्राण घेण्यास कारणीभूत ठरलेला अड्डा नष्ट झाला. यात त्याचे जवळचे नातेवाईक आणि दहशतवादी ठार झाले. ■

### लष्कर-ए-तैयबाचे मुख्य केंद्रच जमीनदोस्त

जैशनंतर लष्कर-ए-तैयबाने मुंबईवर दहशतवाही हल्ला करून मोठी जखम केली होती. अजमल कसाब हा तैयबाचाच दहशतवादी होता. मुदिरके येथील तळातच त्याचे प्रशिक्षण झाले होते. तैयबाचा म्होरक्या मोहम्मद हाफिज सईद सातत्याने भारतविरोधी गरळ ओकतो. दहशतवादाचे केंद्र असलेला हा किल्ला भारतीय लढावू विमानांनी नष्ट केला. ■




बुधवारी पहाटे भारतीय हवाई दलाच्या राफेल आणि सुखोई लढाऊ विमानांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानातील व व्याप्त काश्मिरमधील नऊ दहशतवादी अड्डे ध्वस्त केले

## मीही मेलो असतो तर बरे झाले असते...!

### जैशचा म्होरक्या मसूदच्या कुटुंबातील दहाजण संपले

◆ **बहावलपूर, ७ मे**



भारतीय जवानांनी पाकिस्तान आणि पीओकेमधील ज्या नऊ ठिकाणांना लक्ष्य केले होते. त्यापैकी एक ठिकाण बहावलपूर आहे, ज्यामध्ये जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अझहरचे कुटुंबाच उद्ध्वस्त झाले आहे. त्याच्या कुटुंबातील दहा सदस्यांचा मृत्यू झाला आहे. दुसरीकडे, मसूद अझहरचे एक स्टेटमेंट समोर आले आहे. ऑपरेशन सिंदूर मोहिमेंतर्गत झालेल्या हवाई हल्ल्यात अझहरच्या परिवारातील १० आणि जवळचे ४ लोक ठार झाले आहेत. हे पाहून मसूद अझहरने मी ही मेलो असतो बरे झाले असते. या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत.

**मसूद अझहरचे कुटुंबच उद्ध्वस्त**

भारतीय हवाई हल्लयात मसूद अजहरची बहिण देखील ठार झाली. दहशतवाद्यांचे नातेवाईक देखील हल्ल्यात मारले गेले आहेत. जैश-ए-मोहम्मदने स्टेटमेंट जारी करत सांगितले आहे की, मसूद अझहरची मोठी बहीण ठार झाली. तर मुफ्ती अब्दुल रऊफची नातवंडे, मोठ्या मुलीचे ४ मुले जखमी झाले. मृत्यू झालेल्यांमध्ये अधिकतर महिला आणि मुलांचा समावेश आहे.

**दोन किलोमीटर अंतरावर घराच्या खिडक्या फुटल्या**

स्थानिक पत्रकाराने म्हटले की, रात्री जेव्हा पहिला धमाका ऐकू आला तेव्हा आजूबाजूच्या परिसरातील लोक घटनास्थळी पोहोचले. काहीच वेळानंतर दुसरा धमाका ऐकू आला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की, दोन किलोमीटर अंतरावरील घरांच्या खिडक्या फुटल्या.

मध्यरात्री अचानक झालेल्या हल्ल्याने दहशतवादी तळाजवळ राहणारे नागरिक घाबरले आणि घराबाहेर पडले. ◀(वृत्तसंस्था)

### दहशतवाद्यांना पळण्याचीही संधी नाही

संपूर्ण भारतात मॉक ड्रील सुरू होणार असल्याने बुधवारच्या मध्यरात्री आपल्यावर हल्ला होईल याची काहीच कल्पना नसलेला पाकिस्तान राफेल, मिराज आणि सुखोईच्या आकाशभेदी आवाजाने खडबडून जागा झाला. या लढाऊ विमानांनी पाकिस्तानाचे नाक असलेला पंजाब प्रांत आणि व्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी अड्ड्यांवर क्षेपणास्त्रांनी मारा केला. हा मारा एवढा अचूक आणि जबरदस्त होता की दहशतवाद्यांनी बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार तर कित्येक जखमी झाले. ■

## देशभरात मॉकड्रील









एकीकडे भारताने हवाई हल्ला करून पाकिस्तानमधील दहशतवाद्यांना नामोहरम केले. त्याचवेळी देशभरात २०० हून अधिक ठिकाणी ठरल्याप्रमाणे युद्धजन्य स्थितीत निपटण्यासाठी मॉकड्रील पार पडले. अनेक ठिकाणी ब्लॅकआऊटही करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांपासून तर अगदी विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी यात सहभाग घेत युद्धसज्जता दर्शवली.



## महिला अधिकाऱ्यांनी सांगितली पराक्रमाची कहाणी

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

पहलगाम येथील बैसरण येथील अमानुष आणि क्रुर घटनेत सुटी साजरी करण्यासाठी आलेल्या महिलांच्या समोर कुणाचा पती, कुणाचा मुलगा आणि जवळच्या आप्तांची अगदी जवळून गोळ्या झाडून दहशतवाद्यांनी हत्या केली. या घटनेने अवघा देश हळहळला. महिलांच्या मनावर हा मोठा आघात होता. गेलेले आप्त परत येणार नसले तरी त्यांचे दुख हलके करण्याचा प्रयत्न आणि त्यांना मानसिक आधार म्हणून आणि दहशतवाद्यांना संदेश देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय वीरांनी केलेला पराक्रम जगाला सांगण्याची जबाबदारी सेनादलातील दोन महिलांकडे सोपविण्यात आली.

भारताने १५ दिवसांत पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील ९ पेक्षा अधिक दहशतवादी तळांवर हवाई कारवाई करत पाकिस्तानला ठोस उत्तर दिले. या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले आहे. ६ मेच्या रात्री भारताने ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर ७ मे रोजी दिल्लीमध्ये एक विशेष प्रेस कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली. विशेष बाब म्हणजे, या कॉन्फरन्समध्ये देशाच्या संरक्षण यंत्रणेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन महिला अधिकारी समोर आल्या लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरैशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह. त्यांच्यासोबत भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री देखील उपस्थित होते.

या दोन महिला अधिकाऱ्यांनी जगासमोर ऑपरेशन सिंदूरची प्रत्येक माहिती संयमाने, आत्मविश्वासाने आणि ठामपणे मांडली. यामध्ये दहशतवादी तळांचा नाश कसा झाला, कोणती शस्त्रास्त्रे वापरण्यात आली आणि भारताची कारवाई किती अचूक होती याची माहिती देण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)

### कर्नल सोफिया कुरैशी : संयम, नेतृत्व आणि नारीशक्तीचे प्रतीक

- सिग्नल कोअरमध्ये सेवा देणाऱ्या कर्नल सोफिया कुरैशी या पहिल्या महिला अधिकारी आहेत, या बहुराष्ट्रीय लष्करी सराव 'एक्सरसाइज फोर्स १८' चे नेतृत्व करतात.
- त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या शांती मोहिमेतही (कोंगो) सहा वर्षे योगदान दिले आहे.
- गुजराती सैन्यकुळातून आलेल्या कुरैशी यांच्याकडे बायोकैमिस्ट्रीमध्ये पदवी आहे.
- ७ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी हिंदीमध्ये पाकिस्तानच्या दहशतवादाला उद्ध्वस्त करणारी माहिती जगासमोर ठेवली.



### विंग कमांडर व्योमिका सिंह आकाशाला गवसणी घालणारी वीरांगना

- १८ डिसेंबर २००४ रोजी भारतीय वायुदलात रूजू झालेल्या व्योमिका सिंह या लढाऊ हेलिकॉप्टर पायलट आहेत.
- त्यांनी चेतक आणि चीता सारखी हेलिकॉप्टर्स अत्यंत कौशल्याने हाताळली आहेत.
- २०१७ मध्ये त्यांना विंग कमांडर पदावर बढती मिळाली.
- त्यांच्या नावावर हजारो तासांचे फ्लाईंग अनुभव असून त्या अत्यंत अनुभवी आणि धाडसी अधिकारी मानल्या जातात.
- बालपणापासूनच हवाई दलात जाण्याचे ठरवले होते.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### बनावट खरेदी दस्त करून पतसंस्थेची फसवणुक करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मे -**

बनावट खरेदी दस्त करून पतसंस्थेची फसवणुक करणाऱ्या तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बी जी कोरत (वय ५४, रा. ५३७, पालकॅपल्ली हाऊस, मेडोस, उदय नगर, वेंगोला, ता. कुन्नाकुनाल, जि. एर्नाकुलम, केरळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुनिल वामनराव नान्नजकर (रा. १४४, लक्ष्मी पेठ, दमाणी नगर, सोलापूर), बसवराज चंद्रकांत बिराजदार (रा. पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर), बसवराज सिध्दाराम पुजारी (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिल नान्नजकर यांचे वडील वामनराव यांच्या नावावर प्लॉट नं. १४८ व १४९ हे दोन प्लॉट आहेत. सुनिल नान्नजकर यांचे वडील मयत झालेले आहेत, हे माहिती असतानादेखील बसवराज बिराजदार व बसवराज पुजारी यांनी एका अनोळखी तोतय्या व्यक्तीस नान्नजकर यांचे वडील म्हणून उभा करून १३ मार्च २०१८ ते २७ जुलै २०२१ या कालावधीत मयत वामनराव नान्नजकर यांच्या नावावरील प्लॉट बाजारभावाप्रमाणे ३० लाख रुपयांना जी बी कोरत यांना विकले. परंतु, सुनिल नान्नजकर, बसवराज बिराजदार, बसवराज पुजारी यांनी कोरत यांच्या परस्पर बनावट खरेदी दस्त करून कोरत यांची फसवणुक केली. तसेच या बनावट खरेदी दस्ताच्या आधारे महात्मा नागरी पतसंस्थेत जागा गहाण ठेऊन ५ लाख रुपये कर्ज घेतले. अशाप्रकारी तिघांनी कोरत व पतसंस्थेची फसवणुक केल्याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक भालचंद्र ढवळे पुढील तपास करीत आहेत.

### टुर्स बुकींगच्या नावाखाली पैसे घेऊन ट्रिपला नेलेच नाही; ३१ लाखांची फसवणुक


**सोलापूर, दि. ७ मे -**

टुर्स बुकींगच्या नावाखाली पैसे घेऊन ट्रिपला न नेता ३१ लाख ३३ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल विजय हुंडेकरी (वय ४६, रा. स्नेहल पार्क, आयएमएस स्कुलजवळ, जुळे सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन शैलेश बिरणप्पा बिडवे (वय ३५, रा. मेहकर, ता. भालकी, जि. बिदर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल हुंडेकरी यांचे शहरातील रेल्वे लाईन येथे कार्यालय आहे. १ फेब्रुवारी २०२४ रोजी हुंडेकरी यांच्या ट्रॅव्हल्सच्या कार्यालयामध्ये शैलेश बिडवे हा तरूण आला व त्याने तो इन अॅटो हॉलिडेज कंपनीचा सोलापूरचा प्रतिनिधी असल्याचे सांगितले. बिडवे याने त्याच्या कंपनीमार्फ टुर्स आयोजित केल्या जात असल्याचे सांगून हुंडेकरी यांस कंपनीचे माहितीपत्रक दिले. बिडवे याने हुंडेकरी यांना त्यांचे दुबई, थायलंड, दिल्ली येथे कार्यालय असून संपूर्ण जगभर ट्रॅव्हल्स कंपनीसाठी विमान तिकिट, बसेस, हॉटेल्स, जेवणाची सोय करून देत असून तसेच होलसेल दरामध्ये हुंडेकरी यांच्या ट्रॅव्हल्ससोबत काम करू असे आश्वासन दिले. त्यामुळे हुंडेकरी यांनी बिडवे याच्यासोबत काम करण्यास सुरुवात केली. १ फेब्रुवारी २०२४ ते ६ मे २०२५ या कालावधीत बिडवे याने हुंडेकरी यांच्याकडून टुर्स बुकींग करण्याच्या नावाखाली त्यांच्या करंट खात्यात ३१ लाख ३३ हजार रुपये घेऊन हुंडेकरीसोबत तोंडी करार केला. बिडवे याने दोन ट्रिप यशस्वीरीत्या पूर्ण करून इतर ५ ट्रिपचे पैसे घेऊन फरार झाला. त्यामुळे हुंडेकरी यांची फसवणुक झाल्याचे दिसून येताच याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक काटे पुढील तपास करीत आहेत.

### तूर खरेदीसाठी १५ दिवसाची मुदतवाढ द्या : मंत्री जयकुमार रावल यांची केंद्राकडे मागणी

**मुंबई दि. ७ मे**

राज्यातील तूर उत्पादक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता नाफेड व एनसीसीएफ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या तूर खरेदीची मुदत पंधरा दिवसांनी वाढवून मिळावी, अशी मागणी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडे केली आहे. तसा प्रस्ताव पणन विभागाच्या माध्यमातून केंद्राला पाठविण्यात आला आहे.





## पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत** साठी सोलापूर **शहरात कॅम्पेनिंग** करण्यासाठी दहावी, बारावी, पदवीपर्यंत शिक्षण झालेले २० युवक पाहिजेत. आकर्षक मानधन दिले जाईल. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह खालील पत्त्यावर कार्यालयात समक्ष भेटावे अथवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क: ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.


# अवैध धंद्यावर तात्काळ कारवाईचे गृह राज्यमंत्र्यांचे आदेश

### पोलिस प्रशासनातील रिक्त पदे भरण्याची पोलिस आयुक्तांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मे -**

सोलापूर शहर व जिल्हयात मटका, डान्सबार, अवैध मद्य विक्री सह अन्य अवैध व अनाधिकृत व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. पोलीस प्रशासनाने अशा अवैध व अनाधिकृत व्यवसाय करणाऱ्या संबंधिताची माहिती घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करुन ते धंदे बंद करावेत, अशा सूचना राज्यमंत्री गृह (शहरे) महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन मंत्री योगेश कदम यांनी दिल्या.



सोलापूर शहर पोलीस आयुक्त कार्यालय गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त श्रीमती दिपाली काळे, अजित बोऱ्हाडे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे व संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी गृहराज्य मंत्री योगेश कदम म्हणाले, महाराष्ट्रात सायबर क्राईमच्या गुन्हयांच्या तक्रारीमध्ये वाढ होत आहे. सायबर गुन्ह्यांची वाढ लक्षात घेता नागरिकांना तात्काळ प्रतिसाद देवून त्यावर उपाययोजना कराव्यात. तसेच जिल्हयात अनाधिकृपणे गुटखा विक्री होणार नाही दक्षता घेवून गुटखा विक्रीवर आळा घालण्यासाठी अन्न व औषध विभाग व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे कार्यवाही करावी अशा सूचानाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार म्हणाले, सोलापूर शहरात एकूण सात पोलीस स्टेशन आहेत.

तसेच वर्षात १७० मिरवणूक असतात. त्या सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. १०० दिवसीय कृती आराखडया अभियानातंर्गत या विभागामार्फत ११०० वाहनांचा लिलाव करण्यात आला आहे. तसेच पोलीस प्रशासनातील रिक्त पदे तातडीने भरणेबाबत मागणी त्यांनी यावेळी केली.

## उपसा सिंचन योजनेतून बार्शी तालुक्याला मुबलक पाणी देणार



### पालकमंत्री गोरे यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

बार्शी तालुक्याला लवकरच उपसा सिंचन योजनेतून शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी देण्याचे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. कांदलगावमधील नरसिंहाच्या मंदिरालाही तीर्थक्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात येईल, अशीही ग्वाही त्यांनी दिली.

बार्शी तालुक्यातील विविध विकासकामांचे उद्घाटन पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी कांदलगाव येथे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्यासाठी १४ कोटी ६८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. तसेच बार्शी शहरातील श्री भगवंत मंदिराच्या भक्तनिवासाचे भूमिपूजन करून तीर्थक्षेत्र आराखड्यासाठी २८६ कोटीचा निधी मंजूर करण्याचा संकल्प पालकमंत्री गोरे यांनी केला.

या कार्यक्रमास माजी आम दार राजेंद्र राऊत, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, नगर अभियंता विवेक देशमुख आणि संबंधित विभागाचे अधिकारी प्रमुख उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, ज्या पालखीच्या दर्शनासाठी मी धक्काबुक्की खाल्या, त्या विठुरायाच्या पालखीची सेवा करण्याची संधी मला प्राप्त झाली आहे. वारकऱ्यांना कोणत्याही सोयी सुविधा कमी पडू देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे बार्शी तालुक्यातील विकासकामांमध्ये गती येईल आणि स्थानिक नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा आहे.

### दुसऱ्या महायुध्दातील लाभार्थ्यांनी ३० जूनपर्यंत हयातीचे दाखले जमा करावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ मे-**

जिल्ह्यातील दुसऱ्या महायुध्द लाभार्थ्यांनी शासनाच्या प्रचिलीत नियमानुसार आपले हयातीचे दाखले जमा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील दुसरे महायुध्द लाभार्थ्यांनी आपले हयातीचे दाखले जिल्हा सैनिक कार्यालयामध्ये प्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ३० जून २०२५ पर्यंत जमा करावेत .

तसेच हयातीचे दाखल्यासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, ओळखपत्र व बँक पासबुक च्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत जोडावी. ज्या लाभार्थींचे हयातीचे दाखले दिलेल्या मुदतीत कार्यालयास प्राप्त होणार नाहीत; त्यांचे अनुदान माहे जून २०२५ पासुन बंद करण्यात येईल व हयातीचे दाखले प्राप्त झालेनंतर फरकासह अनुदान देण्यात येईल. यासाठी या लाभार्थ्यांनी लवकरात लवकर आपले हयातीचे दाखले जमा करावेत. तसेच ज्या लाभार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, अशा लाभार्थ्यांच्या मृत्यूचा दाखला अर्जासहित त्यांच्या अवलंबितांनी जमा करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.




## मनपावर भगवा फडकवण्यासाठी युवा सेनेने तयार राहावे

### गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे मेळाव्यात आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मे -**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आगामी चार महिन्यात सोलापूर महानगरपालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीत सोलापूर म हानगरपालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी युवा सेनेने योगदान द्यावे, असे आवाहन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी केले. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी युवा सेनेचा मेळावा शिवस्मारक सभागृहात झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मनोज शेजवाल, ऋतुराज सावंत, तुकाराम मस्के, संयोजक आणि युवासेना राज्य कार्यकारणी सदस्य सुजित खुर्द, ब्रह्मदेव प्रभाकर गायकवाड सागर सोलापूरे, भाविक डोके, विवेक भोसले, अभिषेक कलकेरी, रोहन चौगुले, रणजीत भंडारे, अनिकेत सुळ,उपस्थित होते. प्रारंभी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमांचे पूजन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते झाले. गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, युवा सेनेने प्राधान्याने समाजकारण करावे. सोलापुरातील विविध महाविद्यालयांमध्ये युवा सेनेच्या शाखांचा प्रारंभ करावा. विद्यार्थ्यांचे आणि तरुणांचे प्रश्न सोडवावेत. विद्यार्थी आणि तरुण वर्गाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीतून शिवसेना पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करावेत. आगामी चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका जिंकण्याचे ध्येय प्रत्येक शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी ठेवणे गरजेचे आहे. शिवसेनेच्या तसेच युवा सेनेच्या सक्षमीकरणासाठी युवकांच्या प्रश्नांची सोडवणूक करा. युवा सैनिकांनी १८ ते ३५ वयोगटातील मतदारांच्या भेटी घेऊन त्यांचे प्रश्न जाणून घ्यावेत. तसेच त्यांच्याशी संवाद साधावा, असेही गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.

यावेळी प्रा. शिवाजी सावंत व अमोल शिंदे यांनी मनोगतातून महानगरपालिकेवर भगवा फडकविण्यासाठी नेत्यांनी कार्यकर्त्यांना बळ देणे गरजेचे आहे. पूर्वीप्रमाणे शिवसेनेचे पाच आमदार व २१ नगरसेवक निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. युवा सेना मेळाव्याचे संयोजक आणि युवा सेनेचे राज्य कार्यकारणी सदस्य सुजित खुर्द यांनी प्रास्ताविक तर मंगेश लाम काने यांनी सूत्रसंचालन केले.

## न्यायाधीशांची संपत्ती जाहीर

### सर्वोच्च न्यायालयाचे ऐतिहासिक पाऊल

**नवी दिल्ली, ७ मे**

देशातील न्यायव्यवस्थेमधील पारदर्शकता वाढवणे त्याचबरोबर जनतेचा विश्वास दृढ करणे या दिशेने सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक पाऊल उचलले. सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांच्या संपत्ती आणि कर्जाच्या (दायित्वाच्या) घोषणांची माहिती सार्वजनिक केली आहे.



ही माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली आहे. इतिहासात प्रथमच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या संपत्तीची घोषणा सार्वजनिक झाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि २० इतर न्यायाधीशांची माहिती अपलोड करण्यात आली आहे. यामध्ये भावी तीन सरन्यायाधीशांचाही समावेश आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी कथितरित्या रोख रक्कम सापडली. यानंतर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखील न्यायासनाने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संपत्ती सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला होता. न्यायाधीशांच्या नियुक्तीची संपूर्ण प्रक्रियाही वेबसाइटवर अपलोड सर्वोच्च न्यायालयाने ५ मे रोजी जनतेच्या माहितीसाठी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांच्या नियुक्तीची संपूर्ण प्रक्रिया वेबसाइटवर अपलोड केली आहे.

९ नोव्हेंबर २०२२ ते ५ मे २०२५ या कालावधीत उच्च न्यायालयातील न्यायाधीश म्हणून झालेल्या नियुक्त्यांसाठी सर्वोच्च न्यायालय कोलेजियमने दिलेल्या शिफारशींची माहिती नाव, उच्च न्यायालय, स्त्रोत (सेवा किंवा बारमधून), कोलेजियमच्या शिफारशीची तारीख, न्याय विभागाची अधिसूचना तारीख, नियुक्तीची तारीख, विशेष प्रवर्ग, तसेच संबंधित उमेदवार कोणत्याही विद्यमान किंवा सेवानिवृत्त उच्च न्यायालय/ सर्वोच्च न्यायालय न्यायाधीशाचा नातेवाईक आहे का, याचीही माहिती वेबसाइटवर दिले गेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाईटवरील माहितीनुसार, तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील कोलेजियमने शिफारस केलेली एकूण १७ नावे अद्याप सरकारकडे प्रलंबित आहेत. तसेच सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील कोलेजियमने शिफारस केलेली १२ नावेही प्रलंबित आहेत. अशा प्रकारे, ९ नोव्हेंबर २०२२ पासून एकूण २९ न्यायाधीशपदाच्या नियुक्त्या सरकारकडे प्रलंबित आहेत.

## भारतीय अंतराळवीर २०४० पर्यंत चंद्रावर जाणार

### अंतराळ संशोधनावरील जागतिक परिषदेत पंतप्रधान मोदींची माहिती

**नवी दिल्ली :** अवकाश उत्सुकता, धाडस आणि सामूहिक प्रगतीचे स्थान आहे. १९६३ मध्ये एक लहान उपग्रह प्रक्षेपित करण्यापासून ते चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ पोहोचण्यापर्यंतचा भारताचा प्रवास कौतुकास्पद आहे. २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर पोहोचेल.

येत्या आठवड्यात एक भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहे. ही भारतासाठी अभिमानाची बाब असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदी बुधवारी अंतराळ संशोधनावरील जागतिक परिषदेत आभासी पद्धतीने सहभागी झाले. भारताच्या अवकाश मोहिमांची माहिती देताना मोदी म्हणाले, चांद्रयान-१ ने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यास मदत केली. चांद्रयान-२ मोहीम यशस्वी झाली. चांद्रयान-२ ने उच्च रिझोल्यूशनचे छायाचित्र पाठवले होते. चंद्राशिवाय मंगळ आणि शुक्र ग्रहावच्या अभ्यासासाठी भारत मोहीम राबवणार आहे. २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर उतरणार असून ही भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम असेल. येत्या या महिन्याच्या अखेरीस एक भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणार आहे. इस्रो आणि नासा यांच्या संयुक्त मोहिमेचा भाग म्हणून अंतराळ प्रवास करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## २२ नक्षल्यांचा चकमकीत खात्मा

**बिजापूर :** छत्तीसगड-तेलंगणा सीमेवर असलेल्या करेगुट्टा जंगलातील टेकडीजवळ मंगळवारी रात्री सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झडली, यात २२ नक्षली ठार झाले. सुरक्षा दलांकडून गेल्या १५ दिवसांपासून करेगुट्टाच्या विस्तीर्ण आणि दुर्गम टेकड्यांमध्ये मोहीम राबविली जात आहे.

सुरक्षा दलांनी टेकड्यांवर लपून असलेल्या नक्षल्यांचा चारही बाजूने घेरून १६ व्या दिवशी मोठी मोहीम फत्ते केली. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी बुधवारी प्रसार माध्यमांना सांगितले की, छत्तीसगड-तेलंगणा सीमेवरील करेगुट्टा टेकड्यांजवळ अनेक दिवसांपासून नक्षलविरोधी मोहीम सुरू आहे आणि आम्हाला आज मोठे यश मिळाले. आतापर्यंत तेथे २२ हून अधिक नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून अजूनही नक्षल्यांसोबत चकमक सुरू असून मृत्यूचा आकडा वाढू शकतो. बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टाच्या विस्तीर्ण आणि दुर्गम टेकड्यांमध्ये सुरक्षा दल गेल्या दोन आठवड्यांपासून मोहीम राबवत आहे.

## भारताने पुन्हा मिळवला व्यापारातील गौरव; ब्रिटन करार यशस्वी

मंगळवारी ६ मे २०२५ रोजी भारताच्या आर्थिक मुत्सद्देगिरीचा ऐतिहासिक टप्पा ठरलेला भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार नुकताच यशस्वीपणे पूर्ण झाला आहे. या करारामुळे भारताच्या सुमारे ९९% वस्तू निर्यातीला ब्रिटनमध्ये शून्य दराने प्रवेश मिळणार आहे. पण ही केवळ व्यापारसंधी नाही. हा भारताच्या तीनशेहून अधिक वर्षांच्या आर्थिक इतिहासाचा सन्मानपूर्वक पुनरागमन आहे. इसवी सन १७०० पर्यंत भारताच्या वस्त्रोद्योगाने ब्रिटनसह संपूर्ण युरोप व्यापला होता. भारताचे कापड, जरीकाम, मसाले, रत्ने आणि धातू यांची मोठ्या प्रमाणावर



इंग्लंडला करमुक्त निर्यात होत होती. आख्खे एक शतक : इ. स. १६०० ते १७०० : इंग्लंड स्वतःचा वस्त्रोद्योग आणि पर्यायाने स्वतःची अर्थव्यवस्था सशक्त करण्यासाठी झगडत होता. अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आपले कपडे (वस्त्रोद्योग) मदत करीत नाहीत म्हणून या काळात इंग्लंडने आफ्रिकेतून मुलं आणि बायका आणून विकण्याचे बेशरम धंदे देखील केले होते. भारतीय मालाची हरप्रकारे प्रयत्न करून इंग्लंडमध्ये आयात रोखता येत नसल्याने सन १७०१ मध्ये दणदणीत आयातकर लावायला ब्रिटिश पार्लिमेंटने सुरुवात केली. भारतातले व्यवसायच नव्हे तर उद्यमशीलता चिरडण्याचे - विशेषतः - जे प्रयत्न सन १७५० सालानंतर ब्रिटिशांनी केले त्याचे मूळ भारतीय मालाची इंग्लंडच्या जनतेमध्ये असलेली लोकप्रियता हे होते : हे नक्की ! भारतीय उद्योगामुळे स्थानिक ब्रिटीश उद्योग धोक्यात येत असल्याने ब्रिटिशांनी टप्प्याटप्प्याने भारतीय उत्पादनांवर बंदी घालण्यास सुरुवात केली - ज्यामुळे भारताची जागतिक बाजारपेठेतील पकड कमजोर झाली.

स्वातंत्र्य मिळाल्यावर देखील दुर्दैवाने परिस्थिती पूर्वपदावर येऊ शकली नव्हती. आपल्या उत्पादनांना अध्येमध्ये खास दर्जा वगैरे मिळाला पण सन १७०० पर्यंत असणारी बिनधास्त, बिना शुल्क माल विकण्याची मुभा कधीच मिळाली नव्हती.

आता, तब्बल ३२५ वर्षांनी, भारत पुन्हा एकदा आपल्या वस्त्र, रत्ने, यंत्रसामग्री, मासेमारी आणि इतर उत्पादनांसह ब्रिटनमध्ये शून्य कराने प्रवेश करणार आहे. हा केवळ राजनैतिक विजय नाही, तर भारताच्या औद्योगिक सन्मानाचं पुनर्प्राप्ती आहे. या करारामध्ये केवळ वस्तूंचा नव्हे, तर सेवा, व्यावसायिक स्थलांतर, तसेच यूकेमधील भारतीय कर्मचाऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षा करातून तीन वर्षांची सूट यासारख्या प्रावधानांचा समावेश आहे. 'विकसित भारत २०४७' या दूरदृष्टीशी सुसंगत, हा करार भारताला समानतेच्या स्तरावर जागतिक व्यापारात सहभागी करतो. सव्वा तीनशे वर्षांनी भारत केवळ बाजारपेठ परत मिळवत नाही - तर तो आपली गमावलेली आर्थिक शान पुन्हा मिळवत आहे.

**- सुधीर मुतालीक**
**नाशिक.**



जगाच्या पाठीवर कुठल्याही देशाला दुसऱ्या देशाच्या मदतीने झालेला दहशतवादी हल्ला स्वीकारावा लागू नये. भारताने केलेली कारवाई योग्यच असून भारताला याचा पूर्ण अधिकार आहे.
**ऋषी सुनक**, माजी ब्रिटिश पंतप्रधान


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.tarunbharat.net
सोलापूर, गुरुवार दि. ८ मे २०२५






भारताच्या कारवाईने आता तरी पाक काही शिकवण घेईल, अशी आशा आहे. ही फक्त पहिली कारवाई आहे. वाघाने फक्त पंजा उगारला आहे, अजून जबडा उघडायचा आहे.
**योगेश कदम**, गृहराज्यमंत्री




## कोण काय म्हणाले?



दहशतवादाला मुळापासून नष्ट करणे हा उद्देश आहे. आपल्या सशस्त्र दलांचा अभिमान आहे. ऑपरेशन सिंदूर हे पहलगाममध्ये आपल्या निष्पाप बांधवांच्या क्रूर हत्येला भारताने दिलेले उत्तर आहे.
**- अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

ऑपरेशन सिंदूर या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांनी एक मजबूत आणि स्पष्ट संदेश दिला. देशाला सशस्त्र दलांच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे.
**- अजित पवार**, उपमुख्यमंत्री



ऑपरेशन सिंदूरचे कौतुक करत दहशतवादी हल्ल्यानंतर कोणताही देश मूक प्रेक्षक राहू शकत नाही. भारत आक्रमक आहे.
**- शरद पवार**, राकाँशप नेते

पाकिस्तान आणि पीओकेमधून होणाऱ्या सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध भारताचे एक अढळ राष्ट्रीय धोरण आहे. भारतीय सशस्त्र दलांचा खूप अभिमान आहे.
**- मल्लिकार्जुन खडगे**, काँग्रेस अध्यक्ष

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी छावण्यांवर केलेल्या हल्याबद्दल भारतीय सशस्त्र दलांचे कौतुक केले.
**- हिमंता बिस्वा सरमा**, आसाम मुख्यमंत्री

देशाच्या संरक्षण दलांचा खूप अभिमान आहे. भारतीय सैन्याच्या धाडसाने आणि शौर्याने संपूर्ण देशाला अभिमान वाटला.
**- नितीश कुमार**, बिहार मुख्यमंत्री

ऑपरेशन सिंदूरचे स्वागत जय हिंद आणि जय हिंद की सेना.
**- योगी आदित्यनाथ**, उत्तर प्रदेश मुख्यमंत्री

सशस्त्र दलांचा अभिमान आहे आणि जय हिंद.
**- राहुल गांधी**, विरोधी पक्षनेते

सत्यमेव जयते. जय हिंद की सेना.
**- चिराग पासवान**, लोजपा नेते आणि केंद्रीय मंत्री

भारतीय सैन्य जिथे शत्रूला दुखापत होते तिथेच प्रहार करते.
**- बंदी संजय कुमार**, केंद्रीय गृह राज्यमंत्री

दहशतवादाविरुद्ध तामिळनाडू भारतीय सैन्यासोबत आहे. आपल्या देशासाठी, आपल्या सैन्यासोबत आहे.
**- एम के स्टॅलिन**, तामिळनाडूचे मुख्यमंत्री

दहशतवादावर सरकारचे शून्य सहिष्णुता धोरण सिद्ध झाले आहे. देव आपले रक्षण करणाऱ्यांचे रक्षण करो. आपल्या सैन्याच्या सुरक्षिततेसाठी आणि यशासाठी प्रार्थना करते.
**- कंगना राणावत**, भाजपा खासदार

### आंतरराष्ट्रीय नेते



पहलगाम हल्ल्यानंतर काहीतरी घडणार आहे याची लोकांना कल्पना होती. हे खूप लवकर संपेल, अशी आशा आहे.
**- डोनाल्ड ट्रम्प**, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष

मी भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. हे लवकरच संपेल अशी आशा आहे.
**- मार्को रुबियो**, अमेरिकेचे परराष्ट्र सचिव



दोन्ही देशांकडून जास्तीत जास्त लष्करी संयम बाळगावे. भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी संघर्ष जगाला परवडणारा नाही.
**- अँटोनियो गुटेरेस** , युनो सरचिटणीस

दक्षिण आशियातील शांतता आणि स्थिरतेसाठी, आम्ही भारत आणि पाकिस्तान दोघांनाही संयम बाळगण्याचे आणि संवादाद्वारे परिस्थिती स्थिर करण्याचे आवाहन करतो.
योशिमासा हयाशी
**- मुख्य मंत्रिमंडळ सचिव**, जपान

चीन दोन्ही बाजूंना शांतता आणि स्थिरतेच्या हितासाठी कृती करण्याचे, शांत राहण्याचे, संयम बाळगण्याचे आणि परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनवू शकतील, अशा कृती करण्यापासून दूर राहण्याचे आवाहन करतो.
**- परराष्ट्र मंत्रालय**, चीन

दहशतवाद्यांना हे माहित असले पाहिजे की गुन्ह्यांपासून लपण्यासाठी जागा नाही. इस्रायल भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराचे समर्थन करतो.
**- रुवेन अझर**, इस्रायलचे भारतातील राजदूत

शून्य सहिष्णुता. संपूर्ण न्याय. ऑपरेशन सिंदूर
**- शेखर कपूर**, चित्रपट निर्माते



# २०० उड्डाणे रद्द; १८ विमानतळे तात्पुरती बंद

## देशभरात हायअलर्ट जारी, निमलष्करी जवानांच्या सुट्या रद्द

**नवी दिल्ली, ७ मे**

भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत मंगळवारी मध्यरात्रीनंतर पाकिस्तानमधील दहशतवादी अड्ड्यांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. यानंतर पाकिस्तान हादरला, तर भारताने सुरक्षेच्या कारणास्तव पंजाब, श्रीनगर, जम्मूसह १८ विमानतळांवरील विमानांची उड्डाणे तात्पुरती बंद करण्यात आली आणि २०० हून अधिक उड्डाणे बुधवारी रद्द करण्यात आली. यामध्ये, एकट्या इंडिगोने सुमारे १६६ उड्डाणे रद्द केली. राजधानी दिल्ली विमानतळावरून अनेक उड्डाणे रद्द केली.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कर व हवाई दलाने संयुक्त अभियान राबवून ६-७ मे च्या रात्री पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी अड्ड्यांवर मोठा हल्ला केला आणि त्यांना उद्ध्वस्त केले. यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला आहे आणि देशभरात हाय अलर्ट जारी करण्यात आला. उत्तर आणि पश्चिम भारतातील किमान १८ विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले. या बंद विमानतळांमध्ये श्रीनगर, जम्मू, लेह, अमृतसर, पठाणकोट, चंदीगड, जोधपूर, जैसलमेर, शिमला, धर्मशाला आणि जामनगरचा समावेश आहे. आतापर्यंत २०० हून अधिक विमानांचे उड्डाणे रद्द करण्यात आली. दिल्ली विमानतळावरून ३५ हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आल्याची माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणाने निवेदन जारी करून दिली. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानातील विमानतळे ओस

भारताच्या कारवाईनंतर पाकिस्तानातील अनेक विमानतळे ओस पडली आहे. पाकिस्तानने देशातील विमान सेवा खंडीत केली. इस्लामाबाद विमानतळावरील अनेक विमान उड्डाणे रद्द केली. अनेक प्रमुख देशांनी पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून विमान प्रवास करणे टाळले आहे. पुढील सूचना येईपर्यंत दक्षिण आशियातील भारत-पाकिस्तानच्या हवाई हद्दीतील विमान सेवा फ्रान्सने निलंबित केली.




### विमान कंपन्यांचे स्पष्टीकरण

इंडिगो विमान कंपनीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, श्रीनगर, जम्मू, अमृतसर, लेह, चंदीगड, धर्मशाळा, बिकानेर आणि जोधपूर येथील सर्व उड्डाणे रद्द केली आहे. तर एअर इंडियाने एक्सवर लिहिले की, जम्मू, श्रीनगर, लेह, जोधपूर, अमृतसर, भुज, जामनगर, चंदीगड आणि राजकोट येथील उड्डाणे १० मेपर्यंत रद्द केली आहे. त्याच वेळी, स्पाइसजेट, अकासा एअरनेही अनेक उड्डाणे रद्द केली.

### गृहमंत्रालयाचे जवानांसाठी आदेश

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर भारतीय निमलष्करातील सर्व जवानांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व निमलष्करी दलांच्या प्रमुखांसोबत बैठक घेतल्यानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाकडून आदेश जारी करण्यात आला. रजेवर असलेल्या सर्व जवानांनी तत्काळ कर्तव्यावर हजर व्हावे असे आदेशात म्हटले आहे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या संदर्भातही महत्वाचे आदेश दिले आहेत.

# दहशतवाद्यांची नांगी ठेचताच पाकचे संरक्षण मंत्री नरमले

## ख्वाजा आसिफ म्हणाले, आम्ही भारतासोबत चर्चेस तयार

**इस्लामाबाद, ७ मे**



पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेत भारताने केलेल्या कारवाईने धडकी भरल्यामुळे पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ आता शुद्धीवर आले. भारताच्या कारवाईसंदर्भात एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले की, आम्हाला युद्ध नको आहे, भारतासोबत चर्चा करण्याची आमची तयारी आहे.

ख्वाजा आसिफ पुढे म्हणाले की, भारताने तणाव कमी केला तर पाकिस्तानही तणाव कमी करण्यास तयार आहे. आम्ही गेल्या पंधरवड्यापासून सतत सांगत आहोत की आम्ही कधीही भारताविरोधात कोणतेही शत्रुत्वाचे पाऊल उचलणार नाही; परंतु जर आमच्यावर यापुढे हल्ला झाला तर आम्ही प्रत्युत्तर देऊ. जर भारताने माघार घेतली तर आपण निश्चितच हा तणाव कमी करण्यास तयार आहे. भारताने आमच्या हवाई हद्दीत घुसखोरी करीत निवासी भागांना लक्ष्य केले. आम्ही याला योग्य उत्तर देऊ. (वृत्तसंस्था)

### आमच्यावर युद्ध लादले



भारताच्या कारवाईवर बोलताना पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ म्हणाले, भारताने आमच्यावर युद्ध लादले असून याला जोरदार प्रत्युत्तर देण्याचा पाकिस्तानला अधिकार आहे. आम्ही शांततेने हा मुद्दा सोडविण्यासाठी तयार होतो, परंतु भारताने आमच्या हवाई हद्दीत प्रवेश करून निवासी इमारतींवर हल्ले केले, आम्ही आता शांत बसणार नाही.

### चिथावणीला उत्तर देणार



पाकिस्तान लष्करातील प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारताच्या कृतीला प्रत्युत्तर देण्यासाठी आम्ही सज्ज आहे. बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबादमध्ये हवाई हल्ले झाले. या चिथावणीला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान वेळ आणि ठिकाणाची निवड करेल.

### चीनला पाकचा पुळका

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी निवेदन जारी करीत म्हटले की, भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या परिस्थितीवर आम्हाला चिंता आहे. दोन्ही देशांनी शांतता आणि स्थिरतेसाठी भूमिका घ्यावी. तसेच शांतता आणि संयम राखावा आणि परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ नये, याची काळजी घ्यावी.

## पंतप्रधान मोदींचा तीन देशांचा दौरा रद्द

**नवी दिल्ली, ७ मे**

पंतप्रधान मोदींचा नॉर्वे, क्रोएशिया आणि नेदरलँड्सचा दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी अड्ड्यांवर भारताने केलेल्या हल्ल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

मोदी १३ ते १७ मे दरम्यान क्रोएशिया, नॉर्वे आणि नेदरलँड्सचा दौरा करणार होते. पंतप्रधान नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी नॉर्वेला जाणार होते. यापूर्वी पंतप्रधान मोदींनी त्यांचा रशिया दौरा पुढे ढकलला होता. पंतप्रधान ९ मे रोजी मॉस्को येथे होणाऱ्या विजय दिन परेडला उपस्थित राहणार होते. (वृत्तसंस्था)



पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सशस्त्र दलाने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानसह व्याप्त काश्मिरातील दहशतवादी अड्ड्यांवर केलेल्या कारवाईचा जल्लोष साजरा करताना नागरिक.

# इस्रायलच्या धरतीवर भारताची कारवाई

### बंकर बस्टर बॉम्बचा वापर

### राफेल लढाऊ विमानातून साधले अचूक लक्ष्य

**नवी दिल्ली, ७ मे**

इस्रायलने २०२४ मध्ये हिजबुल्लाह नेतो हसन नसरल्लाह याला मारण्यासाठी ८०-८५ बंकर बस्टर बॉम्ब वापरले होते. भारतानेदेखील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी याच बॉम्बचा वापर केल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

बंकर बस्टर बॉम्ब हे खोल बंकर, भूमिगत सुविधा आणि मजबूत संरचना नष्ट करण्यासाठी डिझाइन केलेले शस्त्र आहेत. हे बॉम्ब जमिनीत ३०-६० फूट खोलीपर्यंत घुसतात आणि स्फोट होतात. त्यांचे वजन ९०० किलो ते १३,६०० किलोपर्यंत असू शकते. भारताने राफेल लढाऊ विमानांमधून डागण्यात येणारे क्रूझ क्षेपणास्त्र (रेंज: ५६० किमी) आणि हॅमर प्रिसिजन-गाइडेड दारूगोळा वापरला. ही शस्त्रे बंकर नष्ट करण्यास सक्षम आहे. (वृत्तसंस्था)

### आत्मघाती ड्रोन म्हणजे काय?

लोटेरिंग दारूगोळ्यांना आत्महत्या किंवा कामिकाझे ड्रोन असेही म्हणतात. ही मानवरहित हवाई शस्त्रे आहेत. त्यांचे वैशिष्ठ्य म्हणजे ते त्यांच्या लक्ष्याच्या वर आकाशात घिरट्या घालत राहतात आणि निर्धारित लक्ष्यावर प्रहार करतात. १९८० च्या दशकात पहिल्यांदा आत्मघाती ड्रोनचा वापर सुरू झाला, परंतु १९९० आणि २००० च्या दशकात त्यांचा वापर वाढला. येमेन, इराक, सीरिया आणि युक्रेनमधील युद्धांमध्ये या ड्रोनचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे.

# तैयबा, जैशने उभारलेले अड्डे २५ मिनिटांत ध्वस्त

**पाकिस्तानी लष्कर , खाडी देशातून आलेला पैसा आणि ओसामा बिन लादेनच्या मदतीने लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबूल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांनी उभारलेले अड्डे भारतीय हवाई दलाने अवघ्या २५ मिनिटांच्या कारवाईत जमीनदोस्त केले.**

### १ मरकज सुभान अल्लाह- बहावलपूर (पंजाब-पाकिस्तान)

कुख्यात दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय असून २०१५ पासून जैशचे मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्यरत आहे. मौलाना मसूद अजहर संघटनेचा म्होरक्या आहे. सध्या मुफ्ती अब्दूल रऊफ अशगर याच्या हाती बहावलपूर येथील मरकजचे काम आहे. येथे एकाचवेळी शेकडो दहशतवाद्यांना शस्त्रांचे आणि धार्मिक प्रशिक्षण दिले जाते. हा अड्डा आता मातीत मिसळला आहे.

### २ सरजाल /तेहला कालन- नरावली (पंजाब-पाकिस्तान)




जम्मूमधील सांबा सेक्टरपासून अवघ्या सहा किलोमीटर अंतरावरील हा जैशचा अड्डा आहे. सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आड येते जैश-ए-मोहम्मद दहशतवादी अड्डा सुरू होता. येथूनच भारतीय सीमेत घुसून सैनिकांवर हल्ले केले जातात किंवा दहशतवाद्यांना घुसखोरीसाठी मदत केली जाते. सुरूंग खोदण्याचे अथवा ड्रोनच्या मदतीने भारतीय हद्दीत शस्त्रे, गोळाबारूद आणि मादक पदार्थ टाकण्याचे कामही येथूनच केले जाते.

### ३ मसकार राहील शाहीद अड्डा- कोटली (व्याप्त काश्मीर)

नियंत्रण रेषेला लागून असलेला हा कोटली येथील जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा अड्डा आहे. येथील भौगोलिक परिस्थिती पाहता येथे दहशतवाद्यांना पर्वतीय भागात लढण्याचे प्रशिक्षण दिल्या जाते. कुख्यात बॉर्डर ॲक्शन टीमही येथेच कार्यरत आहे.

### ४ मरकज सैय्यदना बिलाल- मुजफ्फराबाद (व्याप्त काश्मीर)

व्याप्त काश्मीरची राजधानी मुजफ्फराबाद येथील येथील लाल किल्ल्याच्या समोर जैशचा हा महत्वाचा अड्डा आहे. येथेच पाकिस्तानी लष्करातील स्पेशल सर्विस ग्रुपकडून दहशतवादयांना घुसखोरीचे प्रशिक्षण दिले जाते. येथे १०० दहशतवाद्यांना प्रशिक्षित करण्याची सोय आहे.

### ५ मरकज तैयबा-मुदरिके-शेखुपूरा (पंजाब-पाकिस्तान)

अमेरिकेने ठार मारलेला दहशतवादी ओसामा बिन लादेनने पुरविलेल्या पैशातून हा अड्डा तयार करण्यात आला. येथे दरवर्षी जवळपास १००० दहशतवादी प्रशिक्षित केले जातात. हा लष्कर-ए-तैयबाचा मुख्य तळ आहे. मोहम्मद हाफीज हा तैयबाचा म्होरक्या आहे. मुंबईवर हल्ला करणाऱ्या अजमल कसाबने येथेच प्रशिक्षण घेतले होते. येथील परिसरात मशिद असून आलीशान गेस्ट हाऊस होते. जागतिक पातळीवरील कुख्यात दहशतवादी येथेच आश्रयाला येतात.




### ६ मरकज अहले हदीस बरनाला- भिम्बेर (व्याप्त काश्मीर)




व्याप्त काश्मीरमधील बरनाला शहराजवळ हा लष्कर-ए-तैयबाचा दहशतवादी अड्डा आहे. येथूनच पुंछ, राजोरी आणि रियासीमध्ये घुसखोरांना पाठविण्यात येते. येथे १०० ते १५० दहशतवादी कार्यरत असतात.

### ७ शावई नल्लाह कॅम्प- मुजफ्फराबाद (व्याप्त काश्मीर)

लष्कर-ए-तैयबाचा हा व्याप्त काश्मीरमधील महत्वाचा अड्डा असून येथे एकाचवेळी २५० पेक्षा जास्त दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते. मुंबईवर २६ नोव्हेंबर २०११ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील दहशतवाद्यांना येथेच प्रशिक्षण दिले होते. येथे पाकिस्तानी लष्कराच्या जवानांची उपस्थिती असते आणि युवकांना धार्मिक प्रशिक्षणही दिले जाते.

### ८ मेहमूना जोया - सियालकोट (पंजाब-पाकिस्तान)




भुट्टा कोटली येथील शासकीय जागेत हिजबूल मुजाहिदीनचा हा दहशतवादी अड्डा कार्यरत आहे. जम्मू क्षेत्रात घुसखोरांना पाठविण्यापूर्वी दहशतवाद्यांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिल्या जाते.

### ९ मरकज अब्बास - कोटली- (व्याप्त काश्मीर)




नियंत्रण रेषेजवळ शंभर ते सव्वाशे दहशतवाद्यांना प्रशिक्षित करण्याची सोय या अड्डयावर आहे. राजौरी आणि पुंछ क्षेत्रात येथूनच घुसखोरी केली जाते. हा जैश-ए-मोहम्मदचा तळ आहे.

## अग्रलेख...

# दहशतीचे उत्तर दबंगाईनेच दिले पाहिजे

पहलगाममधील भ्याड हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर केलेला हवाई हल्ला हे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला दिलेले दबंग स्वरूपाचे उत्तर आहे. या कारवाईने पाकिस्तानची घाबरगुंडी उडणे आणि उर्वरित जगाला आश्चर्य वाटणे स्वाभाविकच. कारण विश्वशांतीसाठी निरंतर प्रयत्नशील असलेल्या भारताचा हा स्वभाव नाही. परंतु, यावेळी भारताचा नाईलाज झाला. कितीही शांतता पाळली, संयम दाखविला तरी आपल्या अंगावर कुणी वारंवार धावून येत असेल, आपल्या निरपराध नागरिकांची निर्घृण हत्या करीत असेल तर असा दबंगपणा आवश्यकच असतो. शक्तिशाली माणसाचाच शांतिपाठ जग ऐकत असते ही रीत आहे. त्यामुळे आपण शक्तिशालीच नव्हे तर महाशक्तिशाली आहोत, हे दाखविणे भारताला भाग होते. भारताच्या तिन्ही सैन्य दलांनी मिळून पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेली लष्करी कारवाई हा आमच्यावरचा हल्ला आहे, असे पाकिस्तानला कितीही म्हणू देत; वास्तव असे की, जशास तसेच उत्तर द्यावे लागते आणि तेच भारताने दिलेले आहे.

हजारो वर्षांचा इतिहास असलेला भारत हा देश शांतता, सहिष्णुता आणि जागतिक सौहार्दाचा पुरस्कार करणारा देश आहे. धर्माधिष्ठित फाळणीनंतर निर्माण झालेल्या पाकिस्तानला या इतिहासाचा काहीच गंध उरलेला नाही. फाळणीच्या आधी आपली सध्याची भूमी ही त्याच हिंदू पुण्यभूमीचा भाग होती, हे पाकिस्तानी सरकार, तिथले दहशतवादी आणि तिथले लष्कर पूर्णपणे विसरले. त्यामुळेच त्यांना भारत सदैव शत्रूच वाटत राहिला. त्याचसाठी त्यांनी नेहमी दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले, रसद पुरविली आणि पाठिंबा दिला. भारताचा अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमला पाकिस्तानने आश्रय दिला. भारतीय संसदेवरील हल्ल्यापासून पुलवामा आणि पहलगामपर्यंत सर्व अतिरेकी हल्ल्यांचे धागेदोरे पाकिस्तानशी जुळलेले. दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये धर्म विचारून भारतीय नागरिकांना गोळ्या घातल्या आणि वरून तुमच्या पंतप्रधानांना जाऊन सांगा, अशी गुर्मीही दाखविली. तरीही भारताने प्रत्युत्तर द्यायचे नाही, अशी पाकिस्तानची अपेक्षा असेल तर ती चूक आहे. असे पाकिस्तानमध्ये घडले असते तर तो देश शांत बसला असता काय? दहशतवादाला ताकदीनिशी प्रत्युत्तर देण्यास भारताला भाग पाडले गेले आहे. पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देतो की, तिथले सरकार व लष्करच दहशतवादी चालवितात, हेच जगाला कळेनासे झालेले आहे. सरकार आणि दहशतवाद यांच्यातील दिलदारी सर्वज्ञात आहे. अशा स्थितीत लष्करी कारवाई करणे न्याय्य, नैतिक आणि अपरिहार्य ठरते.

पाकिस्तानी नागरिक अजमल कसाबने केलेल्या २६/११ च्या मुंबई हल्ल्यामागील चिथावणीपासून ते पाकिस्तानी भूमीवर असलेल्या मसूद अझहर आणि हाफिज सईद यांच्यासारख्या जागतिक पातळीवर कुख्यात असलेल्या दहशतवाद्यांना पोसण्याच्या पापापर्यंत सारेच पाकिस्तान वारंवार करीत आला आहे. शांतताप्रिय भारताच्या संयमाची परीक्षा वारंवार घेतली गेली. बहुतेकदा भारताने संयम राखला. पण, संयमाची किंमत वारंवार निष्पापांच्या जिवाने मोजावी लागत असेल तर त्याचा त्याग करावा लागतो. अहिंसेची स्थापना करण्यासाठी काही वेळा हिंसा न्याय्य ठरते. तेच भारताने केले आहे. पहलगाम हल्ला हा समस्त भारतीयांसाठी मानसिक धक्का होता. यातून सारेच तत्काळ सावरले. केंद्र सरकारने तयारी केली आणि घरात घुसून मारण्याची आपली क्षमता असल्याचे जगाला दाखवून दिले. भारतासोबत सतत असे घडत राहिले तरी तो शांत राहील, अशी स्थिती राहिलेली नाही. यह नया भारत है, असे लोक उगाच म्हणत नाहीत. भारत ही जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे. ती लवकरच चौथ्या क्रमांकावर येणार असल्याचा अंदाज जागतिक पातळीवर वर्तविला जात आहे. पृथ्वीवरील सर्वांत शक्तिशाली सशस्त्र दलांपैकी एक लष्कर भारताचे. तथापि, भारताने कधीही कुणाचा भूभाग हडपण्यासाठी किंवा वर्चस्व गाजवण्यासाठी आपल्या शक्तीचा वापर केलेला नाही. दहशतवादाची जगभरात निर्यात करणाऱ्या पाकिस्तानसारख्या वाहियात देशांमध्ये आणि संकटाच्या प्रसंगी संपूर्ण मानवतेच्या मदतीला धावणाऱ्या भारतामध्ये हा सर्वांत मोठा फरक. भारताच्या सहनशीलतेला कमकुवतपणा समजण्याची नादानी आतापर्यंत पाकिस्तानने वारंवार केली. २०१६ मध्ये उरी हल्ल्यानंतर झालेल्या सर्जिकल स्ट्राईकने पाकिस्तान आणि त्यांच्या दहशतवादी पिलावळीने सुधारायला हवे होते. तसे झाले नाही. पहलगाममध्ये त्यांनी अधिक धारिष्ट्य केले. त्याची किंमत भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ ध्वस्त करून वसूल केली आहे. भारत हे शांततेला प्राधान्य देणारे राष्ट्र असले तरी त्याला गृहीत धरता येत नाही, हेही आपल्या लष्कराने दबंगगिरी करीत सांगून टाकले आहे. हे करताना देखील भारताने नागरिकांना आणि अन्य ठिकाणांना हानी पोहोचणार नाही, याची काळजीच घेतली. पाकिस्तानला अशी मानवता कधी दाखविता येईल? आमच्यावर अन्याय झाल्याचे रडगाणे गाणाऱ्या पाकिस्तानचे पंतप्रधान, लष्करप्रमुख, आयएसआयचे प्रमुख यांच्यातल्या कुणीही याचे उत्तर देऊ शकत नाही. लष्करावर पूर्णपणे अवलंबून असलेले आणि भारतद्वेषाने पछाडलेले सत्ताधीश, स्वार्थासाठी देशाच्या सत्तेवर अंकुश ठेवू इच्छिणारे लष्कर आणि सतत भारताच्या व हिंदूंच्या विरोधात प्रचार करणाऱ्या मुल्ला-मौलवींच्या छत्रछायेत तयार झालेली पाकिस्तानी जनतेची मानसिकता असे चित्र असेल तर त्या देशाला कोणतेही भविष्य नाही. भारताने कधीही धर्मांधतेला थारा दिला नाही. त्याने ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांत जगाच्या बरोबरीने प्रगती केली. भारतीय डॉक्टर्स, अभियंते, शास्त्रज्ञ यांचा जगात डंका वाजतो. आणि पाकिस्तानचे नाव गाजते ते दहशतवाद्यांसाठी! खरे तर पाकिस्तानच्या सत्ताधीशांना या गोष्टीची लाज वाटली पाहिजे. अशा गोष्टींवर विचार व कृती करायची सोडून समस्त पाकिस्तानी व्यवस्था भारताच्या विरोधात कुरघोड्या करण्याच्या मागे असेल तर कधी तरी त्याला असा धडा शिकवायलाच हवा होता. अजमल कसाब हे पाकिस्तानचे अपत्य. अतिरेक्यांना आश्रय देण्याच्या पाकिस्तानच्या परंपरेचे प्रतीक म्हणून त्याने भारतात येऊन हल्ला केला. आजही पाकिस्तानात हाफिज सईद भारतद्वेषाचा प्रचार करीत मुक्तपणे फिरतो. संयुक्त राष्ट्रांनी जागतिक दहशतवाद्यांच्या यादीत नाव टाकले असले तरी मसूद अझहर हा तिथल्या राज्यकर्त्यांचे आतिथ्य उपभोगतो. जगातील सर्वांत खतरनाक दहशतवादी ओसामा बिन लादेन अफगाणिस्तानातील गुहांमध्ये लपलाय, असे वाटत होते. पण, त्याला पाकिस्तानने आश्रय दिला होता. पाकिस्तानच्या लष्करी अकादमीपासून थोड्या अंतरावर असलेल्या अबोटाबादमधील एका बंगल्यात ओसामा राहत होता. अमेरिकन लष्कराने तेथे थेट जाऊन त्याला ठार केले. अमेरिकेचे ते कृत्य बरोबर असेल तर भारताचेही बरोबरच आहे. अद्याप शांततेची पुंगी वाजवीत असलेल्या देशी व विदेशी थोर माणसांनी आता तरी भारताची कारवाई जागतिक परिप्रेक्ष्यात समजून घेतली पाहिजे. अमेरिकेने पाकिस्तानची परवानगी न घेता ओसामा बिन लादेनला संपवण्याचा आपला अधिकार वापरला. इस्रायलने गाझा आणि वेस्ट बँकमध्ये हमासच्या कार्यकर्त्यांना संपवण्यासाठी वारंवार लक्ष्यित कारवाया केल्या. आपल्या देशावर किंवा नागरिकांवर परकीय शक्ती हल्ला करतो तेव्हा स्वसंरक्षणासाठी कुणाची परवानगी घेण्याची रीत नाही, असेच ही उदाहरणे सांगतात. भारताची कारवाई याच उदाहरणांत बसणारी आहे. भारताने हवाई हल्ल्यांच्या माध्यमातून पाकिस्तानी जनतेला किंवा पायाभूत सुविधांना लक्ष्य केले नाही. पाकिस्तानी व्यवस्थेचे संरक्षण असलेल्या व दहशतवाद्यांकडून वापरल्या जात असलेल्या शिक्षण शिबिरांना आणि लाँच पॅड्सना लक्ष्य केले. त्यात जे ठार झाले, त्यांचा संबंध दहशतवादाशीच होता. दहशतवादाची मुळे खोलवर गेलेली आणि शाखांचा विस्तार नजरेच्या टप्प्यांत न येणारा असतो. त्यामुळे त्याला लांबी-रुंदीसह संपवायचे असते. सापावर दया दाखवायची नसते. ती दाखविली तर अंत निश्चित असतो. अमेरिकेला त्यांनी छळले. युरोपमध्ये अस्थिरता निर्माण केली. आशियातही त्यांच्या कारवायांना सुमार राहिलेला नाही. दहशतीला दबंगाईनेच उत्तर द्यायचे असते. ते देण्याची ही नुसती सुरुवात आहे. आगे-आगे देखिए होता है क्या! ▮

## विशेष

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

# भारताने ताकद दाखवली



७ मे या दिवसाची भारतच नव्हे, तर जग आवर्जून नोंद घेत राहील. कारण याच दिवशी पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या भ्याड हल्ल्याला तीव्र स्वरूपाचे प्रत्युत्तर दिले गेले. निरपराध पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या, जीवे मारताना धर्म विचारणाऱ्या पाशवी वृत्तीला मिळालेली ही सणसणीत चपराक म्हणायला हवी. पहलगाममधील घटनेनंतर भारत या हल्ल्याचा बदला कधी घेणार, हा प्रश्न विचारला जात होता. मात्र एकीकडे सर्वसामान्य जनता बहुचर्चित मॉक ड्रीलच्या तयारीत असताना भारताने एअर स्ट्राईक केला. याला 'ऑपरेशन सिंदूर' असे भावस्पर्शी नाव दिले गेले. यापूर्वी आपण उरी हल्ला पाहिला आहे. मात्र, त्या आणि ताज्या हल्ल्यामधील गुणात्मक फरक जाणून घेणे तसेच त्या अनुषंगाने अन्य बाबींवर चर्चा करणे गरजेचे आहे.

पहिली बाब म्हणजे पूर्वीचा उरी हल्ला व्याप्त काश्मीरपर्यंतचा होता. तेथील जैश-ए-महम्मद वा लष्कर-ए-तोयबा या गेल्या दोन दशकांपासून भारत आणि विशेषतः जम्मू आणि काश्मीरमध्ये हिंसाचार पसरवण्याचे काम करणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना उद्ध्वस्त करण्याचे काम या पहिल्या सर्जिकल स्ट्राईकने केले. आजचा आपला ताजा हल्ला गुणात्मकदृष्ट्या वेगळा आहे. यावेळी आपण व्याप्त काश्मीरमधीलच नव्हे, तर पाकिस्तानमधील दहशतवादी अड्डेही लक्ष्य केले. त्यांच्या पंजाब प्रांतातील जैश-ए-महंमदचा गड उद्ध्वस्त केला. तेथील सर्वांत मोठ्या मशिदीतील मदरसे भुईसपाट केले. येथूनच दहशतवादी कृत्यांसाठी तरुणांना भडकवण्याचे आणि तयार करण्याचे काम होत होते. हे प्रशिक्षित दहशतवादी तालिबान, इसिस, अल कायदासारख्या दहशतवादी संघटनांसाठी कार्यरत होत होते. अझर मसूदने उभारलेले तेच बहावलपूरमधील ठाणे आपण उद्ध्वस्त केले तसेच सीमारेषेपासून २० किलोमीटर आतमध्ये लष्कर-ए-तोयबाचा भागही उद्ध्वस्त केला आहे. म्हणजेच व्याप्त काश्मीरपुरते मर्यादित न राहता आता आपण पाकिस्तानमधील अंतर्गत ठिकाणांवरही हल्ला चढवला आहे. हल्ल्यातील हे वेगळेपण नोंद घेण्याजोगे आहे.

इथे मांडण्याजोगा दुसरा मुद्दा म्हणजे पाकिस्तानकडून बालाकोटाचा हल्ला झाल्याचे मान्य करण्यात आले नव्हते. यावेळी पाकिस्तानने अधिकृतपणे आपल्या देशातील नऊ ठिकाणांवर भारताने हल्ला केल्याचे स्पष्ट केले आहे. यात किती जणांचे प्राण गेले, किती जखमी झाले याची आकडेवारीही सांगितली आहे. तिसरी बाब म्हणजे मागील हल्ल्याप्रसंगी आपली लढाऊ विमाने नियंत्रण रेषा ओलांडून आत घुसली होती. यावेळी आपण ही सीमा पार केली नसून आपल्याच हद्दीमधून त्यांना उडवले आहे. यावरूनही आपल्या लढाऊ विमानांची, क्षेपणास्त्रांची, हल्ल्याची क्षमता सिद्ध होते. आपल्याकडे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ आहे. या माध्यमातून सैन्याच्या तिन्ही दलांमध्ये एकवाक्यता आणि सुसूत्रता आहे. परिणामस्वरूप ताजा हल्ला एअरफोर्स आणि ग्राऊंड फोर्स यांच्या एकत्रित साहाय्याने पूर्ण केला गेला. त्यामुळेच तो संघटित होता, सुनियोजित होता. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या हल्ल्यात आपण एकाही सामान्य नागरिकाला, पाकिस्तानमधील लष्करी आस्थापनांना नुकसान पोहोचविलेले नाही. त्यामुळेच आपल्यावर कोणीही आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केल्याचा आरोप करू शकत नाही.

खरे तर भारत हा अत्यंत संयमी, जबाबदार देश आहे. अगदी इतिहास काळापासून पाहिले तरी आपण कधीच कोणावर प्रथम हल्ला केलेला नाही, हे दिसते. आताही आपण तसे करत नाही. त्यामुळेच भारताने केलेल्या ताज्या हल्ल्याचे स्वरूप धोका असणारी ठिकाणे आधीच उद्ध्वस्त करणे या स्वरूपाचा आहे. स्वाभाविकच संयुक्त राष्ट्र समूहानेही याला मान्यता दिली आहे. याच मुद्द्यांच्या आधारे इस्रायलने हमास, लेबनॉन, इराणवर अनेकदा हल्ले केले होते. याच मुद्द्याच्या आधारे अमेरिकेने इराकमध्ये आपले सैन्य घुसवले होते. या पृष्ठभूमीवर पाकिस्तानमधील या भागातील मदरशांमध्ये दहशतवाद्यांची भरती प्रक्रिया आणि प्रशिक्षण होत असल्याचे माहिती असल्यामुळे ही वस्तिस्थाने नामशेष करण्याची आपली कृती समर्थनीय ठरते. तेथे प्रशिक्षण घेणारे दहशतवादी पुढे सीमा ओलांडून भारतात घुसतात आणि नरसंहार घडवून आणतात. त्यांना संपवण्यामागे आपल्यापुढील धोका कमी करणे हाच स्पष्ट हेतू दिसतो.

हे करताना आपल्याकडून कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन वा भंग झालेला नाही. कारण हा हल्ला कोणत्याही देशावर नसून तेथे शरण घेणाऱ्या दहशतवादी संघटनांवर आहे. असे असतानाही पाकिस्तानकडून सडेतोड उत्तर देण्याची धमकी देण्यात आली आणि काही आगळिक झाली तर मात्र तो आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असेल, असे सांगितले गेले. पाकिस्तानने आपल्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला तर अर्थातच त्यांना तो भारताच्या लष्करी तळांवर करावा लागेल. येथील सर्वसामान्य नागरिकांवर करावा लागेल. असे केले तर पाकिस्तानकडून युद्धाच्या हेतूने पाऊल टाकले गेल्याचे म्हणता येईल. हा निश्चितच आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असेल आणि भारताला प्रचंड ताकदीने त्यांना प्रतिकार करण्याचा अधिकार असेल.

पाकिस्तानपुढील प्रश्न आता अधिक जटिल बनले आहेत, यात शंका नाही. हे लक्षात घेऊनच पाकिस्तानने आक्रस्ताळेपणा करण्यास सुरुवात केल्याचे दिसले. भारताने केलेल्या ताज्या हल्ल्यात आपले काही नागरिक, महिला, लहान मुले मारले गेल्याचे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसा तो सातत्याने होत राहील. कारण भारतावर हल्ला करण्याचे कारण पुढे करायचे तर आपल्याकडे तसे काहीही नाही. आपल्याकडे दहशतवाद्यांची प्रशिक्षणस्थळे नाहीत. भारत कधीही इतर देशांमध्ये दहशतवादी पाठवत नाही. त्यामुळे पाकिस्तान इथे नेमके काय उद्ध्वस्त करणार? हा प्रश्न आहे. याचे कारण शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायापुढे आपले सामान्य नागरिक मारले गेल्याचा कांगावा केला जाईल. पण त्यांचा हा प्रयत्न केविलवाणा म्हणाला लागेल. त्याला यश वा जगाकडून समर्थन, सहानुभूती मिळणार नाही. अर्थात शत्रूला कधीही कमी समजायचे नसते. ताकद नसली तरी पाकिस्तान फणा काढणारच नाही, असे समजून चालणार नाही. आपले एक क्षेपणास्त्र त्यांचे नुकसान घडवू शकत असेल तर त्यांचे एक क्षेपणात्र आपलेही मोठे नुकसान करू शकते. त्यामुळे हल्ला रोखण्यासाठी भारत कोणती पावले उचलतो, कोणती सिद्धता करतो हे आता पाहावे लागेल. माझ्या मते, कितीही वल्गना केल्या जात असल्या, तरी पाकिस्तान प्रत्युत्तर देईल, असे वाटत नाही. कारण त्यांचा कोणताही हल्ला रोखण्यासाठी आपल्याकडे पुरेशी यंत्रणा आहे. त्यांची क्षेपणास्त्रे रोखणारी अर्ली वॉर्निंग सिस्टिम आपल्याकडे आहे. ▮

(लेखक संरक्षण क्षेत्राचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# अपयशाचा उत्सव!

गुणवत्तायादीत अव्वल येऊन उत्तम यश संपादन करणाऱ्या मुलांचे कौतुक तर सारेच करतात. दहावी-बारावीच्या परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक सर्वत्र आनंद साजरा करताना, एकमेकांना पेढे भरविताना दिसतात. मात्र दुसरीकडे अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली जाते. यशाचा उत्सव साजरा करणे ही तर आपली परंपरा आहे. मात्र अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांना धीर देण्यासाठी, त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी उत्सव करण्याची अशी कुठलीही परंपरा समाजात नाही. मग अपयश आलेल्या विद्यार्थ्यांनी काय करायचे? त्याने पालकांचे, शेजाऱ्यांचे फक्त टोमणे ऐकायचे का? जणू एक परीक्षा नापास झाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे आयुष्यच संपल्यासारखे आपण त्याच्याशी वागू लागतो. पण आपल्या लक्षात हे येत नाही की, असल्या प्रकारांवर त्या अपयशी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास गमविला जातो. काही मुले तर हा धक्का सहन करू न शकल्याने आत्महत्येचा मार्ग सुद्धा निवडतात. मुले असा टोकाचा निर्णय का घेतात? कधी पालकांनी किंवा समाजाने याचा विचार केला आहे का? अपयशी मुलांना कोसणाऱ्या पालकांच्या आणि टोमणे मारणाऱ्या समाजातील लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजण घालण्याचे काम कर्नाटकातील एका कुटुंबाने केले आहे. कल्पनेच्या पलीकडे जाऊन या कुटुंबाने त्यांच्या मुलाच्या अपयशाचा दिवस एखाद्या उत्सवासारखा साजरा केला. कर्नाटकातील बागलकोट येथील बसवेश्वरा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिकणारा अभिषेक चोलचागुड्डा हा विद्यार्थी दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत एकूण सहा विषयात नापास झाला. त्याला एकूण ३२ टक्के गुण म्हणजे ६२५ पैकी २०० गुण मिळाले. त्याचा असा निकाल पाहिल्यानंतर पालकांनी त्याला रागाविले नाही तर त्याच्यासाठी सरप्राईज पार्टी आयोजित केली. आपल्या अपयशी मुलासाठी त्यांनी एक खास केक मागविला. संपूर्ण कुटुंबासह अभिषेकने केक कापून सर्वांना मिठाई वाटली. आणि हे सगळे करताना अभिषेकच्या चेहऱ्यावर हास्य होते. अभिषेकचे वडील यल्लप्पा चोलचागुड्डा म्हणतात की, अभिषेकला परीक्षेत ३२ टक्के गुण मिळाले असले, तो अपयशी झाला असला तरी त्याने परीक्षेदरम्यान खूप मेहनत घेतली होती. वर्षभर परिश्रम घेऊनही त्याला अपयश आले. त्याची मेहनत खरी होती. म्हणून आम्ही त्याच्या परिश्रमासाठी अपयश आल्यानंतरही तो दिवस उत्सवासारखा साजरा केला. यातून तो एकटा नाही, याची आम्ही त्याला जाणीव करून दिली. पुढे जाऊन अभिषेकचे वडील म्हणतात, हा उत्सव त्याचे अपयश लपविण्यासाठी मुळीच नव्हता, तर त्याच्या प्रयत्नांची कबुली देण्यासाठी होता. त्यांच्या मते या छोट्याशा उत्सवामुळे त्यांच्या मुलाचा आत्मविश्वास परत आला, आणि आता तो पुढील प्रयत्नांसाठी पूर्णपणे तयार आहे. वडिलांनी साजरा केलेल्या या उत्सवानंतर अभिषेक म्हणाला, मला माझ्या कुटुंबाने अपयश आल्यानंतर एकटे पडू दिले नाही. आता मी पुढच्यावेळी नक्कीच यशस्वी होणार. मुळात मुलांना परीक्षेत मिळालेल्या गुणांवरून पालक मुलांची हुशारी ठरवीत असतात.

अपेक्षेप्रमाणे परीक्षेत गुण मिळाले नाही तर पालक मुलांवर रागावतात, संताप व्यक्त करतात. परिणामी अपयशी ठरलेली मुले घरातील तणावग्रस्त वातावरणामुळे मानसिकरीत्या खचून जातात. आणि टोकाचे पाऊल उचलतात. प्रत्येकच पालकाला आपला मुलगा डॉक्टर किंवा इंजिनीअर व्हावा आणि तो देखील नामांकित संस्थेमधून व्हावा अशी अपेक्षा असते. आपण मुलांची आवड, त्यांची क्षमता, त्यांच्या सभोवतालचे वातावरण या गोष्टींकडे दुर्लक्ष करून यशाचे मोजमाप करताना त्याला मिळालेल्या गुणांच्या आकडेवारीवर नजर राखून धरतो. सध्या इथेच पालक चुकत आहेत. अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना टोमणे मारण्यापेक्षा, त्यांना कोसण्यापेक्षा, त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास अपयश आलेले विद्यार्थी सुद्धा भविष्यात उंच भरारी घेऊ शकतील. केवळ दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत मिळालेल्या गुणांवरून त्यांची हुशारी ठरविण्यापेक्षा अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना समजून घेतल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल. खऱ्या अर्थाने अपयशी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी फेल्युअर पार्ट्यांच्या आयोजनाची गरज आहे. आयुष्यात अनेक चढ-उतार येतच राहणार. परीक्षा म्हटलं की कुणीतरी पास, कुणीतरी नापास होणार. अशा क्षणी पुन्हा एकदा नव्या जोमाने संघर्ष करण्यासाठी आपल्या मुलाला किंवा मुलीला मानसिक आधार देणे पालकांचे कर्तव्य आहे. अपयशाने निराश न होता, पुन्हा अभ्यास करून स्पर्धेच्या युगात ताठ मानेने पाल्याला उभे करणे, त्याच्यात सकारात्मक विचार रुजवणे आवश्यक आहे. हिंमत न हारता, तू चालत राहा. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत, असा भाव त्याच्यात निर्माण केला पाहिजे. अभिषेकच्या अपयशाचा उत्सव विद्यार्थ्यांना टोकाचे पाऊल उचलण्यापासून नक्कीच वाचवू शकेल. ▮

९९२२९९९५८८

# बलिदानातून गोत्रजांचा उद्धार करणारी वासवी माता

## विशेष

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर (७५८८२१६५२६)**

आंध्र प्रदेशातील पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील थानकुसा तालुक्यात पेनुगोंडा नावाचे एक गाव आहे. प्राचीन काळी पेनुगोंडा हे राज्य होते, या राज्यामध्ये राजा कुसुमश्रेष्ठी व राणी कुसुमांबा हे राज्य करत होते. या दांपत्याला बऱ्याच वर्षानंतरही मूल होत नव्हते म्हणून ते आपले गुरु भास्कराचार्य यांना शरण गेले. भास्कराचार्यांनी राजा कुसुमश्रेष्ठीला पुत्रकामेष्टी यज्ञ करण्यास सांगितले. आपल्या गुरुच्या आज्ञेप्रमाणे कुसुमश्रेष्ठींनी यज्ञ केला व या यज्ञामुळे देवता प्रसन्न झाल्या, त्यांनी यज्ञेश्वरामार्फत प्रसाद दिला आणि त्याचवेळी आकाशवाणी झाली, की हा प्रसाद ग्रहण केल्यानंतर कुसुमश्रेष्ठी - कुसुमांबा यांना आपत्य होईल, त्याचवेळी सर्व देवतांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्यानंतर कुसुमांबा यांनी वैशाख शुद्ध दशमी, वार शुक्रवार, उत्तरा नक्षत्रावर कन्या राशीमध्ये दोन जुळ्यांना जन्म दिला. मुलाचे नाव वीरूपाक्ष व मुलीचे नाव वासवी ठेवण्यात आले. अत्यंत संस्कारी वातावरणात विरूपाक्ष व वासवी हे दोघे हळूहळू मोठे होत होते.

याचवेळी क्षत्रियांचा राजा विष्णूवर्धन हा युद्धामध्ये विजय मिळवून आपल्या राज्यात परत जाताना पेनुगोंडा या राज्यात आला, त्यावेळी राजा कुसुमश्रेष्ठींनी त्यांचे आदरातिथ्य करून विजयी मिरवणूकही काढली. या समयास आपल्या परिवाराची कुसुमश्रेष्ठींनी राजा विष्णुवर्धन यास परिचय करून दिला, त्यावेळेस वासवीला पाहून राजा विष्णुवर्धन प्रभावीत झाला व तो तिच्या प्रेमात पडला. राजा विष्णुवर्धन आपल्या राज्यात परतला खरा, परंतु त्याच्या मनात सातत्याने वासवीबरोबर विवाह करण्याचा विचार घोळत होता. खरे तर विष्णुवर्धन हा राजा विवाहित होता, त्यास पत्नी व आपत्येदेखील होती. तसेच तो वेगळ्या कुळामध्ये - वर्णामधील होता, तरीही वासवीबरोबर लग्न करण्याचा त्याने विचार पक्का करून तशी मागणी राजा कुसुमश्रेष्ठी यांच्याकडे केली.

विवाहाचा प्रस्ताव देऊन राजा विष्णुवर्धन यांनी आपले प्रतिनिधी पेनुगोंडास पाठविले. या प्रस्तावावर विचार करण्यासाठी राजा कुसुमश्रेष्ठीने राजसभा बोलावली. आर्य वैश्यामधील ७१४ गोत्रजांना चर्चेसाठी बोलावण्यात आले. वेगळ्या वर्णामध्ये व विवाहित असणाऱ्या राजा विष्णुवर्धन यास आपली कन्या देऊ नये असे राजा कुसुमश्रेष्ठीला वाटत होते. ७१४ पैकी १०२ गोत्रजांचे प्रतिनिधी कुसुमश्रेष्ठींच्या बाजूने होते तर राजा विष्णुवर्धन यांना विरोध केल्यास ते युद्ध लादतील या भीतीने ६१२ गोत्रजांचे प्रतिनिधी वासवी व विष्णुवर्धन यांच्या विवाहाच्या बाजूने उभे राहिले. राजसभेत एकमत होत नसल्याचे पाहून कुसुमश्रेष्ठींना खूप दुःख झाले. आपली कन्या वासवीचा राजा विष्णुवर्धन यांच्याशी विवाह लावून देण्यास कुसुमश्रेष्ठींनी ठाम नकार दिला. ही बातमी समजताच राजा विष्णुवर्धन याने युद्ध करण्याचा निर्णय घेतला. युद्ध करून वासवीला जिंकून तिच्याशी विवाह करण्याचा विष्णुवर्धनने निश्चय केला. ही बातमी पेनुगोंडा येथील नगरात पसरल्यानंतर राजा व प्रजा चिंताक्रांत झाले. ही बातमी समजल्यानंतर आपल्यामुळे आपल्या राज्यावर येणाऱ्या संकटाचा विचार करून वासवीने एक वेगळीच योजना आखली. तिने आपली ही योजना वडिलांना समजावून सांगितली व जे १०२ गोत्रजांचे प्रतिनिधी कुसुमश्रेष्ठींच्या बाजूने उभे राहिले, त्यांना देखील ही योजना सांगण्यात आली. राजा कुसुम श्रेष्ठींनी वासवीच्या आदेशाचे पालन करण्याचा हुकूम काढला. सर्व नगरांमध्ये सजावट करण्यात आली.

कुसुमश्रेष्ठी व १०२ गोत्रजांचे प्रतिनिधी सपत्निक गावातील नगरेश्वर मंदिराजवळ जमा झाले. तेथून सर्वजण वासवीच्या सांगण्यावरून गोदावरी नदीवर आले. तेथे वासवीच्या आदेशाने आधीच १०३ अग्नीकुंडांची तयारी करण्यात आली होती. मधल्या अग्नीकुंडासमोर वासवी स्वतः उभी राहिली आणि १०२ गोत्रज दांपत्यांना प्रत्येक अग्निकुंडासमोर उभे राहण्यास सांगितले. माझ्यामुळे युद्ध लादले जाऊन आपल्या नगरातील प्रजेला त्रास होणार असेल व वेगळ्या वर्णांमध्ये माझा विवाह करून जर परंपरा खंडित होणार असेल तर त्यापेक्षा मी प्राणार्पण करून हे संकट दूर करणार आहे. माझा व गोत्रजांचा स्वाभिमान टिकविण्यासाठी मी प्राणार्पण करणार आहे. मी स्वतः अग्नीकुंडात उडी मारणार आहे, आपणही उडी मारण्यास तयार आहात का? असा जेव्हा वासवीने इतरांना प्रश्न केला, तेव्हा सगळे विचारात पडले. सर्वांच्या लक्षात आले, की वासवी ही एक सामान्य मुलगी नाही. तिच्यामध्ये दैवी शक्ती वास करीत आहे. तिला आपले विश्वरूप दाखवायचे आहे. वासवीने सांगितले, की मी आदिशक्तीचा अवतार आहे, मीच महिषासुराचा वध केला आहे, शुंभ आणि निशुंभ राक्षसाचाही वध मीच केला आहे, त्रेतायुगामध्ये मी सीता देवीचे रूप धारण केले होते, द्वापारयुगात यशोदेच्या पोटी दुर्गा या नावाने मीच जन्म घेतला होता, या कलियुगामध्ये स्त्रियांच्या पावित्र्याचे रक्षण करण्याचा मी निश्चय केला आहे, म्हणूनच मी वासवी ब्रह्मचारिणी या नावाने आर्य वैश्य कुळामध्ये जन्म घेतला आहे. वासवीचे मूळ रूप पाहून सर्वांनी तिला साष्टांग नमस्कार केला.अग्नीकुंडात उडी घेऊन प्राणार्पण करण्यापूर्वी तिने सांगितले, माझ्या या योजनेची माहिती मिळताच विष्णुवर्धन राजाचा नाश होईल. माघ शुद्ध द्वितीया या दिवशी माता वासवीने अग्निकुंडात उडी घेऊन प्राणार्पण दिले. त्याचबरोबर १०२ गोत्रज वैश्य दांपत्यांनी ईश्वरांचे चिंतन करीत अग्निकुंडाला प्रदक्षिणा मारली व प्रसन्न चित्ताने वासवीप्रमाणे अग्निकुंडात उड्या घेतल्या. तेव्हापासून १०२ गोत्रजांना आर्य वैश्य म्हणून ओळखले जाते.

वासवीसहित १०२ गोत्रजांनी प्राणार्पण दिल्याची वार्ता विष्णुवर्धन राजास कळताच त्याला धक्का बसला. त्याच्या हृदयाचे व डोक्याचे तुकडे - तुकडे झाले, त्याची जीवनयात्रा संपुष्टात आली. त्याने जसे कर्म केले तसे त्याला फळ मिळाले. विष्णुवर्धन राजाचा अहंकाराने अंत झाला. ही बातमी कळताच त्याचा पुत्र नरेंद्र त्वरित पेनुगोंडा नगरीत आला व त्याने वासवीचा बंधू विरूपाक्षच्या पायावर लोळण घेतली. वीरुपक्षाने त्यास जवळ घेऊन अलिंगण दिले. आता तरी धर्माचे पालन कर असे वचन नरेंद्र याच्याकडून घेतले. त्यानंतर गुरु भास्कराचार्यांनी विरुपाक्षास काशीला जाऊन पित्याचे पिंडदान करण्यास सांगितले. तेथून आल्यानंतर नगरेश्वर मंदिरामध्ये वासवी कन्यका परमेश्वरी देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली व त्यानंतर दुसऱ्याच दिवशी विरूपाक्ष यास पेनुगोंडा राज्याचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्यात आला.

श्री.वासवी कन्यका परमेश्वरी देवीने आपल्या प्राणाचे बलिदान देऊन स्त्री कुळाचे, स्त्रीच्या पावित्र्याचे, स्त्रीच्या सन्मानाचे, आपल्या कुळाचे व आपल्या गोत्रजांचे रक्षण केले व बलिदानातून देखील आपण आपल्या गोत्रजांचा उद्धार करू शकतो याचा आदर्श घालून दिला. आज वैशाख शुद्ध दशमी म्हणजेच श्री.वासवी कन्यका परमेश्वरी देवीच्या जयंतीचा दिवस. श्री वासवी कन्यका परमेश्वरी देवीला शतशः नमन!

### पीडित कुटुंबांना न्याय मिळाला

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या काश्मीरमधील पहलगाम भ्याड हल्ल्यात निष्पाप २७ हिंदू पर्यटकांना धर्म विचारून त्यांना निवडून ठार करताना दहशतवाद्यांनी त्याच्या बायकांना, मोदींना जाऊन सांगा, असे निर्लज्जपणे सांगितले होते. गेली कित्येक वर्षे पाकिस्तान या दहशतवाद्यांना पोसत आहे. त्यांच्याद्वारे त्याने भारताविरुद्ध एकप्रकारचे छुपे युद्ध सुरू ठेवले आहे. याआधी २०१९ मध्ये बालाकोट एअर स्ट्राईक केला होता. भारतीय वायुसेनेच्या १२ मिराज २००० जेट विमानांनी नियंत्रण रेषेच्या पलीकडे जाऊन बालाकोट जवळील दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला चढवला. भारतीय सैन्यावर पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर म्हणून हा हवाई हल्ला करण्यात आलेला होता. पाकिस्तान या एअर स्ट्राईकवरून बोध घेऊन आपल्या दहशतवादी कारवाया थांबवेल असे वाटले होते. पण पाकिस्तान आपला दहशतवादी एजेंडा सोडण्यास तयार नाही.

पहलगाम हल्ल्याची चीड देशवासीयांच्या मनात गेली कित्येक दिवस होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना तसेच दहशतवादी हल्ल्यातील पीडित कुटुंबीयांना आश्वस्त केले होते की त्यांना नक्कीच न्याय मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून देशाला संबोधित करताना, पहलगाम हल्ल्यावर भाष्य केले होते. हल्ल्याचा कट रचणाऱ्यांना कठोर उत्तर दिले जाईल, असं म्हणत पंतप्रधानांनी पुन्हा एकदा पहलगाम येथे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना कडक इशारा दिला होता. दोन आठवडे उलटून गेल्यानंतर कारवाई होत नसल्याने अस्वस्थता होती. अखेर बुधवार मध्यरात्रीच्या सुमारास भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. या मोहिमेअंतर्गत एकूण नऊ ठिकाणी हवाई दलाने व्याप्त काश्मीर तसेच शंभर किलोमीटर आत पाकिस्तानमध्ये जाऊन तेथील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहे. ज्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी आपल्या आया-बहिणींचे कुंकू पुसले त्यांना तेथेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने अखेरीस 'ऑपरेशन सिंदूर' राबवून चौथे अस्मान दाखविले आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### शूरवीर जवानांचे अभिनंदन

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील इस्लामिक दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांची धर्म विचारून हत्या केली. त्याचा प्रतिशोध घेण्यासाठी व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या मुख्यालयावर आमच्या शूर भारतीय जवानांनी हल्ले करून पाक पुरस्कृत दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. त्यासाठी भारतीय शूर जवानांचे आणि भारताच्या प्रखर नेतृत्वाचे अभिनंदन केले पाहिजे. संपूर्ण भारताला भारतीय जवानांनी केलेल्या पराक्रमाचा अभिमान आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने भारत जगातील शक्ती व शस्त्रसंपन्न राष्ट्र असल्याचा परिचय झाला आहे. जगातील बलाढ्य राष्ट्रे भारताच्या पाठीशी आहेत. काश्मीरमध्ये पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या महिलांचे सिंदूर हिसकावून पुरुषांना ठार मारणाऱ्या दहशतवाद्यांचा प्रतिशोध 'ऑपरेशन सिंदूर'ने घेतला गेला. भारतीय सिंदूरचा परिणाम भारतीय जवानांनी आपल्या राष्ट्रधर्मानी दिला. "मोदी को जाके बता देना" असे म्हणणाऱ्या दहशतवाद्यांची आज स्थिती भीषण झाली आहे. पाकड्यांनी आतंकवादाचा कारखाना केला. भारतीय जवानांनी त्यांच्या अड्ड्यांवर हल्ला करून अनेक दहशतवादी मारले. भारताचे नेतृत्व कणखर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेणारे आहे. संपूर्ण जनमानस देशाच्या नेतृत्वाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

**अमोल तपासे**/नागपूर

● ● ● ●

### मोदींची दूरदृष्टी नव्हे, दिव्यदृष्टी

पाकिस्तानसोबत सध्याचे तणावपूर्ण संबंध व वातावरण बघता भारताकडून मोठ्या कारवाईची अपेक्षा होती, ती पूर्ण झाली. ज्या २७ निरपराध पर्यटकांना गोळ्या घालून ठार मारले त्यांच्या कुटुंबांची सुद्धा सरकारकडून हीच अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कूटनीतीचे फळ आज आपल्याला अनुभवाला येत आहे. २०१४ ला मोदी पंतप्रधान झाल्यावर त्यांनी विविध देशांना भेट देणे सुरू केले. विरोधी पक्ष आणि लोकांना वाटत होते की मोदींना परदेशात फिरायला मिळाले नाही म्हणून जातात. अरे अल्प बुद्धीवाले, मोदींना समजणे कठीण आहे. आज या गोटींची महती पटली जेव्हा अमेरिका, रशिया, फ्रान्स, इस्रायलसारखे देश भारताला पाठिंबा देत आहेत. पाकिस्तानची चीन सोडून कोणीच बाजू घेत नाही आहे. हे सर्व मोदींनी भारताला आर्थिक बाबतीत समृद्ध केल्यामुळेच शक्य झाल आहे. आपल्या देशाला पाठिंबा देण्यामागे त्यांना मोदींबद्दल प्रेम आहे असे नाही, तर या मोठ्या देशांचे आर्थिक हित यात लपले आहे. अशा या संकटाच्या वेळी आपण मोदींसोबत राहायला हवे. दुसरीकडे काँग्रेसचे नेते राहुल गांधींच्या अल्प बुद्धीची जितकी कीव करावी तेवढी कमीच आहे. त्यांच्या आजीला व वडिलांना दहशतवाद्यांनीच मारले हे विसरून मोदींना साथ देण्याऐवजी त्यांच्यावर आरोप करतात. याला म्हणतात विनाशकाले विपरीत बुद्धी. ▮

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### बक्षीमहाराज यात्रेनिमीत्त तीन दिवस कीर्तन मोहोत्सव

**सोलापूर, दि. ७ मे-**

बक्षी हिप्परगे (ता. दक्षिण सोलापूर) मध्ये दि ८ वार गुरुवार रोजी बक्षिमहाराज यांचेनीमीत्त समाधीस तेलाभिषेक व काठयांची स्थापणा व महा आरती सोहळा तर रात्री ९ वाजता झी मराठी फेम कीर्तनकार हभप शिवलीला पाटील बार्शी यांचे कीर्तन तर दि. ९ मे रोजी रोजी सकाळी नऊ वाजता गावातून काठयांची पारंपारिक वाद्यातून वा शिवपार्वती व संभाजी राजे येसूबाराणी यांचे पारंपारिक वेशभुषेसह मिरवणूक व पूजा. रात्री नऊ वाजता कीर्तनकार हभप समाधान महाराज भोजेकर जळगाव जिल्हा यांचे सुस्राव्य कीर्तन तसचे रात्री अकरा ते पहाटे पाच पर्यंत हरिजागर. दि १० मे रोजी रात्री आठ वाजता हभप हणमंत महाराज काळे लातुर यांचे कीर्तन तर रात्री दहा ते पहाटे चार वाजेपर्यंत भारुड सम्राट हभप तानाजी महाराज कुंभार सातारा यांचे भारुड होईल.

### रद्द झालेल्या संस्थेच्या नावे रेशन दुकान सुरू संबंधितांवर फौजदारी कारवाईची मागणी

**सोलापूर, दि. ७ मे-**

सहकारी संस्था उपनिबंधकांकडून रद्द झालेल्या संस्थेच्या नावे रास्त धान्य दुकान सुरू असल्याचा आरोप करत संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते जयराज नागणसूरे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, अन्नपुरवठा अधिकारी आणि उपनिबंधक यांना निवेदन देण्यात आले आहे.सोलापूर शहरातील दोन रास्त धान्य दुकाने ही या संस्थेचे नोंदणी रद्द केली असतानाही सुरू आहेत. शासकीय आदेशाला केराची टोपली दाखवून या संस्था सुरूच ठेवल्या आहे. याकडे अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाचे दुर्लक्ष होत आहे, असा आरोप नागणसुरे यांनी केला आहे. याप्रकरणी चौकशी करून या दोन्ही रास्त धान्य दुकानदार चेअरमन /चालक यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे, अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

### भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे रविवारी वधू-वर पालक परिचय मेळावा

**सोलापूर, दि. ७ मे-**

भावसार समाज जेष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत श्री हिंगुलांबिका सांस्कृतिक भवन, गणेश पेठ, सोलापूर येथे सातवा वधू- वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष प्रकाश जवळकर आणि सचिव अरुण आकुडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर भावसार क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष राजकुमार हंचाटे हे राहणार आहेत. यावेळी हिंगुलांबिका देवी देवालयाचे ट्रस्ट अध्यक्ष किशोर कटारे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यासाठी आतापर्यंत पाचशे वधू-वरांनी आपली नोंदणी केली आहे. मेळाव्यात समाजातील वधू-वरांची ऑनलाईन ऑफलाइन नोंदणी करण्यात येत आहे. सुमारे ८०० इच्छुक वधू-वरांची नोंदणी अपेक्षित आहे. यावेळी राहण्याची, जेवणाची मोफत सोय करण्यात आली आहे. यावेळी शशिकांत रंगदळ, रवींद्र खमीतकर, श्रीकांत अंबुरे, सतीश हिबारे आदी उपस्थित होते.

### प्रमुख नद्या जोडण्याच्या मागणीसाठी कर्नाटक ते नवी दिल्ली यात्रेस प्रारंभ

**सोलापूर, दि. ७ मे-**

भारत सरकारने देशातील प्रमुख ४०० नद्या जोडून शेतकरी आणि सामान्य लोकांचे हित साधावे या प्रमुख मागणीसाठी कर्नाटकातील कनकंचेनहळळी ते नवी दिल्ली राष्ट्रपती भवन पर्यंत यात्रा काढली आहे, अशी माहिती के. एच. एस. प्रसन्न कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. विश्व किसान संघाच्या वतीने कर्नाटक येथून दि. ५ मे २०२५ रोजी यात्रेस प्रारंभ करण्यात आला आहे. विविध ठिकाणाहून शेवटी बुधवार दि. १४ मे २०२५ रोजी ही यात्रा नवी दिल्ली येथे पोहोचणार आहे. या ठिकाणी राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना या मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे. देशभरात सुमारे ४०० प्रमुख नद्या आहेत. पावसाळ्यात या नद्याद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी समुद्राला जाऊन मिळते. हे पाणी वाया जाते. या पाण्याचा उपयोग शेतकरी आणि लोकांना होण्याची गरज आहे. त्यासाठी या नद्या जोडण्याचा प्रकल्प तातडीने राबविण्याची आवश्यकता आहे. ठिकठिकाणी धरणे बांधण्याची गरज आहे. या मागणीसाठी दहा वर्षांपूर्वी राष्ट्रपतींना निवेदन दिले होते. त्यानंतर पुन्हा आता या यात्रेद्वारे जाऊन निवेदन देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस एजाज पाशा, मोहम्मद दस्तगीर , अब्दुल्ला तुमी , काशिनाथ भतगुणकी आदी उपस्थित होते.

# प्रवाशांनी धरली वातानुकुलित शिवशाही अन् शिवाईची वाट

## प्रवाशांच्या संख्येवर उन्हाचा परिणाम; रात्री अन् पहाटे प्रवाशांची वाढती गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर शहर जिल्ह्यात सूर्यनारायण आग ओकू लागला आहे. तापमानाचा पारा ४५ अंशावर येऊन ठेपला आहे. सोलापूर हे शोलापूर बनवण्याच्या मार्गावर आहे. अशातच राज्यामध्ये तसेच राज्यबाहेर प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गर्दी एसटीकडे वाढली आहे. मात्र उकाडा वाढल्याने प्रवासी शिवाई आणि शिवशाही या वातानुकूलित बसेसना प्राधान्य देताना दिसत आहेत. त्यामुळे एसटीच्या शिवशाही, शिवाई या बसमधील गर्दी वाढलेली दिसून येत आहे. उन्हाळ्यात पर्यटन व गावी जाणार्यांची संख्या वाढते. गेल्या महिनाभरात जवळपास दीड ते दोन लाख प्रवाशांनी एसटीने प्रवास केला आहे. वाढत्या उन्हामुळे रेल्वे प्रवासी एसीचे तिकीट काढून, तर एसटीचे प्रवासी शिवाई अन् शिवशाही गाडीने सर्वाधिक प्रवास करीत आहेत.

दरम्यान, महिलांना पन्नास टक्के सवलत असल्याचे महिलाही सर्वाधिक संख्येने प्रवासाला निघाल्या आहेत. परिणाम एकूण प्रवासी संख्येत वाढ झाल्याने एसटीच्या उत्पन्नातही मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे परिवहन महामंडळाने सांगितले आहे.सोलापूरच्या तापमानात सातत्याने बदल होत आहे. दरम्यान, सोलापूरचे तापमान ४४ अंशापलीकडे जाऊन पोहोचले आहे. सकाळी ८ वाजल्यापासूनच उन्हाचा तडाखा सहन करावा लागत असून, दुपारच्या सुमारास एसटी गाड्यांमधून प्रवास करताना प्रवाशांना उकाडा सहन करावा लागत आहे. यामुळे दिवसा प्रवास करणे प्रवासी टाळत आहेत. रात्री तसेच पहाटे प्रवास करण्यास प्रवासी प्राधान्य देत आहेत.

### जादा गाड्या सोडण्यात आल्या

सोलापूरहून पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली, सातारा, लातूर, धाराशिव, अहमदनगर, रत्नागिरी, हैदराबाद आदी महत्त्वाच्या गावांना जादा गाड्या सोडण्यात आल्या आहेत. साधी बस, शिवशाही, निमआराम, शिवाई यासह अन्य गाड्यांना प्रवाशांची गर्दी वाढली आहे. पुणे, मुंबई, हैदराबाद व मराठवाड्यातील विविध मार्गावर प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

### जुनाट शिवशाहीत एसी नावालाच

सोलापूरसह अन्य आगारातील जुनाट झालेल्या शिवशाही बसेस मधील वातानुकूलित सेवा बंद पडल्याने प्रवाशांना एसीचे तिकीट काढूनह साध्या बससारखे प्रवास करावा लागत आहे. बंद एसीमुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तर दुसरीकडे नव्याकोऱ्या इलेक्ट्रिक एसटी बसेस मध्ये एसी प्रणाली सुरू असल्याने त्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळत आहे.

### एसटीच्या एसी बस फुल्ल

पुणे, मुंबई, हैदराबाद व मराठवाड्यात जात असलेल्या शिवशाही व शिवाई गाड्यांना सर्वाधिक गर्दी दिसून येत आहे. शिवाय दिवसापेक्षा रात्री अन् पहाटेच्या सुमारास प्रवास करणारे वाढले आहेत. खासगी गाड्यांनाही गर्दी वाढली असून वातानुकूलित ट्रॅव्हल्स गाड्यांचे तिकीट मिळता मिळेनासे झाले आहे.



## सह्याद्री प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

### तब्बल ३० वर्षांनी एकत्र : जुन्या आठवणींना उजाळा

**सोलापूर, दि. ७ मे-**

देगाव रोडवरील, हौसे वस्ती येथील सह्याद्री प्रशालेतील १९९४-९५ मधील दहावीचे माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी व त्यांच्या शिक्षकांचे स्नेहसंमेलन रामलाल चौकातील निसर्ग हॉटेलमध्ये संपन्न झाले. तब्बल ३० वर्षानंतर हे सर्वजण एकत्र आले होते. त्यामुळे त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत हे संमेलन साजरे झाले.



यावेळी प्रभारी मुख्याध्यापक प्रा. नारायण जगताप, प्रा. ब्रह्मदेव घुले, प्रा.उमाकांत पाटील, प्रा. तानाजी घोलप, प्रा.श्रीमंत नानाजे, प्रा. मोहन बारबोले, माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी व त्यांचे फॅमिली मेंबर उपस्थित होते. ३० वर्षानंतर विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा सन्मान होतो हे शिक्षकांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. असे गौरवोदगार प्रा. शिवदास चटके, प्रा.शेख इमाम अब्बास अली, प्रा.श्रीमती शालिनी चव्हाण, प्रा.मोहन बारबोले, प्रा.सुधीर देशमुख, प्रा. नागनाथ जाधव, प्रा. श्रीमती महानंदा मानवे इत्यादी प्रत्येक शिक्षकांनी त्यांच्या भाषणातून व्यक्त केले. तर सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनीनी गुरुजनांचा सत्कार त्यांचे चरण स्पर्श करून त्यांना शाल,श्रीफळ व छोटेसे रोपटे देऊन करण्यात आला हे पाहून शिक्षक वर्ग भारावून गेले. जीवनामध्ये शिक्षकांचा सन्मान राखला पाहिजे शिक्षकांचा सन्मान हा खऱ्या अर्थाने गुरु शिष्य परंपरा म्हणजेच भारतीय संस्कृती जपून ठेवण्याची संधी आहे असे मत प्रा. शिवदास चटके यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शालिनी सावंत व आभार सनातन पवार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सनातन पवार, श्रीनाथ लोंढे, सचिन बनसोडे, संजय माने, राजेंद्र ऐवळे, सोमशेखर मोरे, दत्ता कारंडे, श्रीकृष्ण कोकरे, ज्योतिबा पवार, श्रीकृष्ण बरगंडे, संजय कदम, भाग्यश्री जाधव,जगदेवी भोसले, छाया मसलखांब,सुवर्णा कदम, अलका पाटील, प्रभावती माने,वनिता ओहोळ, सुहासिनी शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

## विविध वस्तू विक्री कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन राज्य मेळावा उत्साहात

**सोलापूर, दि. ७ मे-**

विविध वस्तू विक्री कर्मचारी वेल्फेअर असोसिएशनचा राज्य मेळावा उत्साहात संपन्न झाला.

हॉटेल ऐश्वर्या येथे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. यावेळी

महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष राहुल मुंगले, संपर्क प्रमुख श्रीकांत हवळगी, सचिव दीपक अडकमोल, उपाध्यक्ष गूळफराज काझी, राज्य मीडिया प्रमुख गणेश वेळापुरे, पश्चिम महाराष्ट्र प्रमुख यासिन उम्रानी, पश्चिम महाराष्ट्र महिला प्रमुख पूनम पुरीगोसावी, पुणे जिल्हा प्रमुख विनायक खंडाळकर, कोल्हापूर विभाग प्रमुख शुभांगी मॅडम, कोल्हापूर विभाग प्रमुख पीटर दिसूजा, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष सुरज जम्मा, माजी सभापती शिवानंद पाटील, माजी नगरसेवक संजय कोळी आदी मान्यवर उपस्थित होते.



सुरुवातीस दीप प्रज्वलन करून भारत मतांचा फोटोची पूजा करण्यात आली. सोलापूर जिल्हा पदाधिकारी यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचे सत्कार करून स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य चे प्रमुख मान्यवरचे हस्ते नवीन पदाधिकारी नियुक्ती पत्र देऊन सर्वांचा सत्कार करण्यात आला. आमदार देशमुख यांनी संघटनेला त्यांच्या प्रश्ना साठी जे काही मदत शासनाकडून ते पाठपुरावा करून ती देण्याचे आश्वासन राज्य संघटनेला दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश गायकवाड यांनी केले, सोलापूर जिल्हा सचिव व्यंकटेश लचमापुरे यांनी स्वागत केले. अध्यक्ष साईनाथ भीमर्थी यांनी प्रास्ताविक केले. महेश करंटे यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेश कामूर्ती, बसवराज स्वामी,शिवलिंग गुंदगे, बलराज तोर्रा, विनायक वडनाल,अनिल कुर्रे, दिनेश हेड्डा,किशोर व्यंकटगिरी, इस्माईल हुलसुरे,शिवपुत्र आमणे,वासुदेव करमकोडा, संजय हिंगमिरे, योगेश कुंभार, श्रीनिवास दासरी, श्रीकांत नसली आदिनी परिश्रम घेतले.

## शेळकंदे यांची जिद्द, चिकाटी वाखणण्याजोगे : सिईओ जंगम

### विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल इशाधिन शेळकंदे यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ६ मे -**

माझी वसुंधरा अभियान, ग्रामपंचायत कार्यालय उभारणी, ग्रामसेवक यांचे प्रश्न,

विस्तार अधिकारी पदोन्नती असे अनेक प्रश्न मार्गी लावण्या साठी उपमुख्य कार्यकारी इशाधिन शेळकंदे यांनी परिश्रम घेतले. डेप्युटी सीईओ शेळकंदे यांचे जिद्द व चिकाटी वाखणण्याजोगे आहे, असे मत सिईओ कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषेदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांची मंत्रालयात विशेष कार्यकारी अधिकारी या पदावर निवड झाल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिईओ कुलदीप जंगम होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी , कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, नरेंद्र खराडे, शिल्पा शेळकंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य अरूण तोडकर, गटविकास अधिकारी कदम, शंकर कवितके, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. एस. पी.माने, ॲड. देशपांडे, मराठा सेवा संघाचे अविनाश गोडसे, कास्ट्राईब संघटनेचे अरूण क्षिरसागर, विस्तार अधिकारी संघटनेचे ज्ञानेश्वर सुतार, ग्रामसेवक संघटनेचे शरद भुजबळ, अधिक्षक झेड ए शेख, लेखा विभागाचे हुच्चे यांची प्रमुख उपस्थित होते.

### सोलापूरकरांच्या प्रेमांने समाधानी

सोलापूर जिल्ह्यात ७ वर्षे सेवा करण्याची संधी मिळाली. माझी वसुंधरा अभियाना राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. तत्कालीन सिईओ दिलीप स्वामी व मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचे योग आले . सिईओ जंगम यांनी काम करण्याची संधी दिल्यामुळे अतिरिक्त सिईओ कोहिणकर यांच्यासह तीन आषाढी यात्रा पार पाडता आले. असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी सांगितले.

## सोलापूरचे सुपुत्र धीरज सुरते यांचा अमेरिकेच्या विद्यापीठात डंका !

### एम.एस. इन केमिकल अँड रेडिऑलॉजी पदवी

**सोलापूर, दि. ७ मे-**

येथील धीरज राज सुरते यांना जागतिक स्तरावर २५व्या क्रमांकावर असणाऱ्या मिशिगन अन अर्बन इन अमेरिका या विद्यापीठात एम. एस. इन केमिकल अँड रेडिऑलॉजी ही मास्टर डिग्री प्रदान करण्यात आली. सोलापुरातून गेलेल्या आई-वडिलांना तो पदवीदान सोहळा पाहून आनंदाश्रू आले.''आनंदाश्रू दाटले नयनी, पदवी प्रदान सोहळा पाहुनी !'' असा भावनिक प्रसंग पाहायला मिळाला.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा मूलमंत्र उराशी बाळगून सोलापुरातील सुरते परिवाराने आपली वाटचाल केली आणि याच परिवारातील सुपुत्र धीरज सुरते यांनी अमेरिकेतील नामांकित अशा विद्यापीठात एम. एस. इन केमिकल अँड रेडिऑलॉजी हा पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम (मास्टर डिग्री) चांगल्या पद्धतीने पूर्ण केला. या सोहळ्यासाठी अमेरिकेला सोलापूरहून धीरज यांचे वडील राज सुरते आणि आई योगिता सुरते हे खास करून गेले होते. तो अभिमानास्पद क्षण पाहून त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.



## मंगळवेढ्यात 'ऑपरेशन सिंदूर'चा पेढे वाटून आनंदोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.७ मे**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर देत पहाटे भारतीय लष्कराने पाकव्याप्त कश्मीर तसेच पाकिस्तान मधील आतंकवाद्यांचे स्थळ उध्वस्त केले . याचा आनंदोत्सव आज मंगळवेढा येथे साजरा करण्यात आला . भारतीय लष्कराने या स्ट्राइकला '' ऑपरेशन सिंदूर '' असे नाव दिले होते . पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर संपूर्ण जगाचे लक्ष भारत काय भूमिका घेणार कशा पद्धतीने भारत सरकार तसेच भारतीय लष्कर याचा बदला घेईल , ही उत्कंठा लागली असताना , कोणाच्याही ध्यानीमनी नसलेला मोठा स्ट्राइक भारतीय लष्कराने घडवून आणलेला आहे . अवघ्या अर्ध्या तासाच्या या स्ट्राइकने पाकिस्तानामधील आतंकवादी तसेच पाकिस्तान लष्कर देखील भयभीत झालेले आहे . पहलगाम येथे जे नागरिक पर्यटनासाठी गेले होते त्या नागरिकांमधील महिला सोडून पुरुषांना धर्माच्या आधारावर ठार मारण्यात आले , त्याचाच बदला ऑपरेशन सिंदूरणे घेतलेला आहे. आज मंगळवेढा येथे फटाके फोडत भारत माता की जय ची घोषणाबाजी करत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला . यावेळीभाजपा शहराध्यक्ष नागेश डोंगरे जिल्हा उपाध्यक्ष संतोष मोगले , युवा मोर्चा जिल्हाअध्यक्ष सुदर्शन यादव, युवा मोर्चा शहराध्यक्ष सुशांत हजारे, दिघंबर यादव,महादेव धोत्रे,संजय माळी,महादेव जाधव, सागर केसरे,रावसाहेब कोंडूभैरी,सोमा कोल्हे, सोमनाथ काशीद, सुनील जाधव,सतीश कोंडूभैरी, तात्या डांगे, रामचंद्र पवार दत्ता ओमणे,हरी गायकवाड, विशाल चौगुले, आबा पडवळे आदींनी साजरा केला.




## सुरक्षा रक्षक पदासाठी माजी सैनिकांनी १३ मे पर्यंत नावे नोंदवावीत

**सोलापूर दि. ७ मे-**

सावित्रीबाई फुले विद्यापीठात १४० सुरक्षा रक्षकाची पदे साधारणपणे रूपये २२ हजार मासिक वेतनावर तातडीने भरावयाचे आहेत. जिल्हयातील पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी दि. १३ मे २०२५ पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात नावे नोंदवावीत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. या पदासाठी माजी सैनिक वयाने ५५ वर्षे वयापेक्षा कमी असावा. जिल्हयातील पात्र व इच्छुक माजी सैनिक यांनी सदर संधीचा फायदा घ्यावा. तसेच आणखी एका मुख्य नियोक्त्याकडून जून अखेर पर्यत ९० सुरक्षा रक्षकांची भरती करण्याची मागणी येण्याची शक्यता असल्याचेही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तुंगार यांनी कळविले आहे.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन : डि।। व सब डि।। सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी कुंभारी येथील गट नं. ५३० यांसी नवीन सर्व्हे नं.२६१/२ पैकी ''लक्ष्मी नगर'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. ३४ याचे एकूण क्षेत्र ३१५ चौ.मी. अथवा ३३७९.४० चौ. फुट इतके आहे. चर्तुःसिमा - येणेप्रमाणे - पूर्वेस : सर्व्हे नं.२६१/२, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ३३, उत्तरेस : ओपन जागा.

अशा वर्णनाची वर नमूद मिळकत ही **रेणुका रामुलु सिंगम, वय ५२ वर्षे, धंदा-घरकाम, रा.३३/१/बी१, गीता नगर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर** यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदरची मिळकत ही त्यांनी आमचे अशील रा. सोलापूर यांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशीला कडून रक्कम स्वीकारुन इसारापावती करारपत्र लिहून दिलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी व खात्री त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ (आठ) दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात कागदपत्रासह नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिल्ला हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिखहत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख ०७/०५/२०२५.

**सही/-**
**ॲड. हेमंतकुमार ना. माळी**
**बी.ए., एलएल.बी.. नोटरी - भारत सरकार**
**जिल्हा न्यायालयासमोर, फाईव्ह स्टार**
**हॉटेल समोर, सोलापूर**
**मो.नं.९८२२८१८१८६**

### जाहीर प्रसिध्दीकरण

वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज
दि.कि.अर्ज नं.४०/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **श्री. श्रीहरी उत्तरेश्वर भोसले,** उ.वय - ४३ वर्षे,
धंदा- वकीली व शेती, रा. रउळगांव ता. बार्शी जि. सोलापूर
२) **श्री. दत्तप्रसाद उत्तरेश्वर भोसले,**
उ.वय- ४७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
३) **लिला सिध्देश्वर सांगुळे,**
उ.वय- ५५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. झाडी ता. बार्शी जि. सोलापूर
४) **शिला राजेंद्र जगताप,**
उ.वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. उंडेगांव ता. बार्शी, जि. सोलापूर
५) **माधवी संतोष पाटील,**
उ.वय- ५१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. खडकलगांव ता. बार्शी जि. सोलापूर
६) **गोकर्णा बाळासाहेब डिसले,**
उ.वय-४५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. जवळगांव ता. बार्शी जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** --- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये**

**यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे**

यातील अर्जदार नं. १ ते ६ यांचे वडिल उत्तरेश्वर वसुदेव भोसले यांचा मृत्यु दि. १०/०१/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे रऊळगावं येथे झालेला आहे. तसेच अर्जदार यांची आई पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांचा मृत्यु दि.२९/०७/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय धाराशिव येथे झालेला आहे. मयत कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांचे अर्जदार नं. १ ते ६ हे वारस असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदाराने केले आहे. मयत कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांना अर्जदार नं. १ ते ६ शिवाय इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. ०९/०७/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, कळावे. हे जाहीर प्रकटन दिला. ता. ०७/०५/२०२५

**सही/-**
**क. लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**



## महत्त्वाचे

### महाराष्ट्राचा तिरंदाजीत सुवर्ण षट्कार



**भागलपूर :** खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या सातव्या पर्वात तिरंदाजीमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला बघायला मिळाला. मराठमोळ्या तिरंदाजांनी तब्बल सहा सुवर्ण, २ रौप्य व एक कांस्य अशी एकूण ९ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण विजेतेपदही पटकाविले. गतवर्षी चेन्नईतील स्पर्धेत महाराष्ट्र या क्रीडा प्रकारात उपविजेता ठरला होता. खेलो इंडियाच्या इतिहासात प्रथमच पदकांचा षटकार महाराष्ट्राने झळकविला आहे. गतवेळी ३ सुवर्णांसह ६ पदके महाराष्ट्राने जिंकली होती. यंदा झारखंड, हरयाणाची मक्तेदारी मोडून महाराष्ट्राने वर्चस्व गाजवित सर्वसाधारण विजेतेपदाचर नाव कारले. विजेत्या खेळाडूंचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह पथकप्रमुख महादेव कसगावडे यांनी अभिनंदन केले आहे. मुलांच्या रिकर्व्ह प्रकारात उज्वल ओलेकरने तमिळनाडूच्या स्मारा सर्वेशचा ६-२ सेटने पराभव करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. मुलींच्या रिकर्व्ह प्रकारात शर्वरी शेंडे व वैष्णवी पवार या महाराष्ट्राच्या तिरंदाजांमध्येच अंतिम लढत रंगली. शर्वरीने ६-४ सेटने बाजी मारत सुवर्णपदक जिंकले, तर वैष्णवी रौप्यपदकाची मानकरी ठरली. मुलींच्या कपाऊंड प्रकारात महाराष्ट्राच्या तिरंदाजांनी तिनही पदके जिंकून निर्भेळ यश मिळविले.

### महाराष्ट्राचा रिलेमध्ये सुवर्ण धमाका

**गया :** महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी सलग तिसऱ्या दिवशी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राने मुलांच्या ४ बाय मेडले रिले स्पर्धेत सुवर्णपदकाचा धमाका केला. याचबरोबर धरीती अहिरवालने रौप्य, तर वेदान्त तांदळे व अलेफिया धंसुरा यांनी कांस्यपदके जिंकली. अर्नव कडू, शुभम जोशी, वेदांत तांदळे व अथर्व संकपाळ या चौकडीने मुलांच्या ४ बाय मेडले रिले स्पर्धेत ३ मिनिटे ५७.८९ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाला गवसणी घातली. कर्नाटकने रौप्य, तर आंध्र प्रदेशने ४ मिनिटे ०२.५८ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. मुलींच्या ४०० मीटर मेडले प्रकारात महाराष्ट्राच्या धरिती अहिरवाल हिने ४ मिनिटे २०.६० सेंकद वेळेसह रौप्यपदकाची कमाई केली. तमिळनाडूच्या श्रीनिथी नटेसन हिने ५ मिनिटे १७.५७ सेंकद वेळेसह सुवर्णपदकावर मोहर उमटवली, तर तेलंगणाची श्री निथया सागी ५ मिनिटे २०.८१ सेंकद वेळेसह कांस्यपदकाची मानकरी ठरली. याचबरोबर मुलींच्या १०० मीटर प्रिस्टाईल प्रकारात महाराष्ट्राच्या अलेफिया धंसुरा हिने ५९.७४ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. मुलांच्या १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात महाराष्ट्राच्या वेदान्त तांदळेला ५६.२९ सेंकद वेळेसह कांस्यपदक मिळाले.

## क्रीडा भारतीतर्फे विविध खेळांचे प्रशिक्षण शिबिर उद्यापासून

**सोलापूर, दि. ७ मे-**

शालेय विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्टयाचा सदुपयोग व्हावा, त्याच्या पुढील आयुष्याला चांगले वळण लागावे, कोणत्या तरी एका खेळाचा छंद लागावा यासाठी क्रीडा भारतीतर्फे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन ९ मे पासून केले आहे. फुटबॉलचे प्रशिक्षण जुळे सोलापुरातील भंडारी मैदानावर, हरिभाई देवकरणच्या मैदानावर व अल्फा टर्फ हांडे प्लॉट येथे तसेच क्रिकेट खेळाडूसाठी रेल्वे मैदानावर, कबड्डीसाठी युगंधर महिला होमिओपॅथी कॉलेज मैदानावर, म ोठ्यासाठी योग मारुती मंगलकार्यालय जुळे सोलापूर, टिळक चौक परिसरात चालू आहे. क्रिकेटसाठी अनिल सांब्राणी, फुटबॉलसाठी अभिजीत बंडगर, अजय, सुमित, परतिके, योगासने माकेवाड, कबड्डी जाधव आदी प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. प्रवेशासाठी राजेश कळमणकर ( मो. ९८५०५०२५२२) यांच्याशी संपर्क साधावा.

# दिल्ली, पंजाबला विजय आवश्यक

◆ **धर्मशाळा, ७ मे**

गुरुवारी धर्मशाळेतील निसर्गरम्य वातावरणात हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या स्टेडियममध्ये गुरुवारी सायंकाळच्या सत्रात दिल्ली कॅपिटल्स व पंजाब किंग्ज यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे दिल्ली कॅपिटल्स आपली घसरगुंडी रोखण्यासाठी व प्ले-ऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी उत्सुक असतील.

दिल्लीने गत पाच सामन्यात तीन पराभव व पावसामुळे एका सामन्याचा निकाल न लागल्यामुळे गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. आयपबीएल गुणतालिकेत सध्या दिल्ली ११ पैकी ६ सामन्यांमध्ये विजय नोंदवले आणि १३ गुणांसह पाचव्या क्रमांकावर आहे. पंजाब किंग्ज ११ पैकी ७ सामन्यातील विजय व १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. या दोन्ही संघादरम्यान दोन गुणांचे अंतर आहे. दिल्लीला या सामन्यात विजय नोंदवणे आवश्यक आहे.

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली संघाची घरच्या मैदानावरील कामगिरी निराशाजनक राहिली. त्यांना अरुण जेटली स्टेडियमवर सुपर ओव्हरमध्ये केवळ एक विजय मिळविला.



अक्षर पटेल



श्रेयस अय्यर

पहिले चार सामने जिंकणाऱ्या संघाला अशी आशा होती की सामनास्थळ बदलल्याने नशीब बदलेल, परंतु दिल्लीच्या फलंदाजी विभागाची हैदराबादमधील आपल्या शेवटच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध त्रेधातिरपीट उडाली व त्यानंतर पावसाने सामना रद्द केला.

दिल्ली कॅपिटल्सचा अर्धा संघ २९ धावांत गमावल्यामुळे फलंदाजीची संपूर्ण अव्वल फळी कोसळली व आशुतोष शर्माच्या हुशारीमुळेच त्यांना सन्मानजनक १३३ धावा करता आल्या.

दिल्लीची फलंदाजीची अव्वल फळी कमकुवत दिसत आहे. गत सामन्यात करुण नायरला सलामीवीर म्हणून मिळालेली बढती उलटली, कारण तो शून्य धावांवर बाद झाला, तर दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज फलंदाज फाफ डु प्लेसिस फॉर्ममध्ये परतला होता, परंतु तोही गोलंदाजांना अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर चौकार मारण्याच्या नादात लवकर बाद झाला.

अभिषेक पोरेलला आपल्या सुरुवातीचा फायदा उठवता आला नाही. या हंगामात ३८१ धावा करणारा त्यांचा आघाडीचा धावा करणारा केएल राहुल सुद्धा डाव स्थिर ठेवू शकला नाही. अक्षर स्वतः लवकर बाद झाला.

तथापि, ट्रिस्टन स्टब्स, अष्टपैलू विप्रज निगम व आशुतोषच्या प्रयत्नांमुळे त्यांना लढाऊ धावसंख्या उभारण्यास मदत झाली.

हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवरील खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल असण्याची शक्यता आहे, कारण यापूर्वी पंजाब व लखनौ सुपर जायण्ट्स यांच्यात उच्च धावसंख्येचा सामना झाला होता, त्यामुळे जिल्ली कॅपिटल्सच्या फलंदाजांना फॉर्म परत मिळवण्याची संधी मिळाली होती.

दुसरीकडे, पंजाब किंग्जने या हंगामात खळबळजनक कामगिरी केली आहे, त्यांनी ११ पैकी सात सामने जिंकले आहेत आणि केवळ तीन सामने गमावले आहेत आणि ते क्रमवारीत अव्वल दोनच्या बाहेर आहेत.

**आजचा सामना**

**पंजाब किंग्ज**
**वि. दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ :** हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाळा
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

दिल्ली कॅपिटल्सची फलंदाजी सातत्यपूर्ण नसली तरी, पंजाबची अव्वल फळी मजबूत आहे. प्रभसिमरन सिंगने सलामीवीर म्हणून ४३७ धावा गोळा केल्या आहेत.

कर्णधार श्रेयस अय्यर फलंदाजीत निष्कलंक आणि कर्णधार म्हणून हुशार आहे. त्याने चार अर्धशतकांसह ४०५ धावा केल्या आहेत. या आयपीएलमध्ये त्याने सर्वाधिक २७ षट्कार मारले आहेत.

गत वर्षी कोलकाता नाईट रायडर्सला जेतेपद मिळवून देणाऱ्या अय्यरने खेळाची जाणीव व नेतृत्वाने आपला नवीन संघ पंजाब किंग्जला प्रगतीच्या वाटेवर ठेवले आहे.

३४७ धावा करणाऱ्या प्रियांश आर्यने आपल्या संधींचा पुरेपूर फायदा घेतला आहे, तर नेहल वढेरा व शशांक सिंगने गरजेनुसार वेग वाढवला आहे.

मिचेल स्टार्क व कुलदीप यादव, अक्षर पटेल व विप्रज निगम या फिरकी त्रिकुटाचा समावेश असलेला दिल्ली कॅपिटल्सचे गोलंदाजी आक्रमण पजांब किंग्जच्या शक्तीशाली फलंदाजीला कसे तोंड देतो हे पाहणे मनोरंजक असेल. वेगवान जोडी दुष्मंथा चामिरा व मुकेश कुमार यांच्याकडून संघाला अधिक अपेक्षा असतील.

दरम्यान, पंजाब किंग्ज गोलंदाजीत जबरदस्त दिसत आहे. अर्शदीप सिंगने नवीन चेंडूने जबरदस्त कामगिरी केली आहे, त्याने १६ बळी घेतले आहेत, यात लखनौविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात तीन बळींचा समावेश आहे.

चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध हॅटट्रिकसह १४ बळी घेणारा लेग-स्पिनर युजवेंद्र चहल पुन्हा फॉर्ममध्ये आल्याने पंजाबच्या गोलंदाजी आक्रमणाला आणखी बळकटी मिळाली आहे. मार्को जानसेन, अझमतुल्लाह उमरझाई, विजयकुमार वैशाख व मार्कस स्टोइनिस या गोलंदाजांनी या जोडीला चांगली साथ दिली आहे. ◄(वृत्तसंस्था)

## पाकिस्तानने दिली नरेंद्र मोदी स्टेडियम उडवून देण्याची धमकी!



◆ **नवी दिल्ली, ७ मे**

भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वीरित्या राबवून ले आणि दहशतवादाचा सूत्रधार पाकिस्तानला योग्य उत्तर दिले. या कारवाईमुळे पाकिस्तान हादरला आहे. दरम्यान, गुजरात क्रिकेट संघटनेला अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर बॉम्ब हल्ला करण्याची धमकी देणारा ई-मेल मिळाला आहे. गुजरात क्रिकेट संघटनेला पाकिस्तान जेके नावाच्या ई-मेल आयडीवरून एका ओळीचा ई-मेल आला आहे. त्यावर केवळ 'आम्ही तुमचे स्टेडियम उडवून देऊ' असे लिहिले आहे. अहमदाबाद पोलिसांना याची माहिती मिळताच, वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आणि बॉम्ब निकामी पथकाचा ताफा तातडीने नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये पोहोचला. जिथे सखोल तपासणी करण्यात आली. 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत काल पीओकेमध्ये झालेल्या हवाई हल्ल्यात सुमारे २६ दहशतवादी मारले गेले. अशा परिस्थितीत, आज सकाळी हा ई-मेल मिळाला. येत्या काही दिवसांत नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये दोन आयपीएल सामने खेळवले जाणार असल्याने या ई-मेलला गांभीयनि घेतले जात आहे. ◄(वृत्तसंस्था)

## ऑपरेशन सिंदूरमुळे धर्मशाळा विमानतळ बंद

### आयपीएल संघांच्या प्रवास योजनांवर परिणाम



बंद होण्यापूर्वी धर्मशाळा विमानतळाहून बाहेर पडताना कुलदीप यादव

◆ **नवी दिल्ली/मुंबई, ७ मे**

भारताने पाकिस्तानच्या दहशतवादी पायाभूत सुविधांवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर धर्मशाळा विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आल्यामुळे, डोंगराळ शहरात खेळणाऱ्या आयपीएल संघांच्या प्रवास योजनांवर परिणाम झाला आहे. त्यामुळे आयपीएल संयोजकांनी सध्या प्रतीक्षा करा आणि पहा धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

गुरुवारी पंजाब किंग्ज विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना आयोजित करणाऱ्या धर्मशाळा येथे वेळापत्रकानुसार आणखी एक सामना शिल्लक आहे - ११ मे रोजी पंजाब आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना.

हे नयनरम्य शहर पंजाब किंग्जचे दुसरे गृह मैदान आहे. त्यांना सध्या कोणत्याही तात्काळ लॉजिस्टिक अडचणींचा सामना करावा लागत नाही कारण ते या आठवड्याच्या अखेरीस शहरात असतील. परंतु दिल्लीला रविवारी खेळण्यासाठी खेळाडूंना त्यांच्या गृह मैदानावर परत यावे लागणार असल्यामुळे त्यांच्या प्रवास योजनांवर विचार करावा लागणार आहे. मुंबई संघाच्या धर्मशाळा प्रवास योजना सध्या अस्पष्ट आहेत. 'सध्या सर्व काही स्थिर आहे. फ्रॅन्चायझींशी चर्चा सुरू आहे आणि जर विमानतळ बंद राहिले तर धर्मशाळा ते दिल्ली प्रवास करण्याचे पर्याय काय आहेत यावर ते अंतर्गत चर्चा करत आहेत, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले.

दिल्ली कॅपिटल्ससाठी एक पर्याय बस प्रवास आहे, पण तो केवळ संघांबद्दल नाही तर प्रसारण पथक आणि उपकरणांबद्दल देखील आहे. ही एक बदलणारी परिस्थिती आहे, असे ते पुढे म्हणाले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील नऊ ठिकाणी अचूक हल्ले केले, ज्यामध्ये २६ लोक, बहुतेक पर्यटक मारले गेले होते. लष्करी तणावामुळे देशाच्या उत्तर आणि पश्चिम भागातील किमान १८ विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. यामध्ये श्रीनगर, लेह, जम्मू, अमृतसर, पठाणकोट, चंदीगड, जोधपूर, जैसलमेर, शिमला, धर्मशाळा आणि जामनगर यांचा समावेश आहे. धर्मशाळेसाठी सर्वात जवळचे पर्यायी विमानतळ असलेले चंदीगड, सध्या बंद करण्यात आलेल्या विमानतळांपैकी एक आहे. ◄(वृत्तसंस्था)

## साऊथ सोलापूर व मॉडेल अकादमीचे शानदार विजय

### उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मे-**

उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत साऊथ सोलापूर व मॉडेल क्रिकेट अकादमीने विजय मिळविले.

मास्टर्स अकादमीने आयोजिलेली ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू आहे. साऊथ सोलापूरने श्री.साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट अकादमीवर १३१ धावानी विजय मिळविला. संकेत चव्हाण सामनावीर ठरला. दुसऱ्या सामन्यात मॉडेल क्रिकेट अकादमीने सोलापूर स्पोर्टस्वर ४ गडी राखून मात केली. अभिषेक देशमुख सामन्याचा मानकरी ठरला. हे पुरस्कार दत्ता बडगू यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी निखिल दोरनाल, गोपी इंजामुरी, श्रीपाद इराबत्ती, चंद्रशेखर उदगिरी, राजेश येमुल आदी उपस्थित होते. पंच म्हणून चिराग शहा व नबीलाल पटेल यांनी काम पाहिले.



**संक्षिप्त धावफलक**

**साऊथ सोलापूर :** ३० षटकात ३ बाद १९७ ( चरण कोक्कूल ४७, मीथ गुडगुण ३५, अविष्कार पाटील २-११) वि. वि. **श्री. साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट अकादमी :** १८.४ षटकात सर्व बाद ६६ (हर्ष जगताप १९, संकेत चव्हाण ३-५, स्वरूप आवताडे २-0, गोपीनाथ म्याकल २-११)

**सोलापूर स्पोर्टस् :** ३० षटकात ७ बाद १४५ ( गोंविदराज पुंजाल ७१, नैतिक खराडे १८, आशिया भोसले ३-२१, अनुज काळे २-१९) पराभूत विरुद्ध **मॉडेल क्रिकेट अकादमी :** ६ बाद १४६ (अभिषेक देशमुख नाबाद ६२, कार्तिक पाटोळे ३४, गोंविदराज ३-२२, निखिलेश महाकांल २-३३

## रेल्वे व मॉडेल अकादमी यांच्यात उद्या अंतिम लढत

### रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

### रेल्वेने पुष्पला नमविले

**सोलापूर, दि. ७ मे-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत अ गटात मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयुट व मॉडेल क्रिकेट अकादमी यांच्यात ९ मे रोजी अंतिम लढत होईल. अंतिम सामन्यानंतर अ व ब गटाचे पारितोषिक वितरण होईल.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी झालेल्या उपांत्य सामन्यात रेल्वेने पुष्प अकादमीस १०७ धावांनी नमविले. वेदांत काळे सामन्याचा म ानकरी ठरला. वरिष्ठ क्रिकेटपटू वासुदेव दोरनाल यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. अशोक डोंबाळे व नितीन गायकवाड यांनी पंच म्हणून गुणलेखक सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.




**संक्षिप्त धावफलक**

**मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युट :** ३८.१ षटकांत सर्व बाद १९१ (प्रवीण देशेट्टी ५६, वेदांत काळे ४७, यश बोरामणी १२ धावा, अजय माने व मयूर राठोड प्रत्येकी ३ बळी, नदीम शेख २ बळी) वि.वि. **पुष्प जिमखाना क्रिकेट अकॅडमी :** १८.४ षटकांत सर्व बाद ८४ (ओंकार घांदट १७, आदर्श सिंग १३, प्रशांत घोडके व नदीम शेख प्रत्येकी १२ धावा, आशिष अवळे ३ बळी, यश बोरामनी व अमन सय्यद प्रत्येकी २ बळी).

# रोहित कसोटीतून निवृत्त; एकदिवसीय सामने खेळणार

## इंग्लंड दौऱ्यात कर्णधारपदावरून काढून टाकल्याची चर्चा

**मुंबई** - रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर करून त्याच्या निवृत्तीची माहिती दिली. टी-२० मधून आधीच निवृत्त झालेला रोहित एकदिवसीय सामने खेळत राहील. बुधवारी संध्याकाळी असे वृत्त आले होते की इंग्लंड दौऱ्यावर त्याला कसोटी कर्णधारपदावरून काढून टाकले जाईल. त्यानंतर त्याने लाल चेंडू क्रिकेटला निरोप दिला.



रोहितने १२ कसोटी शतके झळकावली आहेत. रोहितने २०१३ मध्ये भारतासाठी कसोटी पदार्पण केले. २०२१ मध्ये तो प्लेइंग-११ मध्ये आपले स्थान पक्के करण्यात यशस्वी झाला आणि २०२२ मध्ये त्याला कर्णधारपदही मिळाले. भारतासाठी ६७ कसोटी सामन्यांमध्ये त्याने ४०.५७ च्या सरासरीने धावा केल्या, परंतु घराबाहेर त्याची सरासरी ३१.०१ पर्यंत घसरली. ऑस्ट्रेलियामध्ये रोहितची सरासरी २४.३८ होती आणि दक्षिण आफ्रिकेत ती १६.६३ होती. तथापि, इंग्लंडमध्ये त्याने ४४.६६ च्या सरासरीने धावा केल्या. गेल्या दौऱ्यात त्याने सलामीला फलंदाजी करताना शतकही झळकावले आहे. रोहितच्या निवृत्तीनंतर, टीम इंडिया यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल यांना कसोटी संघात कायमस्वरूपी सलामीवीर म्हणून बसवण्यावर लक्ष केंद्रित करू शकते.

रोहित न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध अपयशी ठरला होता. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या कसोटी मालिकेतही रोहित फलंदाजीत खूपच खराब कामगिरी करत होता. तो न्यूझीलंडविरुद्ध १५.१६ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध ६.२० च्या सरासरीने धावा करू शकला. निवडकर्त्यांनी आता निर्णय घेतला आहे की रोहितच्या या फॉर्ममुळे त्याला कर्णधारपदाची जबाबदारी देता येणार नाही. जर रोहितकडून कसोटी कर्णधारपद काढून घेतले गेले तर हे देखील स्पष्ट होईल की इंग्लंडमधील त्याच्या खराब कामगिरीमुळे त्याला प्लेइंग-११ मधूनही वगळले जाऊ शकते. ऑस्ट्रेलियामध्येही रोहितने सुरुवातीच्या सामन्यांमध्ये सलामी दिली नाही. या मालिकेत सलामीवीर म्हणून यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल यांनी शानदार कामगिरी केली होती. रोहित पहिला कसोटी सामना खेळू शकला नाही. दुसऱ्या कसोटीत तो प्लेइंग-११ चा भाग बनला, पण मधल्या फळीत फलंदाजी करायला आला. त्यानंतर जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारताने पहिला कसोटी सामना जिंकला, परंतु रोहितच्या नेतृत्वाखाली २ सामने गमावले. तो सिडनीमधील शेवटचा कसोटी सामना खेळला नाही आणि आता त्याने निवृत्ती घेतली आहे. एका इंग्रजी प्रसारमाध्यमातील वृत्तानुसार, जूनमध्ये सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया नवीन कसोटी कर्णधाराची निवड करेल. तथापि, रोहितला फलंदाज संघाचा भाग म्हणून ठेवण्यात येईल. निवडकर्त्यांचा निर्णय स्वीकारण्यास बीसीसीआय तयार असल्याचेही म्हटले जात आहे. ३८ वर्षीय रोहितकडून कसोटी कर्णधारपद काढून घेण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याचा रेड बॉल क्रिकेटमधील फॉर्म असल्याचे मानले जाते. तसेच त्याच्या नेतृत्वाखाली, संघाला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध ३-0 असा पराभव पत्करावा लागला आणि ऑस्ट्रेलियातील बॉर्डर गावस्कर ट्रॉफीम ध्येही ३-१ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवांमुळे, टीम इंडिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकली नाही.

### कर्णधारपदी राहण्याची रोहितने व्यक्त केली होती इच्छा

मार्चमध्ये, त्याच एक्सप्रेसच्या वृत्तात असे म्हटले होते की बीसीसीआय इंग्लंड दौऱ्यासाठी रोहितला कर्णधार म्हणून कायम ठेवेल. रोहितने स्वतः ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकेल क्लार्कसोबतच्या पॉडकास्टमध्ये कर्णधारपद सुरू ठेवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. रोहित म्हणाला होता की इंग्लंडमध्ये बुमराह, शमी आणि सिराज यांच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करण्यास तो उत्सुक आहे. तथापि, निवड समितीने अलीकडेच मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात झालेल्या बैठकीत बोर्डाला त्यांच्या भविष्यातील योजनेबद्दल सांगितले. बीसीसीआयच्या एका सूत्राने स्पष्ट केले आहे की, 'निवडकर्त्यांना इंग्लंड दौऱ्यासाठी नवीन कर्णधार हवा आहे आणि रोहित आता कसोटी कर्णधारपदासाठी योग्य नाही. विशेषतः लाल चेंडूतील त्याच्या खराब फॉर्ममुळे तो या फॉरमॅटसाठी योग्य नाही. निवडकर्त्यांना थढउ च्या नवीन चक्रासाठी एका तरुण कर्णधाराकडे जबाबदारी सोपवायची आहे. समितीने बीसीसीआयला असेही कळवले आहे की रोहित आता कसोटी कर्णधार राहणार नाही.

# कॉरिडोर बाधितांसाठी माजी खासदार डॉ. सुब्रम्हण्यम स्वामी मैदानात

### 'ड्रीम प्रोजेक्ट' विरोधात लढणार न्यायालयीन लढाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ७ मे-**

पंढरपुरातील कॉरिडोरमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांच्या पाठीशी ठापणे उभे राहून प्रसंगी राज्यशासनाशी न्यायालयीन लढाई लढण्यासाठी माजी खासदार सुब्रम्हण्यम स्वामी हे आता थेट मैदानात उतरले आहेत. स्वामींनी आपले सहकारी अँड. मनोहर शेट्टी यांना पंढरपूरात संभाव्य कॉरिडोर बाधित नागरिकांशी चर्चा करण्यासाठी पाठविले असून बुधवारी येथील होळकर वाड्यात अॅड. शेट्टी आणि कॉरिडोर बाधित नागरिकांची बैठक आयोजिण्यात आली आहे.






दरम्यान पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी राज्य शासनाने पंढरपूरात कॉरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र मंदिर परिसरातील व्यापारी व नागरिकांनी या कॉरिडॉरला विरोध दर्शविला आहे. यासाठी बुधवारी सायंकाळी सात वाजता राजमाता अहिल्यादेवी होळकर वाड्यामध्ये माजी खा.सुब्रमण्य स्वामी यांचे सहकारी अँड. मनोहर शेट्टी यांच्याबरोबर कॉरिडॉर बाधितांची बैठक होणार आहे. या बैठकीत कॉरिडोरला विरोध करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यासाठी चर्चा करण्यात येणार आहे. पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येथे येत असतात. येथे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्या. भाविकांचे येथील वास्तव्य सुखकर व्हावे यासाठी शासनाने पंढरपूरत कॉरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी गेल्या आठवड्यात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूरला तीन दिवस तळ ठोकून चौफाळा ते महाद्वार घाट पर्यंतच्या सहाशे व्यापारी व मालमत्ता धारकांबरोबर चर्चा केली आहे. यामध्ये त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. मात्र दुसरीकडे कॉरिडोरला व्यापाऱ्यांनी विरोध दर्शविला असल्याचे दिसून येत आहे. याबाबत त्यांनी आपल्या दुकानात कॉरिडॉरला विरोध दर्शविणारे फलक लावले आहेत. गेल्या अनेक वर्षापासून आम्ही मंदिर परिसरात व्यवसाय करतो वर्षातील चार यात्रेमध्ये मंदिर परिसरात गर्दी होते. मात्र एरव्ही गर्दी नसते. त्यामुळे येथे कॉरिडोर करण्याची गरज नाही अशी भूमिका घेऊन व्यापाऱ्यांनी कॉरिडॉरला विरोध दर्शविला आहे. गेल्या दोन दिवसापासून पंढरपुरातील व्यापारी व नागरिकांच्या बैठका होत आहेत. आता माजी खा. सुब्रमण्य स्वामी यांचे सहकारी अँड मनोहर शेट्टी यांच्याबरोबर कॉरिडॉर बाधित नागरिक चर्चा करणार असून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबत बैठकीत विचार विनिमय करण्यात येणार आहे. येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर वाड्यामध्ये ही बैठक बोलाविण्यात आली आहे या बैठकीस कॉरिडॉरमध्ये बाधित होणाऱ्या मालमत्ता धारकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे या बैठकीत कोणता निर्णय होणार याकडे पंढरपूरवासियांचे विशेषत: संभाव्य कॉंरिडोर बाधित नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## महत्वाचे...



### शैक्षणिक महासंघातर्फे मंत्री मंगलप्रभात लोढा यांना निवेदन

**बार्शी, दि. ७ मे-**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी शास्त्रज्ञ डॉ. किरण झरकर, राजीव गायकवाड, मनोहर सूर्यवंशी, सखाराम जगताप, नंदकुमार पानसे, रतिकांत पवार, डॉ. विलास जोंधळे यावेळी उपस्थित होते. यात मिलराईट मेंटेनन्स या पदावरील कर्मचाऱ्यांचा १० वर्षाचा प्रलंबित लाभ देणे, ८ मार्च १९९९ पुर्वीच्या शिल्प निदेशकांच्या शासन निर्णयाप्रमाणे अभवीत सेवा नियमित करुन त्यांना फरक देणे, आय टी आय च्या जागा इतर विभागांना हस्तांतरित होत असल्यास मुळ संस्थेची सोय झाल्याशिवाय त्या करू नयेत, आपसात विनंती बदलीसाठी ऑनलाईन सोय करावी तसेच अल्पसंख्यांक, सार्वत्रिकरन, प्लॅन, एस.सी.पी. या सर्व योजनांची पदे नॉन प्लॅन मध्ये घ्यावीत म्हणजे त्यांचे वेतन वेळेवर होईल अश्या मागण्या मांडल्या. यावेळी मंत्री लोढा यांनी सर्व मागण्यांवर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. या भेटीसाठी महासंघाचे प्रांतिक महासचिव प्रा. डॉ. वैभव नरवडे, गोपाळ महाजन, मुकुंद देशपांडे, अजय देशपांडे यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

### स्थानिक स्वराज्य संस्थाची निवडणूक; गावगाड्यातील पुढारी झाले सक्रीय

**पिलीव, दि ७ मे -**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जवळपास तीन वर्षापासून रखडलेल्या होत्या. यामध्ये ओबीसी आरक्षणाचा विषय न्यायालयात प्रलंबित होता. सुप्रीम कोर्टाने ओबीसी आरक्षणाचा निकाल देत चार महिन्याच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याचा आदेश दिल्यामुळे गावगाडयातील पुढारी आता सक्रीय झाले आहेत.



गावगाडयातील राजकारण ठप्प झाले होते. लोकसभा, विधानसभा झाली तरीही या निवडणुका रखडल्यामुळे गावगाडयातील पुढारी अक्षरशः हतबल झाले होते. अनेक पुढारी तर आम्ही काय खासदार व आमदारांच्या नुसत्या सतरंज्या उचलायलाच्या का? असे म्हणत हतबल झाले होते. ६ मे रोजी सुप्रीम कोर्टाने ओबीसी आरक्षणाचा निकाल देत चार महिन्याच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेणयाचा आदेश दिला व गावगाडयातील पुढाऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. चार आठवड्याच्या आत निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे. यामुळे गावगाडयातील पुढारी सध्या चांगलेच सक्रिय झाल्याचे दिसत आहेत. मिनी मंत्रालयात जाणयासाठी आपल्या गॉडफादर मार्फत तिकीट मिळविणयासाठी ईच्छुक पुढारी चांगलेच सक्रिय झाल्याचे दिसत आहे.



### महेश इंगळे यांचा स्विमींग ग्रुपच्या वतीने सत्कार


**अक्कलकोट, दि. ७ मे-**

महेश इंगळे यांना करमाळा येथील यश कल्याणी सेवाभावी संस्थेच्या वतीने नुकतेच यशकल्याणी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या अभिनंदननीय कार्याची दखल घेऊन येथील स्विमिंग ग्रुपच्या वतीने स्विमिंग ग्रुपचे ज्येष्ठ मार्गदर्शक सुधाकर पाटील यांच्या हस्ते स्विमिंग ग्रुपचे संस्थापक महेश इंगळे यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी स्विमिंग ग्रुपचे अशोक कलशेट्टी, सुधाकर काका, विश्वनाथ देवरमणी, मनोज जगताप, अशोक कलशेट्टी, मल्लिनाथ मळी, राजीव एकबोटे, चंद्रकांत सोनटक्के, सुनील पवार, अप्पू पराणे, बाबा सुरवसे, सचिन किरनळ्ळी, अरविंद पाटील, शेखर आडवीतोटे, शैलेश राठौर, बाळासाहेब एकबोटे, सोमनाथ सुतार, ज्ञानेश्वर भोसले, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, स्वामीनाथ गवळी, युवराज सोनटक्के, अमित घाटगे, आदित्य गवंडी, ऋतिक माने, प्रसाद माने, अमित नंदीकोले, अंकुश केत उपस्थित होते.

### एकरूख गावात महिलेसह तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. ७ मे-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील एकरूख गावात मंगळवरात्री ९ च्या सुमारास महिलेसह तिघांना मारहाण करण्यात आली. मारहाणीत जखमी झालेले तिघे बुधवारी रात्री एकच्या सुमारास रुग्णालयातून पळून गेले. भारत मनोहर सोनवणे (वय ६५), संगिता भारत सोनवणे (वय ४०) व भोलेनाथ भारत सोनवणे (वय २४, रा. एकरूख ता उ सोलापूर) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास भारत हे राहत्या घराजवळ थांबले होते. त्यावेळी शिवा कांबळे, दिपक कांबळे व इतर तीन लोक तेथे आले. त्यांनी भारत सोनवणे व इतर दोघांना दगड, काठी व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यातील जखमी हे रात्री दहाच्या सुमारास स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाले. परंतु बुधवारी रात्री एकच्या सुमारास तिघेही रुग्णालयातून पळून गेल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# बार्शीत पालकमंत्री गोरे यांच्या समोरच झाली घोषणाबाजी

### आजी-माजी आमदारांनी केले स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ मे-**

विविध विकासकामाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने बार्शी दौऱ्यावर असलेल्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या स्वागतावेळी आजी माजी आमदार उपस्थित राहिल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण होऊन घोषणाबाजी झाल्याची घटना बार्शी शहरात घडली.



बार्शी नगरपरिषदेच्यावतीने बांधण्यात येणाऱ्या भक्त निवासाचे भूमिपूजन, कांदलगाव येथील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आणि भगवंत महोत्सवात उपस्थिती यासाठी पालकमंत्री बार्शीत आले होते. हॉटेलमध्ये माजी आमदार राजेंद्र राऊत आणि भाजपचे कार्यकर्ते त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. दरम्यान याचवेळी आमदार दिलीप सोपल हे देखील निवडक कार्यकर्त्यांसह आले. पालकमंत्री येईपर्यंत आजी-माजी आमदार व कार्यकर्ते शेजारी बसले मात्र त्यांच्यात संवाद झाला नाही. पालकमंत्री येताच राजाभाऊंच्या कार्यकर्त्यांनी राजूभाऊ आगे बढो.. जय श्रीराम अशा घोषणा सुरू केल्या. यादरम्यान दिलीप सोपल व त्यांच्या कार्यकर्त्यांनीही पालकमंत्री यांचे स्वागत केले. यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. तत्काळ सत्कार करून आमदार दिलीप सोपल हे निघून गेले व पालकमंत्री हॉटेलमध्ये थांबले.

# टेंभूर्णीतील शिबीरात ६० जणांचे रक्तदान

### पिंगळे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.७ मे-**

टेंभुर्णी येथील महेश बापू पिंगळे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित शिबिरामध्ये ६० जणांनी रक्तदान केले. पंढरपूर ब्लड बँकेने रक्तसंकलन केले. शिबिरा नंतर प्रत्येक रक्तदात्यास फळांची झाडे भेट देण्यात आली वृक्षारोपण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले, याचे सर्वच स्तरांम धून कौतुक होत आहे व हा एक आगळा वेगळा उपक्रम राबवला गेल्याचे बोलले जात आहे. सदर रक्तदान शिबिर ई. दहावीतील वर्गमित्र ग्रुप यांच्यावतीने आयोजित केले होते तसेच झी टॉकीज फेम कविराज महाराज झावरे यांचे सुश्राव्य असा कीर्तन सोहळा पार पडला यामध्ये टेंभुर्णी व परिसरातील सर्व नागरिक, नातेवाईक आणि महेश बापू चा मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कै.महेश बापू पिंगळे यांच्या मित्र परिवारातील मनोज नांगरे यांची नुकतीच चव्हाणवाडी गावच्या सरपंच पदी निवड झाल्याबद्दल ही सत्कार महेश बापूंचे वडील दादा पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश पिंगळे शिवाजी भैय्या येवले पाटील , पांडुरंग चिवडे ,जाफर तांबोळी ,डॉ. सुहास अनंतकवळस अजित बेसुळके, सुनील कुठे, औदुंबर घळके, संतोष लाटणे, सचिन तांबे अमोल ताबे सुयश शहा, सुनील पवार, सिद्धेश्वर गणगे, दीपक वाघमोडे संभाजी देशमुख, सिद्धेश्वर शिंदे, समाधान माने अनिकेत चौगुले, शशिकांत पवार महेश तरटे, श्रीकांत जाधव सुधीर पाठमास सचिन पाठमास सुनील सुक्रे नितीन कदम, प्रवीण येवले पाटील आणि महेश बापू मित्रपरिवार , इयत्ता दहावी वर्ग मित्रपरिवार आणि कोटक महिंद्रा बँक मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.



# भगवंतांच्या पादुकांची झाली विठ्ठल-रुक्मिणी भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मे -**

पुणेच्या भगवंत महोत्सव मंडळाच्यावतीने भगवंताच्या पादुका आणि विठुरायाच्या भेटीचा सोहळा बुधवारी (ता.७) संपन्न झाला. यावेळी मंदिरात भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे भगवंत महोत्सव मंडळातर्फे सकाळी बार्शी येथे श्री भगवंत व श्रींच्या पादुकास अध्यक्ष ओंकार एकशिंगे यांच्या हस्ते सपत्नीक महापुजा झाली. त्यानंतर श्रींच्या पादुकांची श्री भगवंत मंदीर ते शिवाजी कॉलेज पर्यंत शोभा यात्रा काढण्यात आली. त्यानंतर श्रींच्या पादुका या तिर्थक्षेत्र पंढरपूरात आणण्यात आल्या. भाविकांनी उत्साहात स्वागत केले. त्यानंतर पादुकांना चंद्रभागा नदीत स्नान घालण्यात आले. चंद्रभागा स्नानानंतर त्या पादुका श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेस भेटवण्यासाठी मंदिरात नेण्यात आल्या. मंदिरामध्ये विठ्ठल आणि भगवंतांच्या पादुकांची भेट घडविण्यात आली. यावेळी भाविकांनी पुंडलिक वरदे हरि विठ्ठलचा जयघोष केला. यावेळी अध्यक्ष ओंकार एकशिंगे,उर्मिला एकशिंगे, कार्याध्यक्ष प्रविण शिरसीकर, उपाध्यक्ष अरुण उन्हाळे, सचिव कैलास बडवे, चिन्मय कुलकर्णी, सुनंदा परंडकर, सुनिता पाटील, अनघा बडवे उपस्थित होते.



# पगारवाढीच्या फरकासाठी महावितरणचे आंदोलन

### अकलूजच्या कार्यकारी अभियंत्यास दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ मे-**

पगारवाढ जाहीर होऊन ७ महिने झाले तरी कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यावर पगरवाढीची फरक रक्कम जमा झाली नसल्याने महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या वतीने १५ मे रोजी धरणे आंदोलन करण्याचे निवेदन अकलूज विभागाचे कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले.




राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि ९ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरणच्या कंत्राटी कामगारांना १९ टक्के पगारवाढ जाहीर केली होती. एप्रिल २०२४ पासून ही पगार वाढ लागू करण्याचा शासन निर्णय जाहीर केला होता. परंतु एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ असा ६ महिनेचा फरक जमा झालेला नाही. महावितरण कंपनीच्या प्रचलित नियमानुसार प्रत्येक महिन्याच्या ०७ तारखेलाच बाह्यस्त्रोत कर्मचारी यांचे मासिक वेतन बँक खात्यावर जमा होत नाही. सर्व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांना अद्यापपर्यंत कार्ड मिळाले नाही. या सर्व मागण्या तात्काळ पूर्ण होण्यासाठी सर्व बाह्यस्त्रोत कर्मचारी गुरुवार दिनांक १५ मे २०२५ रोजी विभागीय कार्यालय अकलूज येथे बेमुदत धरणे आंदोलन करणार आहोत तरी वरील मागण्याचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा असे निवेदन महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या कंत्राटी कामगारांनी दिले आहे. यावेळी अकलूज विभाग प्रमुख सतीश लावंड ,सचिव संजय माळी, शाहरुख मुलाणी, सतिश पारसे, ओंकार अनुसे, दीपक गोरड, नागनाथ पारसे, अनिल बाबर व सर्व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

# गौरी वाघमारे माहिती तंत्रज्ञान विषयात राज्यात प्रथम



**सांगोला,दि.७ मे-**

बारावीत सांगोला विद्यामंदिर ज्यु. कॉलेजची विद्यार्थीनी गौरी रमेश वाघमारे हिने माहिती तंत्रज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम आली. तनुजा शेख ९८, प्राची बाबर, हर्षल दौंडे ९७, प्रेरणा हुंडेकरी, गायत्री पवार, प्रतीक्षा पवार ९६, विशाखा दौंडे ९५, विदिशा इंगोले, मधुरा पैलवान, आदित्य पवार, गुरूनाथ व्हटे ९४, जयदीप मेनकुदळे, श्वेता इंगोले, अरमान नदाफ, मानसी सुरवसे ९३, इफ्रावाहब शेख ९२, तनिष्का भागवत, अंजली भोसले, संस्कृती खाडे ९१, शुभम कदम, मिरा बंडगर, दिशांत झुंगरे, रिंकू पवार ९० असे एकूण २४ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त गुण प्राप्त केले.संगणक शिक्षक प्रा.उमेश देशमुखे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रबुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, शहिदा सय्यद, प्रकाश म्हमाणे, सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले यांनी अभिनंदन केले.

# बार्शीसह पुण्यातील कलाकारांची रंगली सुरेल मैफल

### 'आती रहेंगी बहारे' हा मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.७ मे -**

पुणेच्या श्री तुकाई क्रिएशन्स प्रस्तुत 'आती रहेगी बहारे' या मराठी व हिंदी गीतांच्या सुरेल मैफलीने बार्शीकरांना दंग केले. येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा गौरी रसाळ, जिजाऊ सावित्री रमाई महिला बालविकास समितीच्या अध्यक्षा डॉ. स्मिता सुरवसे आणि सर्व गायक कलाकर यांच्या हस्ते कलेची देवता नटराजाचे पूजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.



या कार्यक्रमाची संकल्पना व निर्मिती व गायन मूळ बार्शीचे पण पुणेस्थित असलेले देविदास पाटील व दिपक जोशी यांची होती. गायक कलाकार पुण्याच्या विदुला आरेकर आणि पवित्रा गुजराथी, बार्शीचे डॉ. मदन देगांवकर, वर्षा रसाळ, सुर्यकांत वायकर तसेच निवेदन सौ. माधुरी शिंदे व सौ. मंजुषा राऊत यांनी केले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे मो. रफी, मुकेश, किशोरकुमार यांच्याशिवाय इतर गायकांचीही सुरेश वाडकर, मन्ना डे, येसुदास, हेमंतकुमार, महेंद्रकपूर, कुमार सानू, शैलेंद्रसिंग, तलत मेहमूद, शब्बीरकुमार अशा दिग्गज नामांकित गायकांची गाणी या कार्यक्रमाम ध्ये पुण्याच्या व बार्शीच्या गायक कलाकारांनी आपल्या मधूर आवाजात सादर केली. गीत गाता चल, मेघा रे मेघा रे, ए रात भिगी भिगी, तुमको मेरे दिलने, तुझको मेरा प्यार पुकारे, आ जाने जा, दिलकी ये आरजू थी अशी हिंदी गीत आणि अधीर मन झाले, सजनी गं अशा मराठी गीतांची सुंदर मेजवानी बार्शीकरांसाठी कलाकरांनी सादर केली. अनेक गीतांना 'वन्समोअर' देवून उत्स्फुर्त प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला. कार्यक्रमास शिक्षण, वैद्यकीय, संगीत, व्यवसाय आदी क्षेत्रातील रसिक प्रेक्षकवर्ग उपस्थित होता. बार्शीमध्ये ज्यांचा ऑर्केस्ट्रा होता ते संगीत क्षेत्रातील निपुण देवेंद्र अणवेकर हेही या कार्यक्रमास उपस्थित होते. खास पुण्याहून आलेल्या गायक कलाकरांनी बार्शीच्या रसिक प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमांची सांगता 'शोर' या चित्रपटातील 'इक प्यार का नगमा है' या गीतातून मनोजकुमार या महान कलाकारास श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्ह्यात सायबर सिक्युरिटी व आयटी पार्कचे जाळे उभारणार : संतोष कोरट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे**

आपल्या सोलापूर जिल्ह्यात आयटी हब विकसित व्हावा, सायबर सिक्युरिटीसारख्या आधुनिक क्षेत्रात नव्या संधी निर्माण व्हाव्यात, यासाठी दुबई दौऱ्यावर असून, यादरम्यान IBM across Gulf, frica Egypt चे सायबर सिक्युरिटी बिझनेस हेड संतोष कोरट यांच्याशी चर्चा झाली.

आपल्या सोलापूरमध्ये आयटी व सायबर सिक्युरिटी क्षेत्रात कशाप्रकारे भक्कम पायाभूत विकास करता येईल, यावर त्यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली. सोलापूरच्या औद्योगिक प्रगतीसाठी 'सोलापूर- दुबई फोरम' स्थापन करण्यात येणार असून संतोष कोरट यांनी यामध्ये सक्रिय सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. त्याच अनुषंगाने, लवकरच सोलापूरमध्ये आयटी उद्योजकांसाठी ठोस आराखडा सादर केला जाईल व नव्या स्टार्टअप्ससाठी पोषक वातावरण निर्माण करण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीस मूळचे सोलापूरचे सुपुत्र अमित तोडकर, अबूधाबी डिफेन्स विभागात कार्यरत चंद्रशेखर जाधव आणि सोलापूर-दुबई शिष्टमंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते.

# बाजार समितीच्या सभापतीची सूत्रे आमदार कल्याणशेट्टींच्या हाती

- ज्याच्या पारड्यात पडणार कल्याणशेट्टीचे वजन; तोच होणार बाजार समितीचा कर्णधार
- उपसभापती पदासाठी अनिता विभुते, सुनील कळके यांच्या वर्णीची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

राज्यातील अव्वल क्रमांकाची असणारी ही बाजार समिती आपल्या वर्चस्वाखाली राहावी, यासाठी अनेक नेते मंडळींनी चंग बांधला आहे. काँग्रेस भाजप अशी युती करून बाजार समितीवर आपलाच झेंडा फडकावला आहे. मात्र, आता सभापतीचे घोंगडे भिजत पडले आहे. माजी सभापती तथा माजी आमदार दिलीप माने आणि काँग्रेसचे दक्षिण तालुक्यातील नेते किंग मेकर अशी ख्याती असलेले सुरेश हसापुरे यांच्यामध्ये सभापतीपदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झालेली



आहे. सहकारी संस्था आणि सोसायटी यांच्यावरील आपले वर्चस्व अबाधित ठेवत माने-हासापूरे गटाने पुन्हा एकदा बाजार समितीवर आपला झेंडा फडकावला आहे. बाजार समितीवर आपल्याच गटाचे वर्चस्व सिद्ध झाल्यानंतर आता सभापतीसाठी वरिष्ठ पातळीपासून ते बाजार समिती पातळीपर्यंत जोरदार हालचाली सुरू आहेत. रविवार (दि.११)मे रोजी निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात येणार आहे. । कै.लोकनेते बाबुराव अण्णा चाकोते सभागृहात नूतन पदाधिकारी निवडीची पहिली सभा होणार आहे. त्यापूर्वी सभापती नावावर असे काम मुहूर्त होईल असे सांगण्यात येत आहे. यासाठी सभापतीचा चेंडू मुख्यमंत्र्याच्या कोर्टात दाखल झाला होता. मुख्यमंत्री फडणवीस हेच सभापतीचे नाव ठरवतील असे यापूर्वी



सांगण्यात आले होते. परंतु आता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडेच सभापती पदाची सूत्रे सोपवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे ज्याच्या पारड्यात कल्याण शेट्टीचे पडणार वजन तोच बणणार बाजार समितीचा कर्णधार असे राजकीय सम ीकरण बाजार समितीच्या राजकीय वर्तुळात निर्माण झाले आहे.

### दिलीप माने आणि सुरेश हसापुरे यांच्यात रस्सीखेच

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सत्ताधारी पॅनलने राज्यातील सत्ताधारी पॅनलला शह देत, पुन्हा एकदा राज्यातील विक्रमी आर्थिक उलाढालीसाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर आपले वर्चस्व अबाधित ठेवले आहे. परंतु आता विजयी पॅनलमध्येच सभापती व उपसभापती पदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. यापूर्वी बाजार समितीचे सभापती हे पद दिलीप माने, राजशेखर शिवदारे यांनी भोगलेले आहे. तर उपसभापती म्हणून सुरेश हसापुरे यांनी कामकाज केले आहे. मागील निवडणूक जिंकल्यानंतर माने यांच्या गळ्यात सभापती तर उपसभापती म्हणून श्रीशैल नरोळे यांच्या गळ्यात माळ पडली होती. परंतु काही दिवसांत माने यांच्या जागेवर भाजप आ.विजय देशमुख यांना विराजमान केले होते. या राजकीय घडामोडीत हसापुरे यांची चाणक्यनीती कामी आली होती. आताच्या राजकीय घडामोडी पाहता सुरेश हसापुरे हे पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात मोठा धक्का देतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस आणि आमदार कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली जरी बाजार समितीची ही निवडणूक हसापुरे यांनी लढवली असली तरीही, राजकीय आखाड्यात अंतर्गत विरोधकांना अस्मान दाखवण्यात पटाईत असणारे हसापुरे जादूची कांडी फिरवावी तशी राजकीय गणितं फिरवण्याचा अनुभव आपल्या गाठीशी बांधून आहेत. त्यामुळे सभापतीपदी नेमके कोण विराजमान होणार? या दोघांपैकी एकाचे नाव अंतिम होते की ऐनवेळी तिसरे नाव पुढे येते, याबाबत देखील उत्सुकता कार्यकर्त्यांमध्ये लागून राहिलेली आहे. त्याचप्रमाणे उपसभापती पदावर अनिता विभोते किंवा सुनील कडके या दोघांपैकी एकाची वर्णी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या सर्व जर तर च्या घडामोडींवर येत्या रविवारी शिक्का मोर्चा होणार आहे. एवढे मात्र नक्की!





# इनामदार गुरुजी पुण्यतिथी निमित्त गुलाल सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

शहर व परिसरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांचे परमशिष्य श्री दिगंबर पांडुरंग इनामदार गुरुजी यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त वैशाख शुद्ध दशम ीला बुधवारी सम्राट चौक येथील सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात गुलाल सोहळा भक्तीमय ातावरणात झाला.

प. पू. इनामदार गुरुजी पुण्यतिथी निमित्त बुधवारी दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते. प. पू. इनामदार गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात रंगीबेरंगी फुलांची सजावट करण्यात आली होती. बुधवारी श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरामध्ये सकाळी ९ वाजता गुरुगीता पारायणाची सम ाप्ती झाली. तसेच सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत भाविकांनी भजन केले. दुपारी १२ वाजता शेकडो भाविकांच्या उपस्थितीत गुलालाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर हजारो भाविकांना खीर, वांग्याच्या भाजीचा महाप्रसाद देण्यात आला.

याप्रसंगी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वसंत बंडगर, वामन वाघचौरे, सदस्य सुभाष बद्दुरकर, रामभाऊ कटकधोंड, रवी गुंड, सम्राट राऊत, प्रभाकर कुलकर्णी, रमेश देशमुख, व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.

# डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरणाचा तपास सीआयडी किंवा एसआयटीकडे सोपवावा

- शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हाप्रमुखांची राज्य गृहमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येला साधारण वीस दिवसांचा कालावधी लोटला. तरीही पोलिसांच्या हाती आरोपी विरुद्ध ठोस असा पुरावा लागला नाही. यामुळे या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी तपास सीआयडी किंवा एसआयटीकडे सोपवावा अशी मागणी शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हाप्रमुखाने राज्य गृहमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

डॉ. वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी रात्री ८:३० च्या सुमारास राहत्या घरातील बाथरूम मध्ये स्वतः कडील पिस्तूल मधून



डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली. यानंतर याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात त्यांचा मुलगा डॉ. अश्विन वळसंगकर यांच्या फिर्यादीवरून रुग्णालयातील महिला कर्मचा-याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी महिला कर्मचारी मनीषा मुसळे-माने हिला ताब्यात घेतले. त्यानंतर तपास कामासाठी पाच दिवस तिला पोलीस कोठडी मिळाली होती. या कालावधीत पोलिस कोणत्याच ठोस भूमिकेपर्यंत पोहोचू शकले नाहीत. यामुळे या प्रकरणाची शहरात चर्चा होऊ लागली.

ती चर्चा अनेक अंगांनी होऊ लागली. तरीही पोलीस केवळ तपास सुरू आहे या नावाखाली हे प्रकरण हाताळताना दिसले. दरम्यान सुरुवातीला या प्रकरणाचा तपास महिला अधिकाऱ्याकडे देण्यात आला होता. परंतु त्यांच्याकडील तपास काढून घेण्यात आला आणि तो पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला. तो अधिकारी व्यवस्थित तपास करत नाहीत तसेच या प्रकरणाबाबत मीडियासमोर माहिती देण्यास टाळाटाळ करतात.परिणामी गृह खात्याची प्रतिमा मलिन होत असल्याचे दिसून येत आहे.


या प्रकरणाचा सखोल असा तपास होण्याकरिता हे प्रकरण सीआयडी किंवा एसआयटी विभागाकडे सोपवावे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाची प्रत राज्याचे मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक तसेच पोलीस आयुक्त यांना पाठविल्याचे नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजी यांची सही आहे.

# 'सिंहगड'च्या जय जय महाराष्ट्रमध्ये घडले सांस्कृतिक समृद्धतेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ मे-**

सिंहगड पब्लिक स्कूलच्या वतीने महाराष्ट्र दिनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मोहोळ आणि सोलापूर शहर अशा दोन्ही ठिकाणी केले होते. या जय जय महाराष्ट्रमध्ये सांस्कृतिक समृद्धतेचे दर्शन घडले.

महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त १ मे महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला मोहोळ येथील नागप्पा घाटुळे मंगल कार्यालय आणि दुसऱ्या दिवशी शहरातील हुतात्मा स्मृती मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वन्स मोअर डान्स अकॅडमी व नृत्य उपासक शरद मिटकरी प्रस्तुत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई, उपनगरीय



शाखा, सोलापूर आणि सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, उपनगरीय शाखेचे विजय साळुंके, मोहोळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे, सिंहगड पब्लिक स्कूलचे प्राचार्य शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, माजी कुलगुरू, सीआरटीडीचे संशोधन संचालक शिवाजी पवार यांची उपस्थिती होती. राष्ट्रगीत व राज्य गीत गर्जा महाराष्ट्र माझा गाऊन ध्वजवंदन केले. कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला. नृत्य दिग्दर्शन सुदर्शन माने, विनायक शिंदे, अंकुश वाघमारे, हरिष पुष्ठा, संस्कृती गोरे यांचाही सत्कार केला. कार्यक्रमात महापालिका उपायुक्त लोकरे, पाखर संकुलाच्या शुभांगी बुवा उपस्थित होते.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेतर्फे ९ बटूंवर उपनयन संस्कार

- बटूंना शुभाशिर्वाद देण्यासाठी अनेक मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ मे-**

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर यांच्यातर्फे बुधवारी (दि. ७) द्वारकाधीश मंदिरात नऊ बटूंवर सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

बाजार समितीचे नूतन संचालक मनीष देशमुख यांच्यासह ब्राह्मण समाजातील अनेक मान्यवर नागरिक यावेळी उपस्थित होते. या उपनयन सोहळ्याचे पौरोहित्य जयंत तुळजापूरकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडले.

द्वारकाधीश मंदिरात सकाळी सात वाजून ३० मिनिटांनी या उपनयन सोहळ्यास सुरुवात झाली. त्यानंतर एक एक





विधी होत बरोबर दहा वाजून तेरा मिनिटांनी बटूंवर अक्षदा पडल्या. या कार्यक्रमाची सुरुवात द्वारकाधीश मंदिरातील गोमातेचे पूजन करून करण्यात आली. तसेच यावेळी लक्ष्मीनारायण प्रतिमेचे, समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन आणि कलशस्थापनाही करण्यात आली. या सोहळ्यात अहिल्यानगर, पालघर येथील बटूंसह सोलापुरातील बटूही सहभागी झाले होते. हा मौजीबंधन सोहळा पूर्णपणे मोफत करण्यात आला. तसेच मुंजी साठी लागणारे सर्व साहित्य आणि सर्व धार्मिक विधी संस्थेतर्फे केले गेले.

गेल्या जवळपास एक-दीड महिन्यापासून या सोहळ्याची तयारी करण्यात आली होती.यानिमित्ताने आयोजित रक्तदान शिबिरात अनेकांनी रक्तदान करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली.

यासाठी डॉ. हेडगेवार रक्त संकलन केंद्राचे व्यवस्थापक रंगनाथ जोशी, जनसंपर्क अधिकारी सुनील हरहरे यांच्यासह त्यांच्या टीमने सहकार्य केले. सध्या कडक उन्हाळा सुरू असल्याने रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. तसेच रक्तदान शिबिरासही प्रतिसाद कमी प्रमाणात मिळत आहे. त्यामुळे विविध संस्थांनी रक्तदान करून सहकार्य करावे, असे आवाहन रक्त संकलन केंद्राचे व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास अखिल देऋब्रा मध्यवर्ती मंडळ मुंबईच्या सचिवा रोहिणी तडवळकर, दत्ता आराध्ये, दत्तात्रय पाठक, संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, महिला अध्यक्षा हेमा चिंचोलकर, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, विजय कुलकर्णी, शंकरराव कुलकर्णी, रंगनाथ जोशी, राम तडवळकर, अमृता गोसावी संपदा जोशी, निशिकांत खेडकर, नितीन कुलकर्णी, बजरंग कुलकर्णी, डी. डी. कुलकर्णी, रवींद्र नाशिककर, सीमा देशपांडे, श्रीकांत कुलकर्णी, क्षितिजा गाताडे उपस्थित होते.

### अनेकांचे अर्थसाह्य

हा उपनयन संस्कार सोहळा यशस्वी होण्यासाठी महिला शाखेच्या अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, संस्थेचे कार्यकारणी सदस्य शंकरराव कुलकर्णी यांच्यासह अनेकांनी अर्थसाह्य करून संस्थेच्या कार्यास हातभार लावला. मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक तसेच लोभा पाटीदार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही सोहळा यशस्वी करण्यासाठी द्वारकाधीश मंदिर उपलब्ध करून दिले. पद्माकर कुलकर्णी यांच्यातर्फे बटूंना उपनयन संस्काराची माहिती देणारे तर सीमा देशपांडे यांच्यातर्फे धार्मिक पुस्तक भेट देण्यात आली. रोहिणी तडवळकर यांच्यातर्फे बटूंना भेटवस्तू देण्यात आली.

# सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाचा बेजबाबदार कारभार

- शाळांना वाटप करण्याचे २०१७ चे फुटबॉल अजूनही क्रीडा कार्यालयात
- सर्व फुटबॉल वाटप झाल्याचा अहवाल तत्कालीन जिल्हाक्रीडाधिकारी युवराज नाईक यांनी पाठविला होता
- चौकशीनंतरही अद्यापपर्यंत काही फुटबॉल गोडाऊनमध्ये

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. ७ मे -**

राज्यातील सर्व शाळांना २०१७ मध्ये प्रत्येकी तीन फुटबॉल देण्याचे राज्य शासनाच्या क्रीडा खात्याने ठरवले होते. परंतु अजूनही काही मोठे बॉक्स फुटबॉल जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या गोडाऊनमध्ये पडून आहेत. त्यामुळे शासनाचे प्रत्येक शाळांनी फुटबॉल खेळावे हे उद्दिष्ट कागदावरच राहिले आहे.

भारतात होणाऱ्या १७ वर्षांखालील जागतिक फुटबॉल स्पर्धेच्या निमित्ताने वातावरण तयार होण्यासाठी राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने एकाच दिवशी म्हणजे १० लाख विद्यार्थ्यांनी फुटबॉल खेळावे असे नियोजन १५ सप्टेंबर २०१७ मध्ये केले होते. यासाठी राज्य शासनाने प्रत्येक शाळांना तीन फुटबॉल देण्याचे जाहीर केले होते.

सोलापूर शहर जिल्ह्यातून १०१२ शाळांची ऑनलाइन नोंदणी झाली होती. त्यानुसार १५ सप्टेंबरला सकाळी तालुक्यात संबंधित गटशिक्षणाधिकारी शहरात महानगरपालिका प्रशासनअधिकारी यांच्याकडे हे फुटबॉल पोहचविण्यात आले असल्याचे तत्कालीन जिल्हा क्रीडाधिकारी युवराज नाईक यांचा दावा होता. सर्व शाळांना प्रत्येकी ३ प्रमाणे ३०३६ फुटबॉल वाटप झाल्याचा अहवालही त्याने वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला होता. परंतु फुटबॉलचे तीन ते चार मोठे बॉक्स जिल्हा क्रीडा कार्यालयात पडून होते. याबाबतचे वृत्त सप्टेंबर २०१७ मध्ये वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर याची चौकशी झाली होती. ती चौकशी कागदावरच राहिली आणि अजूनपर्यंत क्रीडा कार्यालयात हे फुटबॉल शिल्लक आहेत.





### यांची चौकशी कोण करणार?

युवराज नाईक यांच्यानंतरही नितीन तारळकर व नरेंद्र पवार हे दोन जिल्हा क्रीडा अधिकारी आले. परंतु त्यांचेही लक्ष क्रीडा कार्यालयाच्या गोडाऊनकडे गेले नाही. युवराज नाईक सध्या पुणे विभागाच्या क्रीडा उपसंचालक पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे आता यांची चौकशी कोण करणार हे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### खेळण्यायोग्य नसल्यामुळे वाटप नाही

याबाबत सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले राहिलेल्या फुटबॉलचे तेव्हाच वाटप होणे गरजेचे होते. आम्हांला लक्षात आल्यानंतर हे फुटबॉल आम्ही वाटप करण्याचा प्रयत्न केला. परंतु हवा भरल्यानंतर ते फुटबॉल फुटतात. ते खेळण्यायोग्य फुटबॉल नसल्यामुळे आम्ही या फुटबॉलचे वाटप केले नाही.





**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



### सन्मान पोलिस अधिक्षकांचा

सोलापूर : १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा उपक्रमाच्या अंतर्गत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयास प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र स्विकारले.



## ▶▶ महत्वाचे...

### अकरा वर्षाच्या बालकाला विजेचा धक्का

**सोलापूर, दि. ७ मे -**
पाणी भरण्यासाठी मोटार लावत असताना अकरा वर्षाच्या बालकाला विजेचा धक्का लागला. हा प्रकार मल्लिकार्जुन नगरात बुधवारी सकाळी ९.३० वाजता घडला. संपतकुमार विक्रांत हिप्परगी (वय ११, रा. मल्लिकार्जुन नगर) असे विजेचा धक्का बसलेल्या मुलाचे नाव आहे. मल्लिकार्जुन नगरात बुधवारी सकाळी पाणी सोडण्यात आले होते. तेंव्हा पाणी भ्रण्यासाठी म्हणून विदृयुत मोटार सुरू करण्याचा प्रयत्न करताना संपतकुमार यास विजेचा धक्का लागला. दुपारी दोन वाजता वडील विक्रांत यांनी त्यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मार्केट यार्डात हमाली कामगारास मारहाण

**सोलापूर, दि. ७ मे -**
येथील मार्केट यार्डात हमाली काम करणारा रमजान मैनोदिन शेख (वय ३५, रा. समाधान नगर) यास अज्ञात कारणातून पाच जणांनी लाकडाने व लाथाबुकयांनी मारहाण केली. ही मारहाण बुधवारी दुपारी एक वाजता झाली. रमजान हा मार्केट यार्डात हमालीचे काम करतो. नेहमीप्रमाणे तो बुधवारीही मार्केट यार्डात हमालीचे काम करत होता. त्यावेळी अज्ञात कारणातून त्याला अनोळखी चार ते पाच जणांनी लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. यात डोक्याला तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने दुपारी दोन वाजता तो स्वत : शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चालत्या ट्रॅक्टरमधून पडलेल्या सात वर्षाच्या मुलीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ७ मे -**
ट्रॅक्टरमध्ये बसून जाताना अचानक तोल जाऊन पडलेल्या सात वर्षाच्या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना २ मे रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास इंदापूर येथील शिंगाडे वस्तीजवळील जिल्हा परिषद शाळेजवळ घडली. पूजा लालू पवार (वय ७, रा. रा. इंदापूर) असे मृत मुलीचे नाव आहे. पूजा ही घटनेच्या म्हणजे २ मे रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास इंदापूर येथून राहत्या घराकडे ट्रॅक्टरमध्ये बसून जात होती. ट्रॅक्टर शिंगाडे वस्तीजवळील जिल्हा परिष्द शाळेजवळ आला असता, अचानक पूजा ही टॅक्टरमधून तोल जाऊन पडली. यात ती पोटाला मार लागल्याने इंदापूर येथील सरकारी रुग्णालयात तिच्यावर उपचार करून बुधवारी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले होते. परंतु उपवचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दूध समजून फिनेल पिल्याने तरुण अत्यवस्थ

**सोलापूर, दि. ७ मे -**
दूध समजून ग्लासामध्ये ठेवलेले फिनेल पिल्याने तरुण अत्यवस्थ झाला. हा प्रकार बुधवारी दुपारी १.३० च्या सुमारास मुळेंगाव तांडा येथे घडली. पंकज विलास चव्हाण (वय २२) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी पंकज हा घरात असताना, त्याने घरात ग्लासामध्ये ठेवलेले फिनेल दुध समजून प्राशन केले. यानंतर त्यास त्रास होऊ लागल्याने मित्र ओमप्रकाश याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### फिरण्याच्या कारणातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ७ मे -**
तु येथे का फिरतो अशी विचारणा करून तरुणाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार मंगळवारी रात्री ८.३० च्या सुमारास साईबाबा चौकात घडला.



गिरीष चंद्रकांत घाटोळे (वय २०, रा. मार्केट यार्ड, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री ८.३० च्या सुमारास गिरीष हा साईबाबा चौकात फिरत होता. त्यावेळी त्याला लखन दांगडे व बालाजी आणि इतर दोन यांनी तु येथे का फिरतो अशी विचारणा करत लाकूड तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात डोक्याला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १२.५० वाजता बबलू याने उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# पाकिस्तानवर हल्ला; सोलापुरात जल्लोष

## ✔ ऑपरेशन सिंदूर यशस्वी; गृहराज्य मंत्र्यांच्या उपस्थितीत पेढे वाटून आनंदोत्सव; भारत माता की जय, वंदे मातरम्‌च्या घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

**काश्मीरमधील पहलगाम येथे गेल्या १४ दिवसांपूर्वी झालेल्या आतंकवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा जीव गेला. या घटनेनंतर संपूर्ण देशात प्रतिशोधाची अग्नी वाढत गेली. याच पार्श्वभूमीवर पाकिस्ता मधील अतिरेक्यांच्या विविध ९ तळावर भारतीय वायुसेनेने राफेल युद्ध विमानाच्या सहाय्याने यशस्वी हल्ला केला. वायुसेनेच्या या यशस्वी कार्याबद्दल भारतीय सेनेचे तसेच पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन करण्यासाठी सोलापुरात विविध संस्था, संघटना आणि राजकीय पक्षाच्यावतीने ठिकठिकाणी पेढे वाटून जल्लोष अन् आनंदोत्सव साजरा करण्यात आला.**




सोलापूर : शिवस्मारक परिसरात शिवसेनच्या वतीने गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत शिवसैनिकांनी पेढे वाटून जल्लोष केला. यावेळी प्रा. शिवाजी सावंत, अमोलबापू शिंदे आदी. (छायाचित्र : केवल तिवारी)

### गृहराज्यमंत्र्यांना पेढा भरवून शिवसेनेकडून व्यक्त केला आनंद

भारतीय सैन्यांनी पाकिस्तान हद्दीतील अतिरेकी अड्डे उद्वस्त केल्याबद्दल शहर जिल्हा शिवसेनेकडून जल्लोष करण्यात आला. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना पेढा भरवून व फटाके वाजवून पाकिस्तान विरोधात घोषणा देण्यात आले. 'नरेंद्र मोदी आगे बढो, देश आपके साथ है' घोषणा देऊन संपूर्ण देशवासिय भारतीय सैन्याबरोबर असल्याचे सांगण्यात आले. यावेळी पहलगाम हल्यातील भगिनींच्यां कपाळाच्या कुंकवाचा बनला ऑपरेशन सिंदूर अशा आशयाचे फलक घेऊन जल्लोष करण्यात आला. यावेळी शिवस्मारक सभागृह येथे जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे व संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना पेढा भरवून जल्लोष केला. यावेळी माजी नगरसेवक मनोज शेजवाल, युवासेना कार्यकारीणी सदस्य सुजित खुर्द, तुकाराम मस्के, संजय सरवदे, प्रभाकर गायकवाड, महावीर डोके, विवेक भोसले, अनिता गवळी, अनिकेत सूळ, अनिकेत राठोड उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड

भारतीय लष्कराने पहेलगाम येथील निष्पाप भारतीयांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानवर हल्ला चढवला आणि आतंकवाद्यांना कठोर शिक्षा देण्याचं धाडस दाखविला त्याबद्दल सैन्याच अभिनंदन करुन दहशतवादी कारवाया करणाऱ्या विरुध्द योग्य प्रती उत्तर दिल्याबद्दल मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूरच्यावतीने विजापूर वेस येथे लाडू वाटप करण्यात आले. आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे माजी प्रदेशाध्यक्ष नेताजी गोरे, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष म. शफीक रचभरे, शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, राम गायकवाड, गोवर्धन गुंड, राजू हुंडेकरी, कादर भागानगरी, रिजवान दंडोती, सरफराज शेख, रिजवान शेख, हारिस शेख, रुस्तुम शेख, इरफान बागवान, कमर होटगी, जैद वागदरीकर, रियान वागदरीकर, आरिफ सिंदगी, रईस वागदरी आदी उपस्थित होते.



### शिवसेना उबाठा पक्ष

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मंगळवार पेठ पोलीस चौकी येथे एकच जल्लोष करण्यात आला. याप्रसंगी पाकिस्तानी लष्कर प्रमुख आसिफ मुनीर, पाकिस्तानी झेंडा व अतिरेक्यांचे फोटो रस्त्यावर टाकून त्यांना जोडे मारण्यात आले. त्यानंतर जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय ! हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, सूनले बेटा पाकिस्तान बाप है तेरा हिंदुस्तान, दूध मांगो खीर देंगे कश्मीर मांगो चीर देंगे, भारत माता की जय, वंदे मातरम, जय श्रीराम अशा घोषणांनी सारा परिसर दणाणून सोडला. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख महेश धाराशिवकर, जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाण, शहर समन्वयक संताजी भोळे, लहू गायकवाड, विजय पुकाळे, संदीप बेळमकर, सोमशंकर कंठीमठ, सुरज रेवणकर, दिगंबर पालनकर, अनिल बिराजदार, नागराज कंदकुर, ऋषिकेश धाराशिवकर, योगेश कंटिमट, राजेश हेबळे, राहुल वांगी, अमेय कळसकर, मनोज कामेगावकर, पिंटू कानेगावकर, धनंजय तपासे, संतोष पोतदार, गणेश गडकरी, अमोल मासाळ, निलेश हंचाटे, सुरज दीक्षित, कालू राय पस्थित होते.



ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्यानंतर कुंभारवेस असोसिएशनच्या वतीने एकमेकांना लाडू भरून आनंदोत्सव साजरा केला.

**OPERATION SINDOOR**

**अभिमानाने देशाच्या जर**
**लेखणी सळसळत नसतील**
**आपणा आता सारे लोक**
**जरूर षंढ म्हणतील**

**शब्दांमधूनी बोला आता**
**देशाभिमानाप्रति**
**पुन्हा पुन्हा का संधी येते**
**भाव अपूरे पडतील**

**फूटकळ स्वार्थासाठी कधी**
**आपण लाळ घोटे बनतो**
**उतरून कधी धर्मजातीवर**
**हमरातुमरी येतो**

**पक्षीय पादत्राणे घालून**
**कधी करकर देखील करतो**
**खरे सांगू तेव्हा आपण**
**कूप मंडूक भासतो**

**येऊन पहा डबक्या बाहेर**
**देश सागर आहे**
**भारत आपला पृथ्वीवरचा**
**बाहुबली आहे**

**सारे सैनिक समस्त जनता**
**कौतुकाची धनी**
**व्यक्त व्हाल दिलखुलास जर**
**सारे धन्य धन्य म्हणतील**

**- डॉ.प्रशांत यवतकर**

### देशांतर्गत कारवाई करा

देशाबाहेरून येणाऱ्या आतंकवाद्यांचा खात्मा जवानांनी केला आहे. मात्र भारत देशांतर्गत अनेक गद्दार अतिरेकी लपून बसलेले आहेत. अशा आतंकवाद्यांचा खात्मा देखील गरजेचा आहे. आतंकवाद्यांची मानसिक प्रवृत्ती मिटवली पाहिजे. सदरचा जल्लोष देशाच्या जवानांना भारतीय नागरिकांना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच जनतेला समर्पित आहे. जनतेच्या रेट्यामुळे सरकारने कारवाईचे हे कडक पाऊल उचलले आहे. भविष्यात देखील अशाच पद्धतीने आतंकवादी हल्ल्यांना प्रतिउत्तर देणे गरजेचे आहे.

**- महेश धाराशिवकर,**
शहरप्रमुख उद्धव ठाकरे शिवसेना

### कुंभार वेस व्यापारी असोसिएशन

कुंभारवेस असोसिएशन समस्त राष्ट्रप्रेमी सोलापूरकर यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी कुंभारवेस व्यापारी असोसिएशनच्या वतीने कुंभारवेस चौक येथे लाडू भरवून आनंदोत्सव व जल्लोष केला. यावेळी व्यापाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, पाकिस्तानच्या अशा भ्याड हल्ल्याच्या विरोधात कारवाई करणे गरजेचे होते. तेथील आतंकवादी तळ उध्वस्त करत भारताने त्यांना धडा शिकवला आहे. यापुढे जर अशा कारवाया पाकिस्तान करत असेल, तर त्यांच्या घरामध्ये घुसून भारतीय सैन्य प्रतिउत्तर देईल, असा इशारा व्यापारी असोसिएशन पाकिस्तानला दिला. यावेळी रविकांत तंबाके, मेघराज दर्गो पाटील, विवेक आडके, राहुल मैंदर्गी, उमाकांत धनश्री, पंडित भोदे, प्रदीप सुरवसे उपस्थित होते.

### आतंकवादी तळ उध्वस्त करत अतिरेक्यांचा खात्मा

भारतीय सैनिकांनी पाकिस्तान मधील आतंकवादी तळावर हल्ला करून कश्मीर पहलगाम येथे घडलेल्या घटनेचा बदला घेतला आहे. ज्या ज्या पर्यटकांचा जीव गेला. त्यामुळे या ऑपरेशनला सिंदूर नाव ठेवण्यात आले. या कारवाईमध्ये अतिरेकी व त्यांचे प्रशिक्षण केंद्र जमीनदोस्त झाले आहेत. अशा प्रवृत्तींना वेळीच ठेचणे गरजेचे आहे.

**- रविकांत तंबाके, व्यापारी कुंभारवेस.**

### इतर देशांनी भारताकडे वाकड्या नजरेने पाहू नये.

पाकिस्तान सोबत झालेल्या यापूर्वीच्या युद्धात देखील भारतीय सैन्याने लढाई जिंकलेली आहे. आता सुद्धा भारतीय जवानांनी आपले युद्ध कौशल्य दाखवत अतिरेक्यांचा खत्म केला आहे. जगातील चौथ्या क्रमांकाची भारतीय सेना आहे. त्यामुळे कोणत्याही देशाने भारताकडे वाकड्या नजरेने पाहू नये. अन्यथा त्याची गत पाकिस्तान प्रमाणे होईल.

**- प्रताप चव्हाण, जिल्हा उपप्रमुख उद्धव ठाकरे शिवसेना**

# ऑपरेशन सिंदूरचा पंढरपुरात पेढे वाटून आनंदोत्सव

## ✔ पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय लष्कराचे केले अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मे -**
भारतीय लष्कराच्या हवाईदलाने पहेलगाम हल्याचा दहशतवाद्याचे नऊ तळ उध्दवस्त करुन बदला घेतल्याने पंढरपूरात बुधवारी सकाळी नागरिकांनी एकच जल्लोष करुन आनंद व्यक्त केला. यावेळी नागरिकांनी पेढे वाटून पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय लष्कराचे अभिनंदन केले.



पाकिस्तानने पोसलेल्या अतिरेक्यांनी पंधरा दिवसाखाली काश्मीर मधील पहलेगाम मध्ये पर्यटनासाठी आलेल्या निष्पाप पर्यटकांवर अधाधुंद गोळीबार करुन भ्याड हल्ला केलेला होता. या हल्यात देशाच्या विविध भागातील २७ ते २८ पर्यटक ठार झालेले होते. हल्ला करताना अतिरेक्यांनी धर्म विचारुन निष्पांवर अंधाधुंद असा गोळीबार केलेला होता. यावेळी पर्यटक महिला आणि लहानमुलांना आम्ही मारलेले नाही जावा तुमच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींना आम्हीच मारले असल्याचे सांगा त्यांना हा इशारा आहे म्हणून सांगा म्हणत हल्ला करुन तेथून पळ काढलेला होता. त्या मुळे पाकिस्तानच्या अतिरेक्यांनी केलेल्या या भ्याड हल्ल्याचा निषेध भारतासह जगभरातून करण्यात आलेला होता.

दरम्यान या हल्यात जे पर्यटक वीरगतीला प्राप्त झालेले होते त्यांच्या कुटुंबियांसह समस्त भारतवासीयांनी पाकिस्तानला धडा शिकवावा अशी जोरदार मागणी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केलेली होती. त्या नंतर पंतप्रधान मोदींनी देखील भारतीय सैनिक लवकरच या हल्याचा बदला घेतील, अतिरेक्यांची बचीकुछी जमीन देखील आम्ही उध्दवस्त करुन दाखवु असा निर्वाणीचा इशारा देवून भारतीय लष्करांना या कारवाईसाठी सर्व अधिकार दिलेले होते.

दरम्यान या हल्याचा बदला बुधवारी पहाटे तीनच्या सुमार भारताच्या लष्कराने आँपरेशन सिंदूरच्या माध्यमातून घेतला. यावेळी अतिरेक्यांचे मोठ्या प्रमाणावर भारताच्या हवाई दलातील जवानांनी नुकसान करुन त्यांचे तळ उध्दवस्त केले. या हल्यात अनेक अतिरेकी मारले गेल्याचा दावा देखील भारतीयांकडून करण्यात आला.

भारताने केलेल्या हवाई हल्याचा आनंद बुधवारी सकाळी पंढरपूरात नागरिकांनी पेढे वाटून साजरा केला. पंढरपूरात सकाळी फिरावयास येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसह, तरुणांनी देखील येथील यमाई तलाव परिसरात जल्लोष केला. पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच भारतीय सैनिकांचे अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०९

**देखा नवल तया प्रभूचें । प्रेम अद्भूत भक्तांचे ।**
**जे सारथ्य पार्थांचे । करितु असे ।।**

दिव्यदृष्टी प्राप्त असलेल्या संजयाने राजा धृतराष्ट्राला दोन्ही बाजूंच्या महावीरांचे, सैन्याचे सविस्तर वर्णन करुन सांगीतले. हे सांगता-सांगता युध्द किती वाईट असते याचीही न कळत कल्पनादिली. संजयाने आपली दृष्टी अर्जुनाच्या रथाकडे फिरविली आहे. अर्जुनाच्या रथाचे वर्णन केल्याशिवाय त्याला राहावत नाही. अर्जुन हा राजाचा शत्रू आहे याची जाणीव असतांनाही रथाची वस्तुस्थिती सांगण्यावाचून संजयाला राहावले नाही. म्हणून संजय म्हणाला अर्जुनाचा रथ म्हणजे युध्दभूमिवरील विजयाचे मूर्तीमंत रुपच आहे. त्याच्या रथाची घोडे म्हणजे वेगवान गरुडच आहेत. रथावर अश्ववाहक म्हणून वैकुंठाधिपती राजा श्रीकृष्ण असल्याने त्या रथाचे वर्णन करावे तेवढे कमी आहे. या रथाच्या निशाण स्तभांवर प्रत्यक्ष भगवान शंकर मारुतीच्या रुपाने आहेत, असे संजय म्हणाला. संजय रथाचे गुणगान करताना भारावून गेला. त्याला



रथापेक्षा अर्जुनाचेच गुणगान करावे वाटू लागले. कारण अर्जुनासाठी साक्षात भगवान श्रीकृष्ण रथावर आरुढ झाले होते. अर्जुनाचे काय भाग्य थोर की वैकुंठाधिपती त्याचे सारथ्य करीत आहेत. प्रेमापुढे, नि:स्वार्थ भक्तीपुढे परमेश्वर भक्तांसाठी काय करील हे सांगणे कठीण आहे. अर्जुनाचे सारथ्य करण्यातही भगवंताला आनंद वाटावा यापेक्षा वेगळ्या प्रचितीची गरजच काय ? माऊलींनीही अर्जुनाचे तोंडभरुन कौतुक केले आहे. काय या प्रभुचे नवल म्हणावे की, आपल्या भक्ताच्या प्रेमापोटी तो प्रत्यक्षात सारथ्य करतो आहे. या अद्भूत प्रेमास कोणतीही उपमा कमीच पडणार आहे. सर्व शक्तीमान असलेला भगवंत प्रेमापुढे कसा अडकला जातो याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. भगवंताला असे अडकवायला लावणे हे म्हणावे तेवढे सोपे नसते, हे यावेळी लक्षात असावे. हे अवघडपण प्रयत्नाने घालवता येते.

केवळ प्रेमापोटी आपल्या सेवकाला पाठीसी घालून आपण स्वत: सारथ्य करण्यासाठी पुढा झाला आणि आपला पांचजन्य शंखही सजहपणाने वाजविला. अर्जुनाच्या प्रेमाचे माऊलींनी अत्युत्कृष्टपणे कौतुक केले आहे. मला तर माऊलींच्या कुशाग्र बुध्दीचे कुतुहल वाटते की, त्यांना एवढे गोड शब्द सुचलेच कसे असतील. श्रीकृष्णाचं अर्जुनावरचं प्रेम पाहिल्यास हे मान्यच करावं वाटतं की ईश्वर प्रेमाचा, भक्तीचा भुकेला आहे.

**थोर प्रेमाचा भुकेला । हाचि दुष्काळ तयाला ।।**
**भावेविण देव न कळे निसंदेह ।। भावबळे आकळे ए-हवी नाकळे ।।**

या प्रकारच्या सर्व संतोक्ती ईश्वराने अर्जुनाच्या प्रेमापोटी खऱ्या करुन दाखविल्या आहेत. अर्जुनही ईश्वराच्या प्रेमपरिक्षेत पास झाला आहे. आपण ईश्वराच्या नाही तर किमान माणसांच्या प्रेम परिक्षेत तरी पास होऊ, असा आपण या प्रसंगी बोध घेण्यास हरकत नसावी. प्रेमाने जग जिंकता येते हे खरे आहे. जग नाही तर नाही आपण किमान स्वत:ला, आपल्या कुटुंबातील सदस्यांना तरी जिंकू या. यामुळे आपल्या जीवनातील आनंद लहरी निश्चितच वाढतील असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# अकरावी प्रवेश ऑनलाईन होणार

## शिक्षणाधिकाऱ्यांचे प्राचार्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशाची व्याप्ती राज्यस्तरीय वाढविण्याच्या दृष्टीने अकरावी प्रवेश ऑनलाईन करण्याचा निर्णय माध्यमिक शिक्षण विभागाने घेतला आहे. तसे पत्र माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक शाळांच्या प्राचार्यांना काढले आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रवेश ऑनलाईन होणार आहेत.

सहायक शिक्षण उपसंचालकांनी कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक शाळेतील प्रवेश ऑनलाईन करावे, अशा सूचना माध्यमिक शिक्षणाधिकारी जगताप यांना दिले आहेत. त्यामुळे जगताप यांनी जिल्ह्यातील प्राचार्यांना ऑनलाईन प्रवेश सुरू करण्याच्या सूचना दिले आहेत. दरम्यान, माध्यमिक शिक्षण विभागाकडून जिल्ह्यातील कोणत्या उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेश सुरू आहे, कोणत्या नाही, याविषयी माहिती घेण्यात येत आहे. ज्या महाविद्यालयांनी यापूर्वीच ऑनलाईन प्रवेश सुरू केले आहेत, ती महाविद्यालये वगळून इतर महाविद्यालयात अकरावीचे प्रवेश ऑनलाईन करण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षण विभागाने दिली आहे.




### शिक्षण विभागाकडून तयारी

इयत्ता दहावीचा निकाल लवकरच लागणार आहे. त्यापूर्वी माध्यमिक शिक्षण विभागाकडून अकरावीचे प्रवेश ऑनलाईन करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालयांची मान्यता, तुकडी, विद्यार्थी प्रवेश क्षमता यासह विविध माहिती घेण्यात येत आहे.

### रिक्त जागेची माहिती तत्काळ कळणार

अकरावीचे प्रवेश ऑनलाईन घेताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी ऑनलाईन प्रक्रिया सोपे करण्यात येणार आहे. त्याविषयी जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांकडून माहिती घेण्यात येत आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविल्यामुळे कोणत्या महाविद्यालयात किती जागा भरल्या आहेत, किती रिक्त आहेत, याची माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे. कोणत्या शाखेची किती जागा भरले आहेत व किती रिक्त आहेत, याची तात्काळ माहीती मिळणार आहे.




## सिंहगड महाविद्यालयात कामगार दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज आणि एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा झाला.

प्रारंभी कॅम्पस डायरेक्टर तथा सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. त्यानंतर राष्ट्रगीत, राज्यगीतांचे सामूहिक गायन झाले. यावेळेस माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस एच पवार, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, सिंहगड पब्लिक स्कूलचे प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, प्रबंधक डॉ. डी आय नवले यांची उपस्थिती होती. यावेळेस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शंभर टक्के उपस्थिती लावणाऱ्या शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप म्हणून सपना शेलार आणि जुवेरिया शेख या दोन महिला शिक्षिकांचा चांदीची नेमप्लेट देऊन सन्मानित केले. त्यानंतर बस चालक, बस अटेडन्स, मावशी, मामा, वसतिगृह गार्डन, शिपाई, माळी, क्लर्क, सुपरवायझर आदींचा सत्कार केला. सूत्रसंचालन अमर नवले आणि स्मिता नवले यांनी केले.

## बागबान जमियत सिटी ट्रस्टतर्फे हाजी मुश्ताक चौधरी यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

सोलापूर शहर बागबान जमियत सिटी ट्रस्टतर्फे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतन संचालकपदी निवड झाल्याबद्दल हाजी मुश्ताक चौधरी यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी सोलापूर शहर बागबान जमियतचे अध्यक्ष डॉ. मन्सूर दलाल होते.

प्रारंभी डॉ. मन्सूर दलाल यांनी हाजी मुश्ताक चौधरी यांनी आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव केला व भविष्यात सुद्धा त्यांच्याकडून लोकहिताच्या कार्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमास नसीरअहमद खलिफा, ॲड. रफिक बागबान, राजा बागबान, मौलाबक्ष तुळजापुरे, म. इकबाल दलाल, अल्ताफ लिंबूवाले, इम्तियाज दलाल, फय्याज बागबान, मुश्ताक बागबान, रईस बागबान, म. सादीक बागबान, मुश्ताक खलीफा, नाजीम कामतीकर, दाऊद बागबान, इफ्तेखार तुळजापुरे, एजाज बागबान, हाफिज अ. रजाक, हाफिज अ. सलाम आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार उपाध्यक्ष अल्ताफ लिंबूवाले यांनी केले.

# युवा प्रशिक्षण अंतर्गत ४२३ प्रशिक्षणार्थींची नियुक्ती

## पाच महिन्यांची मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे :**

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्हा परिषदेतील ४२३ प्रशिक्षणार्थ्यांना पुन्हा पाच महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. त्या प्रशिक्षणार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाने नियुक्ती आदेश दिले आहेत.

मुख्यमंत्री कार्यकुशल योजनेंतर्गत जिल्हा परिषदेने ४२३ जणांना सहा महिने प्रशिक्षणावर घेतले होते. त्यांचा कालावधी संपल्यानंतर त्यांना आता पुन्हा पाच महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाने मुख्यमंत्री कार्यकुशल प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना पुन्हा संधी द्यायची की नाही, याविषयी सहायक आयुक्तांकडे मार्गदर्शन मागविले होते. त्यांच्या मार्गदर्शनानुसार युवा

प्रशिक्षणार्थ्यांना पुन्हा जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये हजर करुन घेतले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील युवकांना एकूण ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षण घेता येणार आहे. मात्र, यानंतर पुन्हा मुदतवाढ मिळणार नसल्याचे जीआरमध्ये नमूद आहे. मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत विविध शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना शासनाने मुदतवाढ दिली होती. तसा जीआर सर्व शासकीय कार्यालयास पाठविला होता. त्यामुळे कार्यरत असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना सेवेत ठेवणे अपेक्षित असताना जिल्हा परिषद तसेच जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीमधील युवा कार्यकुशल प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण थांबविले होते ते आता सुरु झाले आहे.



- ❋ झेडपी रिक्त जागा - ६९९
- ❋ भरलेली पदे - ४२३
- ❋ नियुक्ती आदेश - ४२३
- ❋ हजर जवळपास १००
- ❋ हजर होण्यास कालावधी सहा दिवसांचा

मुख्यमंत्री युवा कार्यकुशल प्रशिक्षणासाठी शासनाने पाच महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार सहा महिने प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना आणखी पाच महिने तसेच जे प्रशिक्षण घेत आहेत, त्यांना एकूण ११ महिने प्रशिक्षण पूर्ण करण्याची संधी दिली आहे. प्रशिक्षणार्थीना आता एकूण ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करता येणार आहे. त्या प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्ती आदेश दिले आहे.

**-स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासन**

## राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ

**सोलापूर :** महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ समग्र शिक्षा विभागाचे विशेष तज्ञ प्रभा चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, सारंग अंजीखाने, रियाज आत्तार, सचिन बर्मा, भगवान वाघमारे, ताहीर बिराजदार, भालचंद्र साखरे आदी उपस्थित होते.



### प्रबुद्ध भारत तरुण मंडळ

**सोलापूर :** प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे अध्यक्ष बाबा गायकवाड व आरोग्य निरीक्षक बसवराज जमादार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे, प्रा. अविनाश शिंदे, गौतम इंगळे, चंद्रकांत सोनवणे, विजय इंगळे, दिनकर खराटे, समर्थ मस्के, जयराज सांगे, सतीश अड्डाकुल,पी.के. कांबळे आदी उपस्थित होते.



### वंचित बहुजन आघाडी

**सोलापूर :** छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर-जिल्ह्याच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. नितीन ढेपे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, महासचिव अनिरुद्ध वाघमारे, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार , विनोद इंगळे, विक्रांत गायकवाड, अतिश बनसोडे, शंकर शिंदे, सुरेश देशमुख, दीपक माने, रवी सर्वगोड, मोहम्मद रफी मुलानी, रवी थोरात आणि पदाधिकारी उपस्थित होते.



### प्रशिक सामाजिक संस्था

**सोलापूर:** राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती दिनानिमित्त मिलिंद नगर मध्यवर्ती बुद्ध विहार येथे प्रशिक सामाजिक संस्थेच्या वतीने भगवान गौतम बुद्ध,राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुशील सरवदे, संस्थेचे प्रमुख सल्लागार शिवम सोनकांबळे,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे सचिव प्रबुद्धकुमार दोड्यानुर, उत्सव अध्यक्ष साक्षांत बनसोडे,नागेश रणखांबे,सचिन गायकवाड,सूरज निकंबे, विजय सोनवणे,गौतम गायकवाड,बलभीम शिंदे,शेषकुमार सरवदे,सुहास लोंढे,मयूर सरवदे,आपा गायकवाड, आशिष सरवदे, सागर वाघमोडे, शिवा निकंबे, स्वप्नील कसबे, करण बाबरे, प्रतीक इंगळे, आदित्य बाबरे,संकल्प सुरवसे, सोनु बाबरे, रोहित मस्के आदींची उपस्थिती होती.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ८ मे २०२५ | जागतिक रेडक्रॉस दिन, |
| विक्रम संवत् २०८१ | मोहिनी एकादशी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकादशी (१२.२८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ. फाल्गुनी (१८.१६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - हर्षण (२५.५५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२५.४०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** नोकरी-व्यवसायात सध्या चांगली गती असल्याने कोणताही प्रश्न रेंगाळत राहणे आजतरी परवडणार नाही. आपले प्रत्येक प्रश्न सध्या महत्त्वाचे आहेत.

**वृषभ :** घरातील एखादी व्यक्ती बाहेर जाऊन लवकर न आल्यामुळे जीवाला घोर लागणे शक्य. आपली नेमकी कोणा-कोणाची गाठ पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**मिथुन :** कितीही कमावले तरी थोडे सबुरीनेच खाणारे आपण आयुष्यही उपभोगण्यासाठी असते हे बऱ्याचदा विसरल्यासारखे असते.

**कर्क :** वैवाहिक जोडीदाराची आपणास मिळणारी साथ आज एखाद्या मोठ्या कामात यश देणारे ठरू शकते.

**सिंह :** आज नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी आपण अतिशय कार्यमग्र राहणार आहात नव्हे तसे राहणे फायद्याचे ठरणार आहे.

**कन्या :** आपणास आपल्या अभ्यासाचा, विचाराचा, चिंतनाचा आणि बौद्धिक कौशल्याचा उपयोग करून घेता येणार आहे.

**तूळ :** आजचा दिवस आपणासाठी आरोग्याकडे लक्ष द्यायला लावणारा ठरू शकतो. खाण्यापिण्यावर थोडेसे निर्बंध ठेवा. नोकरी-व्यवसायात आगामी काळाचा विचार करण्यासाठी बरेच पर्याय समोर असणार आहेत.

**वृश्चिक :** बऱ्याच महत्त्वाच्या निर्णयांमध्ये आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे. आर्थिकदृष्ट्या आज आपण कितीही मोठे-लहान अवश्य घेऊ शकता.

**धनू :** आज होणाऱ्या व्यवहारात उगाच कोणाचा खोटा आळ येणार नाही असे पाहा. विचारातला भडकपणा मुळातूनच टाळायचा आहे. आरोग्याकडे लक्ष द्यायचे आहे.

**मकर :** जे काही असेल ते अतिशय चांगले असणे हा आपला स्थायी भाव आहे.

**कुंभ :** नवीन मित्रांसमवेत चुकून काही खाल आणि नसते उद्योग पाठीशी लागतील. आज खाण्यापिण्याकडे बारीक लक्ष असणे हिताचे असणार आहे.

**मीन :** अपेक्षित आणि आवश्यक असे प्रवास काहीजणांच्या बाबतीत शक्य आहे. नोकरी-व्यवसायातील एखादा महत्त्वाचा निर्णय आरामात घेऊ शकाल.

# सोलापूर-पुणे हायवेवर महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मे -**

सोलापूर-पुणे महामार्गावरून बाळेकडे दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ४० हजार किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्रे दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी धुम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेले. ही घटना ६ मे रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास मडकी वस्तीजवळ घडली.

याबाबज रूपाली संतोष अहिरसंग (वय ४१, रा. डांगे नगर, बाळे, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रूपाली अहिरसंग शहरातून बाळे येथील घराकडे दुचाकीवरून जात होत्या. त्यावेळी सोलापूर-पुणे हायवेवरील मडकी वस्तीजवळील ट्रान्सपोर्टजवळ अहिरसंग यांची दुचाकी आली असता पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोघां चोरट्यांपैकी पाठीमागे बसलेल्या चोरट्याने अहिरसंग यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने हिसकावून घेतले. चोरट्याने अहिरसंग यांच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाचे ४० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक धायगुडे पुढील तपास करीत आहेत. दागिने हिसकावल्यानंतर दुचाकीवरील महिला व मुलगी दुचाकीचे बॅलेंन्सींग करता न आल्याने पडल्या. यावेळी पाठीमागून भरधाव कोणतेही वाहन आले नसल्याने पुढील अनर्थ टळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### वृध्दाच्या मृत्यूप्रकरणी वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल

भरधाव चारचाकी वाहन चालवून वृध्दाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी वाहनचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चेतन मधुकर नागराशी (वय ३५, रा. गणेश नगर, मडकी वस्ती, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मधुकर नागराशी (वय ७०) असे मरण पावलेल्यांचे नाव आहे. २ मे रोजी सायंकाळी मडकी वस्ती येथे मधुकर नागराशी हे पायी चालत पुणे ते सोलापूर हायवे रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी अज्ञात वाहन चालकाने वाहन भरधाव चालवून नागराशी यांना जोरदार धडक दिली. यामध्ये मधुकर नागराशी हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. त्यामुळे याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### बलकरची एसटी बसला धडक

भरधाव आलेल्या बल्करचालकाने रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एस टी बसला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याबाबत एस टी बस चालक सहदेव लक्ष्मण भायमारे (वय ४२, रा. सिंगद, ता. दिग्रस, जि. यवतमाळ) यांच्या फिर्यादीवरुन बल्कर चालक कैलास प्रसाद मेहता (वय ३६, रा. रत्नापूर, जि. हजारीबाद, झारखंड) याच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ मे रोजी दुपारी केगाव हायवेवर सहदेव भायमारे हे चालवित असलेल्या एस टी बस क्र. एमएच ०६ एस ८९१९ चे ज्वाईंट रॉड तुटून प्रेशर पाईप फुटल्याने गाडी बंद पडली. त्यामुळे भायमारे यांनी एस टी बस रस्त्याच्या कडेला लावून गाडीपासून ५० फुट अंतरावर दगड व झाडाच्या फांद्या लावल्या. तरीदेखील बल्कर क्र. एमएच १२ युएम ४०३९ चा चालक कैलास मेहता याने बल्कर निष्काळजीपणे चालवून एस टी बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये एस टी बसचे नुकसान झाल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### महिलेला मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

लोखंडी वस्तुने महिलेस मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंजली मिथून पवार (वय ३०, रा. प्रताप नगर तांडा, विजापूर रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन ऋतिक नागनाथ राठोड, सतीश राठोड, दिनेश राठोड, विनोद राठोड (रा. प्रताप नगर तांडा, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ मे रोजी अंजली पवार या घरी असताना ऋतिक राठोड हा घरासमोर आला व त्याने अंजली पवार यांना मुला तुझ्या मोठ्या दीराच्या मुलीसोबत फोनवर का बोलू देत नाही या कारणावरून लोखंडी वस्तुने मारहाण करून जखमी केले. तसेच अंजली पवार यांचे पती मिथून हे भांडण सोडविण्यासाठी आल्यानंतर त्यास सतीश, दिनेश, विनोद यांनी मिळून लाकडी बांबूने जबर मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पंढरपूरचे जिजामाता उद्यान लवकरच सुरु होणार

✔ तीन कोटी रुपये खर्चून केला कायापालट; पुढील आठवड्यात लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मे -**

महाराष्ट्राची दक्षिण काशी आणि राज्यातील सर्वात मोठे तिर्थक्षेत्र अशी ख्याती असलेल्या पंढरपूर शहरात तेवढेच देखणे आणि अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त असे जिजामाता उद्यान पुन्हा एकदा बालगोपाळ व नागरिकांच्या सेवेत सुरू होत आहे.



गेल्या तीन वर्षांपासून शहरातील जिजामाता आणि पद्मावती ही दोन्ही उद्याने बंद पडून त्यांची कमालीची दुरवस्था झाली होती. याबाबतीत पालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात होता. दरम्यान पालिका प्रशासनाने देखील याची दखल घेऊन शहरातील मध्यवर्ती असलेल्या जिजामाता उद्यानाचे वेगाने काम सुरू करुन ते पुर्णत्वास नेले आहे. पुढील आठवड्यात याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. सुमारे तीन कोटी रुपये खर्च करून सुशोभीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण उद्यानाचा कायापालट झालेला आता शहरवासियांना दिसून येणार आहे. लहान बालकांना खेळण्यासाठी विविध खेळणी, अत्याधुनिक सोयी सुविधा, ओपन जिम, रंगीबेरंगी भित्तीचित्रे, निसर्गचित्रे यांचा समावेश असणार आहे. जिजामाता उद्यानात नवीन पाण्याची टाकी बसविण्याचे काम आता पूर्णत्वास आले आहे. शहरातली मध्यवर्ती भागात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ही बाग १९७० साली जिजामाता उद्यान नावाने तयार करण्यात आली. त्यापूर्वी बुरुडाची बाग म्हणुन ही बाग प्रसिद्ध होती. नयनमनोहर कारंजे, चार हिरवळ असलेले प्रशस्त चौकोनी मैदान, वेलींच्या कमानी, घसरगुंडी, सी सॉ, झोके, रॉकेट, विमान अशी खेळणी होती. या बागेत गर्भवती स्त्रियांचे डोहाळ जेवण, मुलांचे जावळ, वाढदिवस, क्वचित प्रसंगी एखाद्या प्रतिष्ठित व्यापारी, पुढारी अशा घरातील मुलांचे लग्न असे कार्यक्रम होत असत. आता तोच वैभवाचा काळ येणार असुन भाविकांसाठी एक विरंगुळा, विश्रांतीचे ठिकाण ते असणार आहे. जिजामाता उद्यानात १९७० च्या दशकात विविध रंगाचे ससे, हरीण, बदक, मोर, कासव असे प्राणी होते. मात्र कालांतराने हे प्राणी सांभाळणे प्रशासनास कठीण होऊ लागल्याने पुढील काळात ते येथुन हलविण्यात आले. सध्या मुलांच्या उन्हाळी सुट्टया सुरू असून शेवटच्या पंधरा दिवसात तरी मुलांना बागेत खेळण्याचा, खेळणी हातळण्याचा आनंद मिळणार आहे.

> “ जिजामाता उद्यान पुन्हा नवीन स्वरुपात येत आहे याचा आनंद आहे. पण हे सौदर्य कायम टिकविण्याचे आव्हान न. पा. प्रशासनासमोर असणार आहे. उद्यानात प्रवेश करण्यासाठी ठराविक तिकीट असावे. म्हणजे टवाळखोर, गुंड प्रवृत्तीची मुले येणार नाहीत. बागेतील खेळणी, झाडे, फुले जपणे आवश्यक आहे. रात्री अपरात्री कोणी आत शिरणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.
> **- हेमा जाधव,** जागरूक महिला, पंढरपूर.

# महत्वाचे...

## राजशेखर कापसे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार

**अक्कलकोट, दि. ७ मे-**

लायन्स क्लबचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजशेखर कापसे यांना श्री समर्थ राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोनार हक्क परिषद व स्वराज्य पोलिस मित्र,पत्रकार संरक्षण व माहिती अधिकार संघटना, शिवसेना (शिंदे गट) अक्कलकोट यांच्या तर्फे मान्यवरांच्या हस्ते सर्जेराव सभागृह अक्कलकोट येथे देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे संयोजक सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार चंद्रकांत वेदपाठक हे आहेत. अक्कलकोट सारख्या ग्रामीण भागातून राजशेखर कापसे यांनी लायन्स क्लबच्या माध्यमातून तालुका, जिल्हास्तरीय व राज्यपातळीवर अनेक पदावर कार्यरत राहून सामाजिक कार्याचा ठसा उमटविला आहे. सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पुणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती या जिल्ह्याचे प्रमुख पद डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्याबद्दल त्यांना आंतरराष्ट्रीय अध्यक्षांनी सन्मानित केले आहे. कापसे यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल मल्लिनाथ साखरे, महेश हिंडोळे, राजशेखर हिप्परगी, झोन चेअरमन मल्लिकार्जुन मसुती, क्लब अध्यक्ष शिवानंद नंदर्गी, डॉ प्रदीप घिवारे, सूर्यकांत कडबगांवकर, गौरीशंकर चनशेट्टी, श्रीकांत झिपरे,राजू एकबोटे, सुनील गोरे, महेश शावरी, डॉ बसवराज नंदीकोले, शिवानंद फुलारी, अहमदपाशा पिरजादे आदींनी कापसे अभिनंदन केले आहे.





## ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या राज्य सल्लागारपदी राजेश माळी

**टेंभुर्णी, दि. ७ मे-**

सोलापूर जिल्ह्या युनियनचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण गळगुंडे यांचे विश्वासू समर्थक व माढा तालुका पंचायत समिती कुर्डूवाडी येथील कार्यक्षम, संयमी व संघटनात्मक चळवळीतील तरुण नेतृत्व राजेश माळी यांची निवड महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या राज्य सल्लागार या कॅबिनेट पदावर झाल्याचे पत्र त्यांना राज्य युनियनच्या वतीने देण्यात आले. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन उछए १३६ ची त्रेमासिक सभा हॉटेल शौर्य लॉन्स जालना येथे राज्याध्यक्ष संजीवजी निकम यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी राज्य युनियनचे सरचिटणीस सुचित घरत व सर्व राज्य कार्यकारिणी पदाधिकारी जिल्हा अध्यक्ष सरचिटणीस विभागीय पदाधिकारी उपास्थित होते. जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्यअध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांच्याशी तसेच सर्व राज्य युनियन पदाधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष सरचिटणीस यांचे संमतीने ही निवड जाहीर करण्यात आली. निवडीसाठी सोलापूर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे मार्गदर्शक सुशेन ननवरे, पतसंस्था चेअरमन अशोक म्हेत्रे, व्हा.चेअरमन विलास माने यांचे सहकार्य लाभले.

## प्रचंडे प्रशालेची धानम्मा पुजारी बारावी परीक्षेत जिल्ह्यात प्रथम

**अक्कलकोट, दि. ७ मे-**

नागणसूर येथील एच.जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचा बारावीच्या परीक्षेचा निकाल ६०.५५ टक्के लागला असून धानम्मा पुजारी हिने कन्नड माध्यमामध्ये ८४.६७ टक्के गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. श्रीदेवी पुजारी हिने ७७.६७ टक्के गुण मिळवून प्रशालेत द्वितीय क्रमांक तर, कुमारी लक्ष्मी कानेकर हिने ७६.५९ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविले आहे. बारावी परीक्षेसाठी ७६ विद्यार्थी प्रविष्ट होते, त्यात चार विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळविले आहे. आठ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले असून १४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर, वीस विद्यार्थी पास क्लास मध्ये उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे ईरण्णा धानशेट्टी, अनिल इंगळे, शरणप्पा मणूरे, प्रशांत नागूरे, चिदानंद मठपती, बसवराज कोळी, सूर्यकांत कडबगावकर यांचे संस्थेचे अध्यक्ष, सर्व संचालक, प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे सरपंच सुनीता चव्हाण, उपसरपंच शांताबाई प्रचंडे, तंटामुक्त समिती अध्यक्ष प्रसाद प्रचंडे आदींनी सत्कार केला.





## माढा येथे कृषी सहाय्यकांचे विविध मागण्यासाठी आंदोलन

**माढा, दि. ७ मे-**

राज्यातील कृषी सहाय्यकांच्या मागण्यासाठी राज्यस्तरीय आंदोलनांतर्गत माढा येथील तालुका कृषी कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून कृषी सहायकांच्या मागण्या मान्य व्हाव्या या हेतूने आंदोलन करण्यात आले होते. यापूर्वीही कृषी सहाय्यक संघटनेने आंदोलन पुकारले परंतु या आंदोलनात मार्ग काढून १० फेब्रुवारी रोजी त्यांच्या मागण्या संदर्भात बैठक घेऊन पंधरा दिवसांमध्ये मागण्या सोडवण्यासंदर्भात कृषी खात्याकडून आश्वासन दिले होते. त्या आश्वासनावर कोणताही कारवाई झाली नसल्याने कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना नियमित कृषी सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करणे, कृषी विभागातील संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरूपात असल्याने कृषी सहाय्यकांना लॅपटॉप देण्यात यावे, कृषी सहाय्यकांना ग्रामस्थरावर कामकाजासाठी कृषी मदतनीस द्यावा तसेच निविष्ठा वाटपा संदर्भात कृषी सहाय्यकांना वाहतूक भाड्याची तरतूद करावी यासह इतर मागण्यांसाठी माढा कृषी कार्यालय येथे धरणे आंदोलन करण्यात येत असल्यासंदर्भात निवेदनात म्हटले आहे. आंदोलनात विशाल गावडे, मंगेश वाळके, दीपक शिंदे, सचिव अनिल केदार सहभागी झाले होते.

# अट्टल चोरटा पोलिसाच्या ताब्यात

✔ २४ तासांत प्रकरणाचा छडा; ४४ हजारांचा शेतीमाल हस्तगत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ मे-**

बार्शी मार्केट यार्ड येथून चोरीस गेलेल्या शेतमालाचा बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अवघ्या २४ तासांत छडा लावून ४४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी अट्टल गुन्हेगार अविनाश ज्ञानदेव आदाटे (वय २३, रा. बार्शी) याला अटक करण्यात आली आहे.



या प्रकरणी निलेश सुभाष साखरे (वय ३४, रा. सुभाष नगर, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. फिर्यादी यांचे मार्केट यार्डमधील प्लॉट क्रमांक १३० येथे ‘सुभाष उत्तेश्वर साखरे जनरल मर्चंट ॲण्ड कमिशन एजंट’ नावाने आडत व्यवसाय चालू आहे. त्यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला माल दुकानासमोर ठेवला असता, १९ एप्रिल ते ५ मे दरम्यान अज्ञात चोरट्याने एकूण १४ पोती ज्वारी, ७ पोती सोयाबीन, ४ पोती पांढरी तुर व १ पोते हरभरा असा एकूण ४४ हजार ८०० रुपयांचा शेतमाल चोरून नेला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस नाईक श्रीमंत खराडे यांना मिळालेल्या माहितीवरून संशयित आरोपी अविनाश आदाटे यास ताब्यात घेण्यात आले.

त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण शेतमाल जप्त केला आहे. या आरोपीवर यापूर्वीही बार्शी शहर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल असून तो रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. पुढील तपास पो.हे.कॉ. श्रीमंत खराडे करीत आहेत.

# ‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ ने टाकला नातेसंबंधावर प्रकाश

### बार्शीच्या भगवंत महोत्सवात नाट्यप्रयोगाने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ मे-**

येथील बार्शी नगरपरिषद तसेच श्री भगवंत बहुउद्देशीय संस्था व श्री भगवंत देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री भगवंत महोत्सव २०२५ मध्ये अभिनेते प्रशांत दामले व कविता मेढेकर यांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ हा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. याद्वारे नात्यातील चढ-उतार, अपेक्षा आणि इच्छा यावर भाष्य करत प्रेक्षकांना हसवले व विचार करण्यास प्रवृत्त केले.



प्रारंभी माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह महोत्सवासाठी देणगी देणाऱ्यांच्या हस्ते भगवंताची आरती करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, रमेश पाटील, उद्योजक दिलीप गांधी, डॉ अमित पडवळ, डॉ गुलाबराव पाटील, डॉ रोहन पाटील, जवाहर माढेकर, सुनील भराडीया, डॉ. गणेश सातपुते, राजाभाऊ सुरवसे, रवींद्र राऊत, युवराज कादे, डॉ. विक्रांत शहा आदी उपस्थित होते. कधी हसवत तर कधी आत्मचिंतन करायला लावत नाटकाच्या माध्यमातून अभिनेते प्रशांत दामले यांनी पती मुन्नाचे पात्र व अभिनेत्री कविता मेढेकर यांचे पत्नी मुन्नीचे पात्र अतिशय सुंदर अशा अभिनयाने सादर केले. आपले खरे प्रेम व संबंध टिकवण्यासाठी पती-पत्नींना आपल्या संबंधाची व प्रेमाची जाणीव होणे गरजेचे असल्याचे नाट्यप्रयोगाने दाखवले.

महोत्सवासाठी अध्यक्ष सुभाष लोढा यांच्यासह सचिन मडके, प्रशांत खराडे, श्रीकांत शिंदे, समर्थ तुपे, रणजित देशमुख व महोत्सव समिती सदस्य परिश्रम घेत आहेत.

# अनंत चैतन्य प्रशालेत माजी विद्यार्थी मेळावा

### विद्यार्थ्यांकडून प्रशालेला संगणक संच भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि ७ मे**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्यासाठी २००३ मध्ये दहावीत शिकणारे माजी विद्यार्थी तब्बल २२ वर्षांनी एकत्रित आले होते. मेळाव्यासाठी विविध शहरातून व भागातून वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेले २२ मुले व १५ मुली असे ३७ माजी विद्यार्थी उपस्थित होते.



सर्वप्रथम या माजी विद्यार्थ्यांनी संस्थेचे अध्यक्ष व आ. सचिन कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी मुख्याध्यापक सिद्धेश्वर कल्याणशेट्टी व सर्व गुरुजनांचे, औक्षण करुन गुलाबपुष्पांची उधळण करत स्वागत केले. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व विद्यादेवी सरस्वती मातेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. यानंतर प्रशालेचे दिवंगत माजी विद्यार्थी व शिक्षक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थितांचे स्वागत माजी विद्यार्थी नितीन शेवाळकर यांनी केले.

यानंतर संस्थेचे अध्यक्ष व आ. सचिन कल्याणशेट्टी, सरपंच सोनाली तळवार, संस्थेचे संचालक शिवप्पा भरमशेट्टी, माजी मुख्याध्यापक सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, सर्व आजी माजी शिक्षक-शिक्षिका, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेची माजी विद्यार्थिनी भारती भरमशेट्टी, तायव्वा स्वामी व विद्यार्थी नितीन निक्ते यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर माजी शिक्षक बसवराज बंडगर, बापूजी निंबाळकर यांनी स्नेहमेळाव्याच्या आयोजनाविषयी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी या माजी विद्यार्थ्यांकडून प्रशालेला संगणक संच भेट स्वरुपात देण्यात आले. याविषयी माजी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी आभार मानले. प्रास्ताविक प्रशालेचे माजी विद्यार्थी व कार्यरत प्रा. काशीनाथ पाटील यांनी तर सूत्रसंचालन सिद्धाराम हेगडे यांनी तर आभार नितीन निक्ते यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न होण्यासाठी सिद्धाराम हेगडे, नितीन निक्ते, काशीनाथ पाटील, सिद्धारुढ कोरे, मडोळप्पा कल्याणशेट्टी, नितीन शेवाळकर, अमोगसिद्ध व्हनमाने, संतोष घोडके, संजय पारतनाळे, कविता पारतनाळे,मुक्ताबाई होनाजे यांनी परिश्रम घेतले.



# अक्कलकोट देवस्थान समितीची सेवा उल्लेखनीय

### गृहराज्यमंत्री योगेश कदम : मंदिर समितीतर्फे झाला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ मे-**

श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेले येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे स्वामींचे वास्तव्य असलेले जागृत स्थान आहे. स्वामी समर्थांच्या भक्तीतून भाविकांना स्वामींच्या आशीर्वादाची प्रचिती येते. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीची सेवा उल्लेखनीय बाब असल्याचे मत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी व्यक्त केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास कदम यांनी भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी गृहराज्यमंत्री कदम यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, शिवसेना जिल्हा प्रमुख मनिष काळजे, तालुका प्रमुख शिवसेना शिंदे गट संजय देशमुख, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, विपुल जाधव आदींसह भाविक उपस्थित होते.

# जग तज्ज्ञ आहे पण कटेवरचा देव सर्वज्ञ आहे

✔ निवृत्ती महाराज देशमुख;
✔ बार्शीत भगवंत महोत्सवात कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ मे-**

संत हे वारकरी संप्रदायाचा प्राण आहेत. कलियुगात माणूस संत विचारा शिवाय सुखी होऊ शकत नाही. अभ्यासा पेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे. अभ्यास केला तर ज्ञान मिळणार आणि या ज्ञाना पेक्षा ध्यान श्रेष्ठ आहे असे निरूपण ह. भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले.

बार्शी नगरपरिषद,श्री भगवंत बहुउद्देशीय संस्था व श्री भगवंत देवस्थान बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘श्री भगवंत महोत्सव २०२५ तिसऱ्या दिवशी भगवंत मैदानावर आयोजित किर्तना मध्ये ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या सह महोत्सव समितीचे पदाधिकारी आणि देणगीदार उपस्थित होते. इंदुरीकर यांनी कीर्तनाच्या प्रारंभी तुफान फटकेबाजी करत उपस्थिताना पोट धरून हसवले, चिमटे काढले अन तरूणाई चे प्रबोधन ही केले. कीर्तनासाठी त्यांनी

**साधु बोध झाला तो निरोनिया ठेला ।**
**ठायींच मुराला अनुभव ।।1।।**
**कापुराची वाती उजळली ज्योति ।**
**ठायीच समाप्ती झाली जैशी ।।२।।**



हा अभंग घेतला होता. महाराज म्हणाले, सध्या शाळा नाही पण पदव्या जास्त आहेत.येड्या भाभळी पेक्षा इंग्रजी शाळा जास्त झाल्या आहेत. जग तज्ञ आहे पण कटेवरचा देव सर्वज्ञ आहे. बार्शी चा भगवंत हा ही सर्वज्ञ आहे. बार्शी अनेक आहेत पण भगवंताची बार्शी एकमेव आहे . आपले कर्म हाच देव आहे. भजन करा, नीतीने जगा, चांगले वागा, आई, गाय आणि काळ्या आईची सेवा करा असा सल्ला दिला. पापाचा पैसा घरात आला की संतती खराब झाली म्हणून समजा. कष्टाचा पैसा आहे तिथे दुर्बुद्धी येत नाही.संपत्ती अली तर दया येत नाही. दया आल्यावर संपत्ती येत नाही. दोन्ही आल्यावर देव झाल्या शिवाय राहत नाही असेही ते म्हणाले. सृष्टी चक्र हे भगवंताचे ताब्यात आहे.अज्ञान हे दुःखाचे कारण आहे. नामामृत पिऊन जीवन सफल करा.अंगातील ताकत अन खिशातला पैसा संपला की तुम्ही संपला म्हणून हे जपून वापरा.

सध्या संकटे माणसावर नाही तर धर्मावर आहेत. तरुणांनो पक्ष व नेता नंतर आधी गाव महत्वाचा.धर्मासाठी आपली मनगटे एक पाहिजे.धर्म आणि विकास यासाठी तडजोड करा.दुष्मनी करू नका.कर्माला माफी नाही.जास्त कमवून मागची पिढी आळशी करू नका.मी तू तुझं माझं करू नका. स्वताच्या पायावर उभे रहा मग जगण्यात मजा आहे.४० टक्के तरुण पिढी मोबाईल मुळे वाया गेली.१० टक्के शेअर बाजारामुळे बरबाद होत आहे. शाळेच्या परिसरात शिक्षक अन विद्यार्थी यांना मोबाईल बंदी पाहिजे. कायद्याचे ज्ञान मुलांना द्या. समाधानी असल्यावर देव देतो. आजकाल बापावर नाही तर मुलावर कर्ज आहे. ९३ टक्के तरुण दारू पितात. दारू न पिणे हा कमीपणा मानला जातो.

दारुडे ही नालायक औलाद आहे. समाजात मुली नाहीत असे नाही तर मुलगी देण्याच्या लायक पोरं नाहीत असे कडवट विचार मांडले .मुलांना कोर्स निवडताना कल, छंद आणि मेरिट याचा विचार करा त्याच्यावर बळजबरी करू नका. मुलांनो मोर्चे, आंदोलने यात वेळ वाया घालवू नका, आपले करियर करा. व्यसने करू नका असे मौलिक सल्ले त्यांनी दिले.

किर्तनासाठी महिला, पुरुष, तरुण वर्ग, ज्येष्ठ असे सर्वच वयोगटातील नागरिकांनी मैदान खचाखच भरले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महाराजांचा सत्कार करण्यासाठी हार घेतला. मात्र देशमुख महाराजांनी तो घालून न घेता तोच हार पालकमंत्री यांच्या गळ्यात घातला.

आपला
# जिल्हा
**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पाकिस्तानवरील हल्ल्याबद्दल बार्शीत युवकांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.७ मे-**

२२ एप्रिल रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप भारतीयांवर हल्ला केला होता. त्याची चीड भारतातील नागरिकांमध्ये होती. वेळोवेळी पाकिस्तानने कुरापती करूनही भारत सरकार त्यांना सम जून घेण्याचा प्रयत्न करत होता परंतु यावेळेस नरेंद्र मोदीच्या नेतृत्वात



पाकिस्तानला चोख प्रतिउत्तर देऊन करारा जवाब दिला आहे. याचा बार्शीतील युवकांनी जल्लोष केला. भारत माता की जय, वंदे मातरम भारतीय सैनिक दलाचा विजय असो, जय जवान जय किसान, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा विविध घोषणा यावेळी देण्यात आल्या. पाकिस्तानाचा निषेध करून जिसको चाहे पाकिस्तान उसको भेजो कब्रस्तान अशा घोषणा दिल्या. यावेळी ॲड. गणेश हांडे, शुभम चव्हाण, विजय चव्हाण यांनी भारताने केलेल्या हल्ल्याच्या समर्थनार्थ भावना व्यक्त केल्या. यावेळी बार्शीतील विविध भागातील युवक एकत्र आले होते.



### महत्वाचे...



### श्रीस्वामी समर्थ पतसंस्थेचा ३२ वा वर्धापन उत्साहात

**मोडनिंब, दि.७ मे-**

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री स्वामी समर्थ पतसंस्थेचा ३२ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा झाला. श्रद्धा, समर्पण आणि सामाजिक एकतेचा एक महत्त्वपूर्ण टप्पा. गेली तीन दशके ही संस्था अध्यात्म, समाजसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जतनासाठी अखंडपणे कार्यरत असल्याचे चेअरमन रमेश बेंबळकर, व्हाइस चेअरमन रामनाथ झिंगे यांनी सांगितले. त्यांनी गेल्या ३२ वर्षांतील कार्याचा आढावा घेत पुढील उपक्रमांची माहिती दिली. वर्धापन दिनानिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरातील शेकडो भक्तांनी सहभाग घेतला. याप्रसंगी मोडनिंब आउट पोस्टचे हेड कॉन्स्टेबल आतार, प्रकाश गिड्डे, राजकुमार पाटील, जयवंत ओहोळ,बापू दगडे, विजय शिंदे, व्यवस्थापक प्रसाद दफ्तरदार, अमरनाथ गुरव, यासह सर्व खातेदार, सर्व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

### चोपडीतील युवकाचा सर्पदंशाने मृत्यू

**सांगोला, दि.७ मे-**

आजी व आजोबांकडे राहणारा चोपडीतील अक्षय पांडुरंग खांबे (वय-२७) याचे मन्यार या विषारी जातीच्या सर्पदंशाने बुधवारी निधन झाले. याबाबत अधिक माहिती अशी, उकाडा जास्त असल्याने अंगणात झोपलेल्या अक्षय यास पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास मन्यार जातीच्या विषारी सापाने दंश केला. काही वेळातच त्यास उलटीचा त्रास होऊ लागल्याने तात्काळ आटपाडी येथील खाजगी दवाखान्यात नेले असता उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचे निधन झाले.




याबाबत आटपाडी पोलीस स्टेशनमध्ये घटनेची नोंद झाली आहे. हा युवक सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथील होता. तो चोपडी (ता. सांगोला) येथील गणेश नगर मधील त्याचे आजोबा सदाशिव जगन्नाथ बाबर यांच्याकडे राहत होता. बुधवारी दुपारी दोन वाजता चोपडी येथील स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



### विविध मागण्यांसाठी कृषी सहाय्यकांचे धरणे आंदोलन

**सांगोला,दि.७ मे-**

महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी दि.५ मे पासून टप्प्याटप्प्याने आंदोलन सुरू असून दि.७ मे रोजी सर्व तालुका कृषि अधिकारी कार्यालयासमोर कृषि सहाय्यक यांचे धरणे आंदोलन झाले. दि.७ मे रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सांगोला येथे कृषी सहाय्यक संघटनेमार्फत आंदोलनाचा तिसऱ्या टप्प्यामध्ये धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले. यावेळी कृषी सहाय्यक संघटना सांगोला तालुका अध्यक्ष बालाजी जाधव, रियाज आतार, बाळासाहेब सावंत यांनी सर्व कृषी सहाय्यकांना संबोधित केले. सदर आंदोलनात तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सांगोला येथील सर्व कृषी सहाय्यकानी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.



### सांगोला पोलिसांची ३८ जणांवर कारवाई; २८ हजारांचा दंड वसूल

**सांगोला, दि.७ मे-**

सांगोला पोलिसांकडून घेरडी दुरक्षेत्र हद्दीत दंडात्मक कारवाईत ३८ केसेस करत २८ हजार दंड करण्यात आला असल्याची माहिती सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती अशी दि.५ मे रोजी संध्याकाळी सहा ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास पोलीस निरीक्षक घुगे यांनी घेरडी दुरक्षेत्र हद्दीतील जवळा (ता.सांगोला) येथे चार पोलीस अधिकारी, १७ पोलीस अंमलदार व दोन वाहतुक अंमलदार यांच्यासह अचानक नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान ट्रिपल सीट, विना नंबर प्लेट, रस्त्यावरील लावलेली वाहने यावर दंडात्मक कारवाई केली. दरम्यान ३८ केसेस केल्या असून २८ हजार रुपये दंड करण्यात आला आहे. तसेच जवळा ते सांगोला, जवळा ते घेरडी, जवळा ते सोनंद या मुख्य रस्त्यावरील हॉकर्स, अतिक्रमण केलेले इसमांना अतिक्रमण काढून घेण्याची समज दिली.

## भगवंत विकास आराखडा लवकरच मंजूर : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ मे-**

बार्शीचा २८६ कोटींचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा उच्चस्तरीय समितीकडून मंजूर करुन घेऊ, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बार्शी येथे दिली.

पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते बार्शी नगरपरिषदेच्यावतीने दहा कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात येणाऱ्या भक्त निवासाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर भगवंत महोत्सवात पालकमंत्री यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत, भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण,



माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, रमेश पाटील, डॉ. बी. वाय. यादव, भाजपचे शहराध्यक्ष महावीर कदम, तालुकाध्यक्ष मदन दराडे, विलास रेणके, बाजार समिती प्रशासक विजय राऊत, रणवीर राऊत, विवेक देशमुख उपस्थित होते.

पालकमंत्री पुढे म्हणाले, भक्त निवसामुळे भक्तांच्या निवासाची सोय होणार आहे. राजाभाऊ नी शेताला पाणी देण्याचे काम केले. त्यांनी जनतेचा दुष्काळ घालविण्याचे काम हातात घेतले आहे. उजनी पाण्याची योजना सुरू आहे. जिथे मला धक्के खात पालखीचे दर्शन घ्यावे लागत होते तिथे आज मला पांडुरंग आणि भगवंत सेवा करण्याची संधी मिळाली आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखडा तातडीने मंजूर होईल. सरकार आणि देवाभाऊ राजाभाऊ च्या पाठीशी आहेत. राजाभाऊ हा माझा भाऊ आहे. काही कमी पडणार नाही. राजाभाऊ च्या पाठीशी आपण खंबीरपणे खंबीरपणे उभे रहा, असे आवाहन केले. यावेळी राजाभाऊ राऊत म्हणाले, भगवंताचे आशीर्वाद कुठे काही थांबणार नाही. अर्धवट कामे थांबणार नाहीत. बार्शी एक महिना ही मागे जाऊ देणार नाही. मित्रमंडळ मंत्रिमंडळात आहेत. फडणवीस यांचे विशेष लक्ष आहे. जयाभाऊ विशेष लक्ष देतील. भगवंत तीर्थक्षेत्र २८६ कोटींचा आराखडा उच्च स्तरीय कमिटी पुढे आहे. जिल्हावासीयांच्या अपेक्षा आपण विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

## शनिवारपासून मोडनिंब येथील श्री वेताळ देवस्थान यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ७ मे-**

मोडनिंब (ता.माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळ देवस्थान यात्रेस शनिवार (दि. १०) मे पासून प्रारंभ होत आहे. श्री वेताळ देवस्थान यात्रेनिमित्त वेताळ देवस्थान कडून सलग सहा दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी सरपंच तथा श्री वेताळ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष कुरण गिड्डे यांनी दिली.

प्रारंभी शनिवारी (दि.१०) ह.भ.प. सागर महाराज बोराटे यांच्या कीर्तनाने यात्रेतील कार्यक्रमांना सुरुवात होईल. रविवारी (दि. ११) रोजी रोजी सकाळी नृसिंह जयंतीनिमित्त महाभिषेक होऊन दुपारी चार वाजता वेताळ देवस्थानाकडे तोरण्या नेल्या जातील. संध्याकाळी सात वाजता देव आणण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर ह.भ.प. शिवलीला पाटील यांचा कीर्तन सोहळा संपन्न होईल. सोमवारी (दि. १२) रोजी पहाटे चार वाजता श्रींचा महाभिषेक सोहळा, संध्याकाळी श्रींचा छबिना व भाकणूक, सोंगाच्या गाड्या (पौराणिक) व त्यानंतर शोभेचे दारुकाम होईल. मंगळवारी (दि. १३) सकाळी श्रींच्या पालखीची



भव्य मिरवणूक, भेदी गाणी व कलगीतुरा, संध्याकाळी सोंगाच्या गाड्या, शोभेचे दारुकाम व त्यानंतर वैभव म्युझिकल नाईट, कोल्हापूर यांचा माहेराला ये ग माझ्या बहिणी या नाटकाचा प्रयोग होईल. बुधवारी (दि. १४) दुपारी पाच वाजता जंगी कुस्ती मैदान, संध्याकाळी सोंगाच्या गाड्या (आधुनिक), संध्याकाळी नऊ वाजता शैलेश लोखंडे प्रस्तुत बारा गावाच्या बारा अप्सरा हा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम होईल. गुरुवारी (दि. १५) संध्याकाळी नऊ वाजता गुणवंतांचा सत्कार समारंभ व ऑर्केस्ट्रा होईल. यात्रेनिमित्त दररोज सर्व भाविकांसाठी राजवाडा हॉलमध्ये महाप्रसाद देण्यात येणार आहे. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी श्री वेताळ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष कुरण गिड्डे, उपाध्यक्ष संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे, प्रकाश गिड्डे, सदस्य बालाजी पाटील, नागनाथ माने, शिवाजी उर्फ बच्चू गोरे, राजेश निंबाळकर,हनुमंत यादव, नाना बिनगे, सुरेश साळुंखे, युवराज पवार, प्रकाश कोळी, सचिन खरात, रत्नदीप गुरव, चंदन गुरव, उज्वल गुरव, बाळू जाडकर, काका हागे, संभाजी काळे, सोमनाथ शिंदे, अनिल पाटील, नंदकुमार लादे, सचिन सोमासे, प्रकाश डोंगरे, सौदागर शिंदे, सत्यवान बिनगे, बाळासाहेब माने, अरविंद कुंभार, उदय जाधव, दिलीप खडके, गणेश कुंभार, अनिल खडके, शिवाजी लोखंडे, पौपट कोळी, बंडू व्यवहारे, सागर सुर्वे, राजेंद्र खडके यांच्यासह सर्व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## टेंभूचे पाणी १0 मे रोजी माण नदीत येणार

### आ. डॉ.बाबासाहेब देशमुख : जलसंपदा मंत्र्यांनी दिले आदेश




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.७ मे-**

टेंभूचे पाणी माण नदीत १० मे ला दाखल होणार असल्याची माहिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

बुधवारी मंत्रालयात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची आ.डॅा.बाबासाहेब देशमुख यांनी भेट घेत टेंभू सिंचन योजनेतून माण नदीमध्ये शेतकऱ्यांच्या पिकासाठी उन्हाळी सिंचन आवर्तन लवकरात लवकर सोडण्याची आग्रही मागणी केली. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने पिण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला असून त्यामुळे तालुक्यातील गावांना शेती पिकासाठी सिंचन उपलब्ध करून नियोजनबद्ध पद्धतीने आवर्तन लवकरात लवकर सोडण्यात यावे अशी आग्रही मागणी आ.देशमुख यांनी केली. त्यावर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना शनिवार दि.१० मे पासून शेतकऱ्यांसाठी पीक सिंचन आवर्तन सुरू करण्याचे आदेश दिले. विखे पाटील यांनी तत्काळ सकारात्मकता दर्शवत पाणी सोडण्याचे आदेश दिल्याने आ.देशमुख यांनी त्यांचे आभार मानले.

## ऑपरेशन सिंदूर बद्दल मोहोळमध्ये फटाके फोडत पेढे वाटून जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.७ मे -**

पहेलगाम येथे झालेल्या भीषण हल्लयानंतर पाकिस्तानवर सुद्धा प्रतिहल्ला करावा ही मागणी गेले दहा दिवस देशभरातून सातत्याने होत होती . ती मंगळवारी पहाटे भारतीय लष्कराने पूर्ण केली. या हल्लयात दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केल्यामुळे मोहोळमध्ये संघ, भाजपा आणि देशप्रेमी नागरिक कार्यकर्त्यांनी पेढे वाटून आणि फटाके वाजवून जल्लोष केला.

२२ एप्रिल२०२५ रोजी काश्मीरमध्ये पर्यटकांवर धर्म विचारून अक्षरशः अमानुषपणे



आणि निर्दयी गोळीबार करून त्यांची हत्या केली होती. या घटनेनंतर देशभरामध्ये अक्षरशः संतापाचा आगडोंब उसळला होता. पुलवामा हल्लयाच्या वेळी जसा सर्जिकल स्ट्राइक करून पाकला धडा शिकविला होता त्याचप्रमाणे आताही जोरदार प्रत्युत्तर द्यावे अशी संतप्त जनभावना होती. त्या पार्श्वभूमीवर आपल्या हालचाली अतिशय गोपनीय ठेवून भारतीय सैन्याने बुधवारी पहाटे हे ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले. सिंदूर म्हणजे सौभाग्याचे प्रतीक असते. पर्यटक महिलांसमोर धर्म विचारून अतिरेक्यांनी ज्या महिलांच्या पतींना गोळ्या घालून ठार मारले होते आणि त्यांचे जीवन अक्षरशः उध्वस्त केले होते तेच सिंदूर नाव देऊन ही मोहीम भारतीय लष्कराने फत्ते केल्याची भावना या हल्लयामुळे देशभर निर्माण झाली आहे. मोहोळमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते धनंजय पाटील-मोहोळकर, मंगेश सोवनी, सुजल कुंभार, शुभम मळवंकी, भारतीय मजदूर संघाचे तालुका अध्यक्ष मच्छिंद्र गाडे, भाजपाचे माजी शहराध्यक्ष अरविंद माने पाटील, ज्येष्ठ नेते भाऊ सारोळकर, संघटन सरचिटणीस महेश सोवनी, बरकडे, लमाण तांड्याचे शिवाजी पवार आदींनी एकत्रित येऊन भारतमाता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला.



## पाकिस्तानवर एअर स्ट्राईक; वैरागमध्ये जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ मे-**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्लया चा बदला भारताने भारतानेही पाकिस्तानवर एअर स्ट्राईकच्या माध्यमातून घेतला आहे. मध्यरात्री दीडच्या सुमारास भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या हद्दीत घुसून तब्बल ९ दहशतवादी तळ उद्धवस्त केले आहेत . भारताने ऑपरेशन सिंदूर मोहिम यशस्वी करून दाखवली आहे . पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करून तिन्ही सैन्यदलातील जवानांचे वैराग येथे आण्णा ग्रुपच्या वतीने कौतुक करून जल्लोष साजरा करण्यात आला . यावेळी माजी सैनिक जगन्नाथ आदमाने , नगरसेवक वैजीनाथ आदमाने, महेश पन्हाळे, सतिश करंडे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यानी आनंदोत्सव साजरा केला.

## मराठा सेवा संघाचे १० मे पासून अकलूजमध्ये महाअधिवेशन

### तीन दिवस व्याख्याने, काव्यसंमेलन, परिसंवादाद्वारे विचारांचा होणार जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

मराठा सेवा संघाचे महाआधिवेशन दि. १० ते १२ मे दरम्यान अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती भवनमध्ये आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये सांस्कृतीक कार्यक्रम, व्याख्याने, काव्यसंमेलन, परिसंवादसह विविध कार्यक्रमाद्वारे विचारांचा जागर होणार आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रा. जी. के. देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाअधिवेशनाचे उद्घाटन शनिवार दि. १० मे रोजी दुपारी २ वाजता माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहित-पाटील यांच्या हस्ते आणि पालकमंत्री जयकुमार गोरे, मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्याक्ष विजय घोगरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या सोहळ्यास अकलूज बाजार समितीचे सभापती तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, आ.दिलीप सोपल, आ. समाधान आवताडे, आ. अभिजित पाटील, आ.उत्तम जानकर, आ.नारायण पाटील, आ.राजू खरे व सेवा संघाचे प्रदेश पदाधिकारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन पूर्व सत्रात सकाळी ११ वाजता मराठा सेवा संघ व ३३ कक्ष बळकटीकरण व पुनर्बांधणी या विषयावर मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यालयीन सचिव सोमनाथ लडके, धनंजय पाटील उपस्थित राहणार आहेत. दुपारी २ ते २.३० वाजता शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांचा शाहीरी कार्यक्रम, अकलूज इतिहास व विकास (डॉक्यूमेंट्री), महाराणी येसूबाई यांच्या जीवनावरील एकपात्री प्रयोग 'श्री राज्ञी सखी जयति' आदी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सायंकाळी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने अकलूज शहरातून भव्य संस्कृती यात्रा व ग्रंथ दिंडीचे काढण्यात येणार आहे. रात्री 'जागर विचारांचा, जागर संस्कृतीचा' या सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. रविवार दि.११ मे रोजी सकाळी सूर्योदयाच्या कविता या अंतर्गत अनेक मान्यवर कवींच्या कविता सादर केल्या जातील.पुढील सत्रात प्रा. प्रेमकुमार बोके, अंजनगाव सुर्जी इतिहासाचार्य मा. म. यांचे देशमुख बहुजन इतिहास व प्रबोधनाचे अर्ध्वयू या विषयावर तसेच त्यानंतर प्रा. शरद पाटील यांची इतिहास मिमांसा आणि मार्क्स, फुले, आंबेडकरवाद या विषयावर डॉ किशोर ढमाले यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच बहुजन चळवळींचा समन्वय आवश्यकता आणि कृती कार्यक्रमा अंतर्गत प्राचार्य डॉ. दिलीप चौधरी, चंद्रपूर यांचे भाषण होईल. दुपारी व्याख्याते डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांचे मराठा इतिहास आणि व्देषाचे राजकारण या विषयावर विशेष व्याख्यान होईल. व्याख्याते डॉ. सतिश तराळ अमरावती यांचे मराठा समाजाच्या सांस्कृतिकरणाची आवश्यकता या विषयावर व्याख्यान होणार आहे. त्यानंतर जीवन जगा आनंदाने, जीवन जगा मनसोक्त या विषयावर संजय कळमकर यांचे तर त्यानंतर प्रबोधनाची देशियता आणि वैश्विकता या विषयावर प्रा. डॉ. शरद बविस्कर यांचे व्याख्यान होणार आहे. सायंकाळी विजय चोरमारे यांचे माध्यम जगत आणि मराठा समाज या विषयावर तर निर्मलकुमार देशमुख यांचे आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि मराठा सेवा संघ या विषयावर व्याख्यान होणार आहे. याच दिवशी रात्री गझल मैफल होणार आहे. सोमवार दि. १२ मे रोजी समारोप होणार आहे. यादिवशी सकाळी नवोदित कवींचे काव्यसंमेलन, त्यानंतर परिसंवाद होणार आहे. त्यानंतर नाचू किर्तनाचे रंगी या विषयावर गंगाधर बनबरे यांचे व्याख्यान, दुपारी महिलांचे जग आणि जगणे या विषयावर नेहा टोम्पे, यवतमाळ यांचे व्याख्यान, त्यानंतर नित्य नवे कायदे, नित्य नवा संघर्ष या विषयावर ॲड. मिलिंद पवार, पुणे यांचे व्याख्यान होईल. कला क्षेत्रातील जातवाद आणि बहुजन समाज या विषयावर सिने कलाकार किरण माने यांचे व्याख्यान होईल. समारोपीय सत्रात जिल्ह्यातील मान्यवर व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये कला जोपासक जयसिंह मोहिते-पाटील, सामाजिक क्षेत्रात अक्कलकोट अन्नछत्रचे संस्थापक जन्मंज्येय भोसले, सिने क्षेत्रासाठी नागराज मंजुळे व किरण माने आणि शाहिरी कलेसाठी शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. संध्याकाळी महिलांसाठी लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांचा लावणी उत्सव होणार आहेत. या आधिवेशनाला राज्यभरातून १५०० पदाधिकारी सभासद व समाज बांधव उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस सूर्यकांत पाटील, प्रशांत पाटील, सदाशिव पवार, प्रा. लक्ष्मण महाडिक, रामचंद्र पाटील उपस्थित होते.